मासिक वार्तापत्र • अंक ३ • नोव्हेंबर २०१५ • सहयोग राशी - रु. ५ • १६ पाने



# कामगार बिगुल

**नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक**


सनातन संस्था – फासीवादी सरकारच्या छत्रछायेत बहरणारा आतंकवाद ६

फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे? ८

युद्धाची विभीषिका आणि शरणार्थ्यांचे भीषण संकट १३


## बिहारमध्ये मोदी आणि संघ परिवाराच्या धोरणांना चपराक

# काळ निश्चिंत होण्याचा नाही, तर फासीवाद विरोधी लढा अधिक व्यापक आणि धारदार बनविण्याचा आहे

**संपादक मंडळ**

तीन महिने चाललेला धडाकेबाज प्रचार, नरेंद्र मोदींच्या अडीज डझन सभा आणि ३००० कोटींचा निवडणूक खर्च! एवढे सारे करूनही बिहार विधानसभा निवडणुकीत जद(यू), राजद आणि काँग्रेस महायुतीने भाजप आघाडीला चारी मुंड्या चीत केले. सगळा हाईटेक प्रचार आणि मीडिया व्यवस्थापन कुचकामी ठरले. सवा लाख कोटी रूपयांचे पॅकेज आणि विकासाच्या दाव्यांसह सुरू झालेला मोदी यांचा प्रचार दादरीचे रानटी हत्याकांड आणि गोहत्येला मुद्दा बनविण्यापासून खुद पंतप्रधानांनी केल्या सांप्रदायिक धृवीकरणाच्या घाणेरड्या प्रयत्नांपर्यंत जाऊन पोहोचला. नितीश आणि लालू यांच्या जातीय पाठबळाला छेद देण्यासाठी जोडलेल्या मांझी-कुशवाहा-पासवान तिकडीचासुद्धा काहीच उपयोग झाला नाही.

या निवडणुकीत महायुतीच्या विजयाबरोबरच बुद्धिजीवी आणि तमाम प्रगतिशील लोकांचा एक मोठा हिस्सा भारतीय जनता पक्षाच्या रूपातील सांप्रदायिक फासीवादाचा पराभव झाल्याच्या आणि फासीवादी संघटनांनी मांडलेल्या उच्छादाला चाप लगल्याच्या खुशीत आहे. या पराभवामुळे भाजपला मोठे नुकसान सोसावे लागले आहे आणि भाजपमध्ये आंतरिक कलहाला तोंड फुटले आहे, यात शंकाच नाही. नरेंद्र मोदी आणि अमित शहांच्या जोडगोळीने तमाम बुजुर्ग आणि बिहारच्या स्थानिक नेत्यांना बाजूला सारून ज्या प्रकारे एकूण प्रचार अभियान स्वतःला पुढे करून चालविले, त्यानंतर पराभवाचे खापरसुद्धा त्यांच्या माथ्यावरच फुटणे स्वाभाविक होते. आता शत्रुघ्न सिन्हा आणि अरूण शौरींपासून अडवाणी-जोशी-यशवंत सिन्हांसारखे बाजूला फेकले गेलेले नेते आणि बिहारचे कित्येक खासदार उघडपणे सांगू लागले आहेत की पराभवाची जबाबदारी नरेंद्र मोदी यांची आहे. लोकसभा निवडणुकीतील विजयानंतर, अगोदर दिल्ली आणि आता बिहारमध्ये वाट्याला आलेल्या सणसणीत पराभवामुळे मते मिळवणारा नेता म्हणून बनलेल्या नरेंद्र मोदी यांच्या प्रतिमेतील हवा निघून गेली आहे. भाजपात हा कलह आणि आदळआपट आता आणखीच वाढेल. परंतु यामुळे फासीवादी शक्तींचा पराभव किंवा त्यांच्या ऱ्हासाला सुरुवात झाली आहे, असे खरेच म्हणता येईल का? फासीवाद, धार्मिक उन्माद आणि फडतूस कट्टरपंथी शक्तींच्या विरोधातील आपल्या लढ्यात आता आपण थोडे तरी निश्चिंत होऊ शकतो का? याचे उत्तर ठामपणे "नाही" हेच असले पाहिजे.

लोकप्रतिनिधींच्या निवडीच्या सध्याच्या पद्धतीत निवडणुकांचे निकाल लोकभावना खरोखरच व्यक्त करीत नाहीत, हे खरे आहे, परंतु काही प्रमाणात तरी तेथे लोकभावनेला वाचा फुटतेच. बहुसंख्य मतदारांनी भाजप आघाडीच्या विरोधात आपली तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे असे निर्विवादपणे म्हणता येऊ शकते. एकूण २४३ जागांपैकी १७८ म्हणजेच दोन तृतियांशपेक्षा जास्त जागा महायुतीत सामील पक्षांना मिळाल्या आहेत. मोदी सरकारच्या घोर भांडवलधार्जिण्या धोरणांच्या आणि हिंदुत्त्ववादी फासिस्ट राजकारणाच्या व सामाजिक सांस्कृतिक धोरणांच्या विरोधात मत दिले आहे, हे स्पष्टच आहे. विकासाच्या लंब्या चौड्या दाव्यांपैकी कोणताही पूर्ण होण्याची गोष्ट दूर राहिली, गेल्या दीड वर्षांत खायचे जिन्नस, औषध-उपचार आणि शिक्षणासारख्या मूलभूत बाबींमध्ये भयंकर माहागाई, मनरेगा आणि इतर कल्याणकारी योजनांमध्ये मोठी कपात, यामुळे सामान्य लोक त्रस्त आहेत. बिहारचे कोट्यावधी कामगार आपल्या अनुभवावरून समजू शकतात की मोदी सरकार सत्तेत आल्यापासून कामाची आणि एकूणच जगण्याची परिस्थिती किती कठिण बनली आहे. समाजाचा वरचा एक संपन्न हिस्सा लोकशाहीच्या या तमाशात फारसा रस दाखवत नाही आणि बऱ्याचदा तो मतदान करायलासुद्धा जात नाही, हे एक मान्य झालेले वास्तव आहे. सामान्य

**पान १२ वर**

# डिजिटल इंडिया स्किम – विचारांना नियंत्रित करण्याचे आणि रिलायन्सचा नफा वाढवण्याचे कारस्थान

सप्टेंबरच्या अखेरच्या आठवड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेचा दौरा करून आले. या दरम्यान फेसबुक, गुगल इत्यादी कंपन्यांच्या प्रमुखांची त्यांनी भेट घेतली व आपल्या डिजिटल इंडिया योजनेला मदत म्हणून त्यांच्याकडून काही आश्वासनेही मिळवली. आपल्या प्रत्येक अभियानाप्रमाणे मोदी सरकारने डिजिटल इंडियाबद्दलसुद्धा मोठा गाजावाजा केला आहे व गिफ्ट पॅकमध्ये लपेटून त्याला अशा प्रकारे लोकांसमोर आणले आहे की याच्या अत्यंत भयंकर बाजूंकडे लोकांची नजर जातच नाही आहे. त्याच्या या बाजूंवर चर्चा करण्याआधी, मोदी सरकार भारतीय जनतेच्या मूलभूत समस्या व त्यांवरील उपायांवर बोलण्याऐवजी डिजिटल इंडियावर एवढा जोर का देते आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे.

### तरुणांच्या चर्चेचा विषय काय? रोजगार की मोबाईलची ऑपरेटिंग सिस्टम?

डिजिटल इंडिया म्हणजे मानवाच्या इतिहासात कधीच झालेला नाही अशा पातळीवर भारतात बदल घडवून आणण्याचा उद्योग आहे, असे नरेंद्र मोदींनी अमेरिकेत डिजिटल इंडिया मेजवानीच्या आयोजनाच्या वेळी सांगितले. देशात आज ८० कोटी युवक बदलाची वाट पाहत आहेत आणि हे फक्त डिजिटल इंडियानेच शक्य होऊ शकते. भारतातील तरुणांमध्ये आज सर्वाधिक मूलभूत मुद्दा ऍंड्रॉइट, विण्डोज आणि आईओएस (मोबाइलमध्ये प्रचलित तीन ऑपरेटिंग सिस्टम) मधील पर्याय निवडण्याचा आहे, असे ते म्हणाले.

चला, आता पाहू या भारातातील तरुणांना आज खरेच काय हवे आहे, आणि मोदी सांगत काय आहेत? उत्तरप्रदेशमध्ये नुकतेच शिपायाच्या ३६८ पदांसाठी अर्ज मागवण्यात आले. किती अर्ज आले असतील, काही अंदाज करू शकाल? २३ लाख! होय चक्क २३ लाख अर्ज आले. त्यापैकी २५५ पीएचडी केलेले तरुण होते, २ लाख २२ हजार इंजिनियर व अन्य विषयांचे ग्रॅज्युएट होते. त्यानंतर या विभागाने भरती प्रक्रियाच रद्द केली कारण इतक्या लोकांच्या मुलाखती घ्यायला ४ वर्षे लागली असती. ही परिस्थिती फक्त उत्तरप्रदेशमध्येच नाही. भारताच्या कुठल्याही कोपऱ्यात जाऊन बघा, पोलिस, सैन्य, रेल्वे, शिक्षक अशा कुठल्याही नोकरभरतीमध्ये एका एका पदासाठी हजारो उमेदवार येत असतात. पोलिस, सैन्य इत्यादींच्या भरतीच्या वेळी तर चेंगराचेंगरीसुद्धा होते व कित्येक तरुणांना आपला जीवही गमवावा लागतो. मुंबईतील २०१४ च्या पोलिस भरतीच्या वेळी योग्य सोय केलेली नसल्यामुळे काही तरुणांचा जीव गेला. अशा वेळी तरुणांसमोरचा मुख्य प्रश्न मोबाइलचा ब्रॅण्ड किंवा ऑपरेटिंग सिस्टम आहे, असे म्हणणार एक तर पक्का अडाणी असेल, किंवा पक्का बदमाश! नरेंद्र मोदी तरुणांच्या ज्या वर्गाबद्दल बोलत आहेत, तो खाऊन पिऊन सुखी असलेल्या कुटुंबांचा एक लहानसा हिस्सा आहे. बहुसंख्य तरुणांसाठी आज खरा प्रश्न मोफत शिक्षण, आरोग्य आणि स्थिर रोजगार हाच आहे. परंतु मोदी सरकार त्या दिशेने उलटे काम करते आहे. लोकांना खाजगी इस्पितळात जायला भाग पडावे याच हेतूने गेल्या वर्षातील बजेटमध्ये आरोग्याच्या खर्चात कपात करण्यात आली. सरकारी शाळा बंद पाडल्या जात आहेत. दुकानदारी करणाऱ्या खाजगी शाळांचा धंदा वाढावा, हा त्यामागचा हेतू. श्रमकायदे बदलले जात आहेत आणि कंपन्यांना आपल्याकडे काम करणाऱ्यांना कधीही लाथ मारून कामावरून काढून

**पान २ वर**

# डिजिटल इंडिया स्किम.........

पान १ वरून

टाकण्याची सूट दिली जात आहे. अशा वेळी मोदी डिजिटल इंडियाची घोषणा कशासाठी करीत आहेत? देशातील सर्वच तरुणांसाठी, आणि सर्व नागरिकांसाठी ते असे करीत आहेत का? नाही. ही घोषणा भारताच्या सुखवस्तू मध्यवर्गाच्या एका लहानशा हिश्शासाठी आहे. या हिश्शाला कामगार वर्गाच्या शोषणातून उकळलेल्या संपत्तीचा काही वाटा मिळत असतो व तो उच्च मध्यवर्गाचे जीवन जगण्याचे स्वप्न पाहात असतो. त्याला अशा प्रकारच्या हवाई घोषणा भुरळ पाडतात. डिजिटल इंडिया स्कीमद्वारे त्याच्या साऱ्या समस्या दूर होतील असे त्याला खरोखर वाटत असते. परंतु त्या मध्यवर्गाच्या मोठ्या हिश्शाला सुद्धा या योजनेच्या भयंकर बाजूंचा पत्ता नाही. अशा वेळी या योजनेच्या पडद्यामागचे सत्य जाणून घेणे देशातील तरुणांसाठी व कामगार कष्टकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. डिजिटल इंडियाची घोषणा देताना मोदींनी बीएसएनएल किंवा एमटीएनएलसारख्या सरकारी कंपन्यांचा कायापालट करून त्यांचे नेटवर्क अधिक चांगले बनवण्याचा प्रयत्न केलेला नाही तर खाजगी कंपन्यांकडून मदत मागितली आहे, याकडे लक्ष दिले पाहिजे. या अंतर्गत गुगल ५०० स्टेशनांवर मोफत वाईफाईची सुविधा देणार आहे. भारताच्या स्टेशनांवर पिण्याच्या पाण्याची कमतरता आहे व अशात मोदी मदत मागायलाच गेले होते तर त्यांनी कॉर्पोरेट जगाकडून पिण्याच्या पाण्यासाठी वॉटर कुलर आणि वॉटर प्युरिफायर कां मागितले नाहीत, हा प्रश्न येथे नक्कीच उपस्थित होतो. मात्र उद्योग जगताच्या गळ्यातला ताईत असलेल्या पंतप्रधानांकडून अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे. मोफत किंवा स्वस्त पाणी दिल्याने उद्योग जगाचा नफा मारला जाईल व आपले पंतप्रधान तसे कधीच होऊ देणार नाहीत.

**डिजिटल इंडियाच्या माध्यमातून आपल्या विचारांवर नियंत्रण कसे येणार?**

जनतेचे विचार नियंत्रित करणे व त्यांच्याकडून परवानगी घेऊन त्यांच्यावर राज्य करणे ही नफ्यावर उभ्या असलेल्या या व्यवस्थेच्या शासक वर्गासाठी अगदी पहिली अट असते. म्हणूनच लोकांचे खरेखुरे प्रश्न आणि त्यांची उत्तरे यांच्यापासून लोकांचे लक्ष विचलित करणारे विचार लोकांमध्ये जास्तीत जास्त पोहोचविले जातात. परंतु क्रांतिकारी शक्ती जनतेच्या खऱ्याखुऱ्या अडचणींच्या मूळांचा शोध घेणारे आणि ही अन्यायपूर्ण व्यवस्था बदलण्यासाठी प्रेरित करणारे विचार लोकांपर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत असतात. म्हणूनच जनतेपर्यंत पोहोचणारा हा आवाज दाबून टाकणे शासक वर्गासाठी गरजेचे असते. यासाठीसुद्धा ते दमनाचा आधार घेतात, परंतु अति दमनसुद्धा त्यांच्यासाठी धोक्याचे असते. म्हणून ते वेगळ्या मार्गांनी असे विचार लोकांपर्यंत पोहोचण्यापासून रोखतात. उदाहरणादाखल आजकाल आपल्याला बहुतेक वर्तमानपत्रे वार्षिक स्कीमवर मिळतात व त्यांच्या रद्दीची किंमतसुद्धा त्यांच्यासाठी आपण खर्च केलेल्या पैशांहून जास्त येते. म्हणजेच आपल्याला जवळपास मोफतच वर्तमानपत्र मिळत असते. साहजिकच जाहिरातींशिवाय आणि कॉर्पोरेट मदतीशिवाय चालणारी वेगवेगळी प्रागतिक वर्तमानपत्रे, पत्रिका विकत घेण्यास लोक फारसे उत्सुक नसतात कारण त्यांची किंमत जास्त असते. इंटरनेटच्या जगात डिजिटल इंडियाच्या माध्यमातून हेच केले जाणार आहे. डिजिटल इंडियाच्या प्रकल्पाचा एक महत्त्वपूर्ण पैलू म्हणजे फेसबुकचा सीइओ जुकरबर्गद्वारा चालवली जाणारी इंटरनेट डॉट आर्ग नावाची योजना आहे. यासाठी फेसबुकने जगभरात मोबाइल सेवा पुरवणाऱ्या काही कंपन्यांशी भागीदारी केली आहे. जर तुमच्यापाशी त्या कंपनीचे सीमकार्ड असेल तर आपल्याला काही वेबसाईट्स मोफत ब्राऊज करता येतील. हेच या धोरणातील सर्वांत भयंकर पाऊल आहे. यात त्याच वेबसाईट असतील ज्या मास्टर कंपनी फेसबुककडे नोंदणीकृत असतील. ही वेबसाईट्स मोफत मिळत असल्यामुळे बहुसंख्य लोक त्यांचा वापर करतील मात्र त्यांना त्याच बातम्या, विचार मिळू मिळतील ज्या फेसबुक त्यांच्यापर्यंत पोचवू इच्छिते. ज्या वेबसाईट पाहण्यासाठी आपल्याला मुद्दामहून वेगळे मोबाईल डाटा प्लॅन घ्यावा लागेल, त्या आपोआप या शर्यतीत मागे पडतील. आज ते इंटरनेटच्या माध्यमातून आपले म्हणणे लोकांपर्यंत पोचवू शकत आहेत, मात्र कालांतराने ते तसे करू शकणार नाहीत. तसे पाहता आजसुद्धा फेसबुकपासून इंटरनेटच्या अन्य उपांगांचा वापर शासक वर्ग आपल्या बाजूनेच करीत आहे, परंतु कुठे ना कुठे प्रागतिक शक्तींसाठी थोडा अवकाश शिल्लक राहतो. त्याद्वारे ते आपले विचार जनतेपर्यंत पोचवू शकतात. डिजिटल इंडिया स्कीम यशस्वी झाल्यामुळे ही शक्यता अगदीच कमी होऊन जाईल.

**रिलायन्सचा नफा वाढवण्याचा प्रयत्न**

इंटरनेट डॉट ऑर्ग नामक फ्री स्कीमसाठी फेसबुकने जगभरातील निवडक कंपन्यांशी करार केला आहे. यामध्ये भारतात सक्रीय असलेली एकमेव कंपनी आहे रिलायन्स. म्हणजेच इंटरनेट डॉट ऑर्ग वापरण्यासाठी आपल्या मोबाईलमध्ये रिलायन्सचे सिम असणे आवश्यक आहे. यासाठी आपल्याला एक तर आपला जुना नंबर रिलायन्समध्ये पोर्ट करावा लागेल किंवा रिलायन्सचे नवीन सिम घ्यावे लागेल. कोणतीही व्यक्ती मोबाइल प्रामुख्याने कॉल करण्यासाठी वापरत असते व अशात लोक फ्री इंटरनेटच्या भानगडीत रिलायन्सला जबरदस्त नफा मिळवून देतील. ही स्कीम आणि अशाच वेगवेगळ्या डावपेचांद्वारे निवडणुकीच्या आधी मोदी सरकारच्या प्रचारात लावलेला पैसा अंबानी, अडानीसारखे उद्योगपती सव्याज परत मिळवत आहेत व जनतेच्या मूलभूत गरजा बाजूला सारून मोदी सरकार सतत त्यांचा फायदा करणारी धोरणे आखीत आहे. मोदी सरकार वर्तमानपत्रे, पत्रिका, टीवी, सोशल मिडिया इत्यांदींच्या बळावर या योजना गिफ्ट पॅकमध्ये लपेटून जनतेसमोर सादर करीत आहे, परंतु सर्वसामान्य जनतेने, कामगार – कष्टकऱ्यांनी यामागचे वास्तव समजून घेतले पाहिजे.

**सत्यनारायण**

●

सहकाऱ्यांनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लुट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करुन सुद्धा संपर्क साधू शकता.

रुम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३ मो. नं. ९७६४५९४०५७, ९६१९०३९७९३

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.

2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.

3. 'कामगार बिगुल' स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करुन कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.

4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.

5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.

**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वतः कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**



**जोवर लोक आपले स्वातंत्र्य वापरण्याची जोखीम उचलत नाहीत, तोवर हुकूमशहांचे राज्य चालत राहील, कारण हुकूमशहा सक्रिय आणि उत्साही असतात आणि ते झोपेत बुडालेल्या लोकांना बेड्यांत जखडण्यासाठी ईश्वर, धर्म किंवा दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा आधार घेण्यास मागेपुढे पाहणार नाहीत.**

**वोल्तेयर**

**'कामगार बिगुल' ची वेबसाइट**

www.marathi.mazdoorbigul.net

**फेसबुक पेज**

www.facebook.com/kamgarbigul


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

संपादक मंडळ : नारायण खराडे, विराट चौधरी

संपादकीय कार्यालय : रुम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३

संपर्क : ९७६४५९४०५७, ९६१९०३९७९३

ईमेल : bigulakhbar@gmail.com

सहयोग राशी : रु. ५ (एका अंकासाठी)
वार्षिक - रु. ७० (टपाल शुल्कासह)

# मानेसरच्या ब्रिजस्टोन कंपनी कामगारांचा संघर्ष जिंदाबाद!

देशातील बड्या कार कंपन्यांसाठी सुटे भाग बनवणाऱ्या ब्रिजस्टोन इंडिया प्रॉडक्ट्स प्रायवेट लिमिटेड, मानेसरचे श्रमिक आपल्या युनियन बनवण्याच्या अधिकारासाठी सध्या लढा देत आहेत. ही कंपनी ब्रिजस्टोन कार्पोरेशन, जपानची साहाय्यक कंपनी आहे. येथे गाड्यांचे कंपनविरोधी भाग (अँटी वाइब्रेशन प्रॉडक्ट्स) तयार केले जातात.

गुडगाव-मानेसर-धारुहेडा-बावलपर्यंत पसरलेल्या ऑटोमोबाइल सेक्टरच्या औद्योगिक पट्ट्यात जगभरातील नावाजलेल्या ब्रँडच्या गाड्यांचे व त्यांच्या भागांचे उत्पादन हजारो औद्योगिक एककांमध्ये होते. देशातील अर्थव्यवस्थेत प्रमुख वाटा या पट्ट्यातूनच येतो. परंतु या पट्ट्यात वेगवान गाड्यांचे निर्माण करणाऱ्या कामगारांची अवस्था मात्र फारच भीषण आहे. ब्रिजस्टोन इंडियाचे कामगार गेले सहा महिने युनियन बनवण्यासाठी धडपड करीत आहेत. कामगारांच्या युनियन बनवण्याच्या प्रयत्नात कंपनीच्या व्यवस्थापनाने अगदी सुरुवातीपासूनच अडथळे निर्माण करण्याचे काम केले आहे. ब्रिजस्टोन कंपनीचे कामगार ब्रिजस्टोन इंडिया ऑटोमोटिव्ह एम्प्लॉइज युनियन नावाच्या युनियनची नावनोंदणी करू इच्छित आहेत. कामागार पहिल्यांदा युनियन बनवण्यासाठी एकजूट झाले तेव्हाच कंपनीचे जनरल मॅनेजर मनोज मनचंदा यांनी काही कामगारांना विकत घेऊन ही प्रक्रिया रोखण्याचे प्रयत्न केले होते. परंतु कामगारांनी हार मानली नाही व पुन्हा एकदा नव्या नेतृत्त्वाखाली सावधपणे युनियन बनवण्याच्या कामी लागले. त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी बैठका घेतल्या. युनियन नोंदणीसाठी आवश्यक असलेल्या दोन आमसभा दि. १२ एप्रिल २०१५ आणि ३१ मे २०१५ रोजी झाल्या. लेबर विभागाच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून कंपनी व्यवस्थापनाला ही बातमी मिळाली. बैठकीत उपस्थित असलेल्या ३१ कामगारांपैकी ११ कामगार त्यावेळी कामावर हजर होते, व ओव्हरटाईम करीत होते असे त्यांनी बनावट कागदपत्रांद्वारे सिद्ध करण्याचा घाट घातला, जेणेकरून या बैठका खोट्या ठरवण्यात याव्यात. या कारखान्यात जवळपास १८० कायमस्वरूपी कामगार काम करीत आहेत. त्यामुळे बैठकीच्या वेळी जर २० कामगारसुद्धा उपस्थित असतील तर युनियनची नोंदणी झाली पाहिजे. या आधारे लेबर



कमिशनरने ही प्रक्रिया पुढे नेत फाइल डेप्युटी लेबर कमिशनर अनुपम मलिक यांच्याकडे सोपवली. यापुढची कारवाई मात्र थंड पडली. ना कोणतेही कारण देऊन नोंदणीची प्रक्रिया रद्द करण्यात आली, ना नोंदणीसंख्या देण्यात आली. दुसरीकडे सत्यापन तारखेनंतर व्यवस्थापनाने प्रक्रियाधीन युनियनचे नामांकित पदाधिकारी कृष्ण मुरारी आणि शिवपूजन यांची कोणतीही नोटीस न देता चेन्नई येथील कारखान्यात बदली करून टाकली. त्यांनी नकार देताच त्यांना कामावरून काढून टाकण्यात आले. व्यवस्थापनाने एक एक करून वीसच्या वीस कामगारांना बाहेरचा रस्ता दाखवला. या सगळ्या प्रकाराच्या विरोधात कामगारांनी कोर्टाची परवानगी घेऊन १७ सप्टेंबरला टूल डाऊन (काम बंद) केले. त्या दिवशी त्यांना पोलिस आणि गुंडांच्या बळावर कंपनीतून बाहेर काढण्यात आले. कामगारांच्या एका दिवसाच्या टूल डाऊनला प्रत्युत्तर म्हणून दुसऱ्या दिवशी कंपनीने बेकायदेशीरपणे कारखाना बंद केला. दुसऱ्या दिवशी जेव्हा कामगार पहाटेच्या शिफ्टसाठी पोहोचले त्यावेळी पोलिस आणि बाउंसरसह उभ्या असलेल्या व्यवस्थापकांनी त्यांना आत जाण्यापासून रोखले.कामगारांना सांगण्यात आले की त्यांना कामावर घेतले जाणार आहे की नाही ते अर्ध्याा तासानंतर कळवण्यात येईल. कामगार पुन्हा गेटवर आले तेव्हा बाउंसरनी ४ कामगारांना आत ओढून घेतले. त्यांना धमकी देण्यात आली की एक तर त्यांनी काम करावे किंवा कागदावर सही करून निघून जावे. यानंतर जवळपास ४०० कामगारांनी कंपनीच्या गेटपासून थोड्याच अंतरावर परटेंट लावून संप सुरू केला. कामावरून काढून टाकलेल्या २० कामगारांना पुन्हा कामावर घेण्याची व युनियन बनवू देण्याची मागणी कामगारांनी केली. यानंतर व्यवस्थापन पोलिसांमार्फत कामगारांवर दबाव टाकण्याचे प्रयत्न करू लागले. दुसरीकडे कामावर गेलेल्या महिला कामगारांशी गैरवर्तन करण्यात आले. कारखान्यात सुमारे ४० ते ४५ महिला कामगार आहेत. त्यांच्याकडून जबरदस्तीने त्यांना बिलकुल माहित नसलेले मोल्डिंगचे काम करून घेण्यात आले. महिला कामगार साधारणपणे डफ्लैशिंगचे काम करतात परंतु कारखाना व्यवस्थापनाने त्यांच्याकडून जबरदस्तीने पुरुष कामगारांनी करावयाची कामे करवून घेतली. त्यांना कारखाना परिसरात साफसफाई करण्यासही भाग पाडण्यात आले. दुसऱ्या दिवशी महिला कामगारांनी संपावर गेलेल्या कामगारांना साथ देण्याचा निर्णय घेतला. ऑटोमोबाइल इंडस्ट्री कॉन्ट्रॅक्ट वर्कर्स युनियन ब्रिजस्टोनच्या कामगारांच्या संघर्षाला समर्थन देत आहे. ऑटोमोबाइल इंडस्ट्री कॉन्ट्रॅक्ट वर्कर्स युनियनच्या अनंत यांनी सांगितले की कामगारांच्या युनियन बनवण्याचा अधिकार चिरडून टाकण्याचा हा काही पहिला प्रकार नाही. यापूर्वी भिवाडीमध्ये श्रीराम पिस्टनच्या कामगारांनी युनियन बवण्याच्या अधिकारासाठी संप पुकारला होता. फरक एवढाच की श्रीराम पिस्टन कंपनी राजस्थानमधील भिवाडी येथे आहे आणि ब्रिजस्टोन हरयाणाच्या मानेसरमध्ये. कामगारांची अवस्था सगळीकडे सारखीच आहे. आपल्या घामाने चकचकीत गाड्या बनवणाऱ्या या कामगारांच्या आयुष्यात अंधकार, भूक आणि गरिबी सोडून दुसरे काहीच नाही. आजच्या काळात कामगारांना आपली एक सेक्टरगत युनियन बनवणे गरजेचे आहे. अशी युनियन जी त्या सेक्टरमध्ये काम करणाऱ्या सर्व कामगारांच्या अधिकारांसाठी संघर्ष करील. हा रिपोर्ट लिहिला जाईपर्यंत ब्रिजस्टोन कंपनीचे कामगार आपल्या हक्कासाठी लढत होते आणि कारखान्याबाहेर संपावर बसले होते.

●

# केजरीवाल सरकारचा “आम आदमी” बुरखा पुन्हा फाटला!

## आमदारांच्या पगारात चार पट वाढ!

दिल्ली सरकारच्या एका समितीने त्यांच्या आम आदमी आमदारांचे वेतन चार पट वाढवण्याची शिफारस केली आहे. काही दिवसांपूर्वी स्वतःला आम आदमीचे प्रतिनिधी म्हणवणाऱ्या त्यांच्या आमदारांनी त्यांना मिळणारे वेतन (जे एकूण भत्ते धरून ८८००० आहे) त्यांच्या कुटुंबाचे पालनपोषण आणि ऑफिसच्या खर्चासाठी पुरेसे नसल्यामुळे किमान चार पट वाढवण्याची मागणी केली होती. आम आदमीच्या सरकारने आपल्या आमदारांच्या मागणी ताबडतोब धसास लावण्यासाठी एक तीन सदस्यीय समिती गठित केली आणि आता त्या समितीच्या शिफारसी लागू करण्यात येणार आहेत. या शिफारसीनुसार त्यांचा एकूण वेतन भत्ता ८८००० वरून वाढवून २ लाख ३५ हजार करण्यात येणार आहे. यामध्ये वेतनवाढ १२ हजार रुपयांवरून ५० हजार रुपये, मतदारक्षेत्रातील प्रवासभत्ता १८ हजारांवरून ५० हजार, ऑफिस खर्च ३० हजारांवरून ७००००, ऑफिस भाडे २५ हजार, संचारभत्ता ८ हजारांवरून १० हजार, प्रवासखर्च ६ हजारांवरून ३० हजार, दैनिक भत्ता १ हजारावरून २ हजार आणि ऑफिसच्या फर्निशिंगसाठीचा भत्ता १ लाख यांचा समावेश आहे.

एकीकडे सरकारी तिजोरी रिकामी असल्याचे कारण पुढे करीत केजरीवाल सरकार जनतेला दिलेल्या आश्वासनांपैकी एक एक आश्वासन बाजूला सारत आहे, आणि दुसरीकडे आपल्या प्रचारासाठीचे बजेट तब्बल २१ पटींनी वाढवून ५२६ कोटी वर नेते आहे आणि आपल्या इमानदार आमदारांचे वेतन ४ पट वाढवण्याचा निर्लज्जपणा करीत आहे. वास्तविक हेच या बहुरूप्यांचे खरे रूप आहे आणि आता ते हळूहळू जनतेसमोर उघड होत चालले आहे. दिल्लीत सुमारे ८० लाख ठेका कामगार आहेत. कागदावर त्यांचे किमान वेतन ९ हजार ते ११ हजार आहे. प्रत्यक्षात मात्र ते कुठेच लागू होत नाही. सरकारच्या दृष्टीने त्यांच्या कुटुंबाच्या पालनपोषणासाठी ही रक्कम पुरेशी आहे मात्र आमदारांसाठी ८८ हजार रुपये कमी आहेत! वेतनवाढीवर त्यांच्या एका प्रवक्याणासाने तर असेही सांगितले की त्यांचे आमदार इमानदार असल्यामुळे त्यांचे वेतन वाढवले पाहिजे. तर मग ५ – ६ हजारात १२ ते १५ तास घाम गाळणारी कष्टकरी जनता इमानदार नाहीये का? ही फक्त निर्लज्जपणाची पराकाष्टाच नाही तर दिल्लीच्या कष्टकरी जनतेचा घोर अपमान आहे.

निवडणुकीच्या आधी स्वतः अरविंद केजरीवाल इतर पक्षांवर वेतनवाढीच्या मुद्द्यावर सर्वांचे एकमत होते, परंतु जनलोकपालवर त्यांची सहमती बनत नाही म्हणून आरोप करायचे. त्यांनी घोषणासुद्धा केली होती की ते सामान्य माणसासारखे जीवन जगतील, कोणालाही २५ हजारांहून जास्त वेतन असणार नाही, कोणीही मोठा बंगला घेणार नाही, गरज पडल्यास लहान सरकारी घर तेवढे घेतील, पोलिस सुरक्षा घेणार नाहीत, साधे जीवन जगतील इत्यादी इत्यादी. नेहमीप्रमाणे कोलांटी मारून आता हे स्वराजपूजक इतर नेत्यांप्रमाणेच जनतेच्या पैशावर चैन करीत आहेत. निवडणुकीआधी अरविंद केजरीवाल यांनी जनतेला मोठमोठी आश्वासने दिली होती. काँग्रेस आणि भाजपला त्रासलेल्या जनतेने केजरीवाल यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना ६७ जागांसह भक्कम बहुमत देऊन त्यांचे सरकार बनवले. केजरीवाल यांनी शब्द दिला होता की ते ठेका पद्धत बंद करतील, श्रम कायदे कठोरपणे लागू केले जातील, झोपड्यांच्या जागी पाच लाख पक्की घरे बनवली जातील, ५०० शाळा उघडल्या जातील, २० नवीन कॉलेज उघडली जातील इत्यादी. परंतु ६ महीने झाले तरीही या अश्वासनांची अंमलबजावणी होण्याची सूतराम चिन्हे दिसत नाहीयेत. आता तर केजरीवाल स्वतःच सांगत आहेत की यांपैकी २० ते ३० टक्के वायदे पूर्ण झाले तरी खूप झाले. उघडच आहे की दिल्लीच्या व्यापारी, मालकांशी केलेले २० टक्के वायदे ते नक्की पूर्ण करतील, व करीतसुद्धा आहेत. उदाहरणादाखल वॅट कमी करणे, व्यापऱ्यांच्या टॅक्स चोरीवर छापे घालणे बंद करणे इत्यादी. परंतु कामगार जेव्हा आपल्या मागण्या घेऊन सचिवालयाकडे जातात तेव्हा त्यांच्यावर भयंकर लाठीचार्ज केला जातो आणि त्यांना तुरुंगातही डांबण्यात येते. हाच आहे या बहुरूप्याचा खरा चेहरा.

काही दिवसांपूर्वी अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा संप झाला. कर्मचारी पगारवाढ व इतर न्याय्य मागण्या करीत होते. शेवटी सरकारला या आंदोलनकर्त्यां समोर झुकावे लागले, परंतु जेव्हा हे निर्णय लागू करण्याची वेळ आली त्यावेळी केजरीवाल सरकारची तिजोरी रिकामी असल्याचे रडगाणे गाऊ लागले व सांगू लागले की सरकारकडे एवढे बजेट नाहीये. परंतु आपल्या सदाचारी आणि इमानदार आम आदमी प्रतिनिधींसाठी मात्र सरकारची तिजोरी कुबेराच्या संपत्तीसारखी ओसंडून वाहते आहे आणि सरकार त्यांच्यावर खुल्या दिलाने पैसे उधळते आहे.

कष्टकऱ्यांना भ्रमजालात अडकवणाऱ्या या बहुरूप्याचे सत्यस्वरूप आता सामान्य जनतेसमोर येते आहे, व इतर कोणत्याही संसदीय पक्षाप्रमाणेच हा पक्षसुद्धा सामान्य कष्टकरी जनतेचा आणि कामगारांचा तेवढाच मोठा शत्रू आहे, व खरे तर जास्त खतरनाक शत्रू आहे कारण हा आम आदमीचा मुखवटा लावून आपल्या पाठीत सुरा खुपसत आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे.

**अमित**

●

# दक्षिण कोरियाच्या सांगयोंग कार कंपनी कामगारांचा झुंजार संघर्ष



संप फोडण्यासाठी सशस्त्र पोलिसांनी केलेल्या भयंकर हल्ल्याचा कामगारांनी खंबीरपणे सामना केला



सांगयोंग मोटर फॅक्टरीच्या छतावर लाल झेंड्यासह उभे कामगार

दक्षिण कोरियाच्या सांगयोंग मोटर्स या कार कंपनीचे कामगार गेल्या ७ वर्षांपासून एक शानदार लढा देत आहेत. या सात वर्षांत त्यांनी सियोल शहरापाशी असलेल्या प्योंगतेक कारखान्यावर ७७ दिवस कब्जासुद्धा केला, राज्यसत्तेचे भयंकर दमन सोसले, कित्येक वेळा पराभवाला तोंड दिले मात्र आजसुद्धा ते आपल्या मागण्यांवर ठाम आहेत. दमन दुष्टचक्रात अडकून २००९ पासून आत्तापर्यंत २८ कामगार किंवा त्यांचे कुटुंबीय यांनी आत्महत्या केल्या आहेत किंवा ते मृत्यूमुखी पडले आहेत. तसे पाहता जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात कामगार संघर्ष करत असतील तर तो संघर्ष फक्त त्यांचा राहत नाही, तर अवघ्या कामगार वर्गाचाच तो लढा असतो. सांगयोंग मोटर्सच्या कामगारांच्या सोबत उभे राहून भारतातील कामगार तर या संघर्षात अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडू शकतात. सांगयोंग मोटर्सची मालकी एप्रिल २०१४ पासून भारतातील महिंद्रा ॲण्ड महिंद्रा ग्रुप्सपाशी आली आहे. भारतातील कामगारांचा पाठिंबा मिळवून महिंद्रा ॲलण्ड महिंद्रा ग्रुपवर दबाव आणता येईल व या संघर्षात विजय मिळवता येईल म्हणून सप्टेंबर २०१५ मध्ये सांगयोंग मोटर्सचे कामगार दक्षिण कोरियाहून मुद्दामहून भारतात आले होते, परंतु सध्या तरी त्यांना प्रतिबंध हटण्याचे तोंडी आश्वासन घेऊनच माघारी जावे लागले आहे. अशी आश्वासने याआधीसुद्धा या कामगारांना मिळालेली आहेत, परंतु त्यांतून काहीही साध्य झालेले नाही. तरीही दक्षिण कोरियाचे हे कामगार आपला लढा शेवटच्या श्वासापर्यंत लढणार आहेत, आणि म्हणूनच भारतातील लढाऊ कामगार संघटनांनी या संघर्षात या कामगारांच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे.

### सांगयोंग मोटर्सच्या कामगारांचा शानदार लढा

सांगयोंग मोटर्सची मालकी २००९ पूर्वी चीनच्या शंघाय ऑटोमोटिव कॉर्परेशन या कंपनीकडे होती, मात्र सर्वच मालकांप्रमाणे चीनच्या कंपनीनेसुद्धा आपल्या मालकीच्या काळात कामगारांच्या हक्कांना अजिबात महत्त्व दिले नाही, व शेवटी सांगयोंग मोटर्समार्फत बऱ्यापैकी नफा कमावल्यानंतर नफ्याचा दर घसरताच कंपनी दिवाळखोरीत असल्याचे दाखवून काढता पाय घेतला. कोणत्याही देशात बहुराष्ट्रीय कंपन्या विकासाचा डांगोरा पिटत येतात खऱ्या पण त्यांचा खरा हेतू कामगारांना पिळून नफा उकळणे हाच असतो. सांगयोंग मोटर्सची अवस्था काही दिवाळखोरीत जाण्यासारखी नव्हती, परंतु या निमित्ताने सांगयोंग मोटर्सने एप्रिल २००९ साली कंपनीतील ३७ टक्के (७१७९ पैकी २६४६) कामगारांच्या कपातीची नोटीस काढली. नंतर कंपनीने सांगितले की फक्त ९७८ कामगारांनाच कामावरून कमी करण्यात येईल व कंपनीची परिस्थिती सुधरताच त्यांना पुन्हा कामावर घेण्यात येईल. हा निर्णय मागे घ्यावा यासाठी कामगारांनी कंपनी व्यवस्थापनाशी बोलणी केली, परंतु व्यवस्थापन राजी झाले नाही. शेवटी या निर्दय निर्णयाच्या विरोधात सांगयोंग मोटर्सच्या जवळपास १००० कामगारांनी २२ मे रोजी कारखान्यावर कब्जा केला. यावेळी कामगारांमध्ये प्रचंड चीड पसरलेली होती कारण ५ महिन्यांपासून कामगारांना पगारसुद्धा मिळालेला नव्हता. यानंतर ७७ दिवस कंपनीचे गुंड व पोलिसांसोबत कामगारांनी झुंजार लढा दिला. मालकांनी गुंड आणि पोलिसांची मदत घेताच कामगारांनीसुद्धा स्वतःला हत्यारबंद केले. पोलिसांनी शरीरावर भयंकर जखमा करणाऱ्या इलेक्ट्रिक गनचा वापर केला. कामगारांनी पेट्रोल बॉंब, स्टीलचे दांडे आणि आपल्या हत्यारांनी याला प्रत्युत्तर दिले. जसे जसे दिवस जाऊ लागले तसतसा हा संघर्ष तीव्र होत गेला. २० जुलै रोजी सरकारने पूर्ण शक्तीनिशी कामगारांवर हल्ला केला आणि पाणी व गॅसचा पुरवठा तोडला. दुसऱ्या दिवशी विजही तोडण्यात आली व हॅलिकॉप्टरमधून मोठ्या प्रमाणात अश्रुधुर सोडण्यात आला. अश्रूधुराबरोबरच त्वचा भाजून काढणाऱ्या रसायनाचाही वापर करण्यात आला.




३००० पोलिस व कंपनीचे गुंड कित्येक दिवस कारखाना कामगारांच्या हातून सोडवण्यासाठी प्रयत्न करीत होते, तर कामगार गोफणींतून नट बोल्ट फेकून बंदुकींच्या गोळ्यांना उत्तर देत होते. आजुबाजूच्या कारखान्यांतील कामगारांनीसुद्धा या प्लांटमधील कामगारांना यथासंभव मदत पोचवली. बाहेरही ते पलिसांच्या नाकी नऊ आणत होते. पोलिसांनी कामगारांच्या अन्नाचा आणि औषधोपचारांचा पुरवठाही बाहेरून बंद केला. तरीसुद्धा कामगारांनी हार मानली नाही, व ते खंबीरपणे लढत राहिले. शेवटी ४ व ५ ऑगस्ट रोजी त्यांचा हा लढा निर्दयपणे चिरडून टाकण्यात आला व कामगारांचा तात्पुरता पराभव झाला. ९७८ पैकी ४८ टक्के (४७८) कामगारांना एका वर्षासाठी बिनपगारी रजेवर पाठवण्यात आले व ५२ टक्के (५१०) कामगारांना सक्तीची निवृत्ती देण्यात आली. युनियनला सांगण्यात आले की कंपनीची स्थिती पुन्हा सामान्य होईपर्यंत या कामगारांना तरजीह देण्यात येईल. एवढेच नाही तर या नंतर कंपनीने कारखान्याच्या झालेल्या नुकसानाच्या भरपाईसाठी युनियनवर खटला भरला व सुमारे २० कोटी रुपयांचा दंड कामगारांच्या माथी मारला. तेव्हापासून आत्तापर्यंत सांगयोंग मोटर्सचे कामगार, हा दंड रद्द केला जावा, त्यांना पुन्हा कामावर घेतले जावे व या प्रकरणात ज्या कामगारांचे जीव गेले आहेत त्यांच्या कुटुंबियांच्या उपजीविकेची सोय केली जावी यासाठी अखंडपणे लढा देत आहे. या दरम्यान चार वेळा दीर्घ उपोषणे झाली आहेत, कामगारांनी ७० मिटर उंच टॉवरवर थंडीत तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ राहून आपला विरोध दर्शविला आहे. व आता भारतातील कामगारांचा पाठिंबा मिळवून महिंद्रा अॅ ण्ड महिंद्रा कंपनीवर दबाव आणून आपल्या न्याय्य मागण्या मान्य करून घेण्याच्या इराद्याने दक्षिण कोरियातून कामगारांचे प्रतिनिधी मंडळ भारतात आले होते..

महिंद्रा ॲण्ड महिंद्रा ग्रुपचे चेअरमन आनंद महिंद्रा यांनी जानेवारी २०१५ मध्ये दक्षिण कोरियामध्ये सांगयोंग मोटर्सची नवी कार टिवोलीच्या उद्घाटनाच्या वेळी कामगारांना आश्वासान दिले होते की या गाडीने जर बाजारात चांगला नफा कमावला तर ते कमी केलेल्या कामगारांना पुन्हा कामावर घेतील. जानेवारी ते सप्टेंबर दरम्यान या गाडीची बऱ्यापैकी विक्री झाली परंतु कामगारांना दिलेला शब्द ते पूर्णपणे विसरून गेले. याचं आश्चर्य वाटण्याचं काहीच कारण नाही कारण मालक अशी आश्वासने विसरून जाण्यासाठीच देत असतात.

### भारतातील दुरुस्तीवादी ट्रेड युनियनचा निर्लज्जपणा

सांगयोंग कामगारांच्या प्रतिनिधी मंडळाला मुंबईत आल्यावर येथील गद्दार ट्रेड युनियनचा कटू अनुभव घ्यावा लागला. संघर्षात भारतातून योग्य मार्गदर्शन मिळावे आणि महिंद्रा ॲनण्ड महिंद्रा ग्रुपवर दबाव आणता यावा, यासाठी सांगयोंगच्या कामगारांनी, स्वतःला प्रागतिक म्हणवून घेणाऱ्या मोठ्या ट्रेड युनियनच्या नेत्यांची भेट घेतली. परंतु या बाबतीत त्यांची घात झाला. भारतातील कामगारांचा सर्वांत मोठा शत्रू ठरलेल्या दुरुस्तीवादी ट्रेड युनियननी आता दक्षिण कोरियातील कामगारांचा लढासुद्धा हाणून पाडण्याचा जणू विडा उचलला आहे. सांगयोंगच्या कामगारांसाठी जोरदार आवाज उठवण्याऐवजी ही युनियन त्यांना सल्ले देत आहेत आणि बोलणी करून हे प्रकरण सोडवण्याचे आश्वासन देत आहेत. अत्यंत कमी संसाधनांच्या बळावर करा किंवा मराचा लढ्याच्या तयारीने आलेल्या सांगयोंग कामगारांना या युनियननी आनंद महिंद्रा हे फार उदार आणि कामगार हक्कांचे रक्षणकर्ते असल्याचे या कामगारांना सांगून त्यांनी संयम पाळला तर आनंद महिंद्रा साहेब नक्कीच त्यांची प्रार्थना ऐकतील, असा विश्वास व्यक्त केला. कोलांट्या मारत मालकांशी बोलणी करायची आणि खोटी आश्वासन द्यायची, हेच या ट्रेड युनियनचे काम बनले आहे. येथेसुद्धा व्यवस्थापनाशी प्रतिनिधी मंडळाची बोलणी झाली परंतु त्याचा परिणाम एवढाच झाला की व्यवस्थापनाने या प्रकरणावर विचार करण्याचे व पुन्हा कामगारांना कामावर घेण्याचे तोंडी आश्वासन तेवढे दिले. आश्वासन तर जानेवारी महिन्यात आनंद महिंद्रा यांनीसुद्धा दिले होते. तेसुद्धा स्वतः दक्षिण कोरियात जाऊन. मग त्या आश्वासनाचे काय झाले? या ट्रेड युनियननी आपले कर्तव्य, टेबलावर बसून सर्व प्रश्न सोडवण्याच्या आपल्या जुन्या सवयीनुसार पार पाडले आहे. त्यामुळे सांगयोंगचे कामगार एक प्रकारे निराशा पदरी पाडूनच माघारी गेले आहेत. दुरुस्तीवादी ट्रेड युनियनच्या या गद्दारीनंतर सांगयोंगच्या कामगारांना आपल्या देशी माघारी जावे लागले असले तरी हा लढा सुरूच राहील. झुंजार कामगार संघटनांनी अशा वेळी सांगयोंग कामगारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे व नव्याने त्यांच्यासाठी भारतात आवाज उठवला पाहिजे.

या अमर घोषणेची आठवण आपण पुन्हा एकदा जागवली पाहिजे :

**जगातील कामगारांनो एक व्हा! तुमच्यापाशी गमावण्यासाठी फक्त तुमच्या बेड्या आहेत, जिंकण्यासाठी संपूर्ण विश्व आहे!**

• विराट



## सुनपेड पाशवी दलित हत्याकांड - चौकशी यंत्रणा, पोलिस, न्याय व्यवस्थेकडून दलितांना न्याय मिळू शकत नाही!

दलितांवर होणाऱ्या अत्याचारांत गेल्या दशकभरात भयंकर वाढ झालेली आहे. अत्याचारांच्या संख्येत वाढ होण्याबरोबरच त्यांचे स्वरूप अधिकाधिक भयंकर झाले आहे. विशेषतः दिड वर्षांपूर्वी मोदी सरकार सत्तेत आल्यापासून दलितांवर खुलेआम अत्याचार होत आहेत. नुकतीच हरियाणाच्या फरिदाबाद जिल्ह्यातील सुनपेड गावात एक घटना घडली. एका दलित कुटुंबाला दांडगट राजपुतांनी जिवंत जाळले. या घटनेत दोन कोवळ्या मुलांचा मृत्यू झाला आणि त्यांच्या आई-वडिलांनासुद्धा इस्पितळात दाखल करावे लागले. ही घटना म्हणजे दलित अत्याचाराची घटना नसून दोन कुटुंबांतील वैमनस्यातून घडलेला हा प्रकार असल्याचे सरकार नेहमीप्रमाणे सांगत आहे. ९ महिन्यांची मुलगी आणि २ वर्षांच्या मुलाचा जीव घेणारी ही घटना देशातील दलितांच्या परिस्थितीबद्दल खूप काही सांगते आहे. या घटनेने भाजप आणि हिंदुत्त्ववादी नेत्यांबरोबरच स्वतःला दलित हिताचे तारणहार म्हणवून घेणाऱ्या दलित मतांची हाव बाळगणाऱ्या अस्मितावादी दलित नेत्यांनासुद्धा अक्षरशः नागडे केले आहे.

या घटनेनंतर केंद्रिय मंत्री व्ही. के. सिंह यांनी केलेल्या विधानावरून दलितांप्रति सरकारची भूमिका स्पष्ट होते. कुणी कुत्र्याला दगड फेकून मारला तर त्यासाठी सरकारला जबाबदार धरता कामा नये, असे माजी सेनाप्रमुख व्हि.के. सिंह यांनी सांगितले. दलितांना कुत्रा म्हणणे व्ही. के. सिंह यांचा दृष्टिकोन दाखवून देतेच, पण त्याचबरोबर भाजपचा दलितविरोधी चेहरासुद्धा यावरून दिसून येतो, ज्यांचे नेते ताबडतोब व्हि. के. सिंह यांच्या मदतीसाठी धावून आले.

हे नेते तर फक्त दलित विरोधी वक्तव्य करणाऱ्याच्या मदतीसाठी धावून आले, मात्र देशात दलितांवर होणाऱ्या अत्याचारांवर देशाच्या न्यायव्यवस्थेच्या भूमिकेबद्दल बोलायचे झाले तर काही गोष्टी स्पष्ट होतात. नेता मंत्री, नोकरशाही आणि न्यायालयाने वारंवार या गोष्टीचे पुरावे दिलेले आहेत की येथे दलितांना न्याय मिळण्याची कोणतीही शक्यता नाही. न्यायव्यवस्थेची ही भूमिका फक्त दलितांपुरतीच मर्यादित नाही तर धार्मिक अल्पसंख्याकांबाबतही हेच खरे आहे. सुनपेडच्या घटनेच्या फोरेंसिक चाचणीत आता असे सांगितले जाते आहे की दलित कुटुंबाच्या घरात आग बाहेरच्या कोणत्याही व्यक्तीने लावली नाही तर घरातूनच—म्हणजे मृत मुलांच्या बापानेच ती लावली होती. अशा प्रकारे या एकूण घटनेला जातिय अत्याचाराच्या रूपात नाही तर कौटुंबिक कलहाचा परिणाम असल्याचे सिद्ध करण्याचे प्रयत्न होत आहेत. या चौकशांमध्ये कितपत खरेपणा असतो हे आपण इतिहासात पाहिलेले आहेच. गोध्रा कांडाची चौकशी ज्या प्रकारे झाली ते उदाहरण हे समजण्यास पुरेसे आहे की या व्यवस्थेच्या चौकशी यंत्रणेत आणि न्यायव्यवस्थेत कितपत विश्वास बाळगता येऊ शकतो. गेल्या वर्षी जवखेड गावातील घटनासुद्धा याच्याशी जोडून पाहता येऊ शकते. या घटनेत एक दलित परिवारातील तिघांचे अक्षरशः तुकडे तुकडे करून त्यांचे मृतदेह बोरवेलमध्ये फेकून देण्यात आले. एकूण चौकशी प्रक्रिया अगदी सुरुवातीपासूनच पीडित परिवारालाच अडकवण्याच्या दिशेने सुनियोजित पद्धतीने सुरू होती. यात नोकरशाहीपासून मुख्यमंत्र्याच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उभे केले गेले होते. १९९६ मध्ये २१ दलितांचे निर्घृण शिरकाण करणाऱ्या रणवीर सेनेच्या लोकांना, जे उच्च जातीचे होते, न्यायालयाने पुराव्यांच्या अभावाचे कारण देत निर्दोष सोडले होते. याच प्रकारे १९९७ साली लक्ष्मणपूर बाथे येथेसुद्धा रणवीर सेनेच्या लोकांनी ५८ दलितांचे शिरकाण केले व न्यायालयाने यावेळीसुद्धा त्यांना निर्दोष मुक्त केले. मेरठच्या हशिमपुरातील घटनेच्या संदर्भातही न्यायालयाने अशीच भूमिका घेत ४२ मुसलमान युवकांच्या निर्दय खून्यांना निर्दोष घोषित केले. गरीब, दलित, अल्पसंख्याक आणि राजकीय कार्यकर्त्यां च्या खून्यांना न्यायालयाने निर्दोष मुक्त करण्याच्या अशा घटनांची गणती न संपणारी आहे. विशेषतः दलितांवर होणाऱ्या अत्याचारांच्या प्रकरणात राज्यसत्ता पुरेपूर प्रयत्न करीत असते की या अत्याचारांचा जातीय पैलू लोकांसमोर येऊ नये. वेगवेगळ्या चौकशांद्वारे बहुतेक प्रकरणांत पीडित कुटुंबाच्या जवळच्या नातेवाईकांनाच दोषी ठरवण्याचे प्रयत्न केले जातात. सुनपेडची घटनासुद्धा या संदर्भातच समजूत घेता येऊ शकते.

●

## सुनपेडमधील बर्बर घटनेच्या विरोधात मुंबईत निदर्शने

सुनपेड येथे झालेल्या या बर्बर घटनेच्या विरोधात मुंबईत अखिल भारतीय जाती विरोधी मंचद्वारे एक जोरदार निदर्शन करण्यात आले. मुंबई येथील अंधेरी स्टेशनसमोर २५ ऑक्टोबरच्या सायंकाळी ५ वाजता हे निदर्शन झाले. अखिल भारतीय जाती विरोधी मंचच्या वतीने या घटनेच्या विरोधात एक पत्रक काढून हजारो लोकांमध्ये वाटण्यात आले. विरोध प्रदर्शनात अखिल भारतीय जाती विरोधी मंचच्या सत्यनारायण यांनी बोलताना सांगितले की स्वातंत्र्य मिळूनही देशातील दलितांवरील अत्याचार कमी होण्याऐवजी उलट वाढलेच आहेत. गेल्या दीड वर्षात तर स्थिती आणखीनच भयंकर झाली आहे. जातीयवादी शक्तींना सरकारकडून पुरेपूर समर्थन मिळते आहे. याशिवाय लोकांमध्ये धार्मिक पायावर फूट पाडण्याचे राजकारणही मजबूत होत आहे व देशात तणावपूर्ण वातावरण निर्माण केले जात आहे. सत्यनारायण यांनी सांगितले की मोदी सरकार पूर्ण ताकदीनिशी गरीब कष्टकरी जनतेला लुटते आहे आणि अल्प कालावधीतच हे सिद्ध झाले आहे की पुढेसुद्धा लोकांना फोडून त्यांच्यावर राज्य करण्याचे राजकारणच चालू राहणार आहे. सत्यनारायण यांनी सांगितले की सुनपेडची घटना जातीय अत्याचारांमधील रानटीपणा दाखवून देणारी आहे.

बिगुल मजदूर दस्ताच्या नारायण खराडे यांनी सांगितले की जातीय अत्याचारांच्या घटनांच्या वर्गीय पैलूकडे डोळेझाक करून चालणार नाही. जातीय चारित्र्याबरोबरच त्यांचा एक वर्गीय पैलू आहे, व तो अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. अशा रानटी अत्याचारांना प्रामुख्याने गरीब दलित बळी पडत असतात. नारायण यांनी पुढे सांगितले की आज आपण आपले शत्रू आणि आपले मित्र कोण आहेत हे नीट ओळखले पाहिजे. आज अस्मितेचे राजकारण करणाऱ्या तमाम संघटनांपासून आणि पक्षांपासून आपण सावध राहिले पाहिजे. दलितांचे पुढारीपण मिरवणारे रामदास आठवले, मायावती, रामविलास पासवान यांसारखे नेते वास्तवात गरीब दलितांचे शत्रू आहेत. यांना दलितांची आठवण फक्त निवडणूक तोंडावर येताच येते. बिहार निवडणुकीच्या तोंडावर दलितांना चुचकारण्यासाठी भाजप नेते मुंबईत आंबेडकर स्मारकाची पायाभरणी करून आपण दलितांचे उद्धारक असल्याचे दाखवतात त्यावेळी रामदास आठवलेंसारखे नेतेसुद्धा त्यांच्या या नाटकात सहभागी होऊन दलितांची भयंकर दिशाभूल करीत असतात. अस्मितेचे राजकारण करणारे हे नेते सुनपेडसारख्या घटनांनंतर कोणत्याही प्रकरचा प्रतिरोधाचा लढा उभारताना दिसत नाहीत. रस्त्यांचे नामकरण करायचे असेल, मूर्त्या बसवायच्या असतील तर मात्र हे सगळ्यात पुढे उभे असलेले दिसतात. लक्ष्मणपूर बाथे, बथानी टोला, रमाबाईनगर, खैरलांजी, जवखेड आणि सुनपेडसारख्या घटना घडतात तेव्हा जणू यांच्या डोळ्यांवर पट्टी बांधलेली असते. यांच्या कचाट्यातून सुटल्याशिवाय दलित मुक्तीचा लढा पुढे जाऊ शकणार नाही. नारायणने पुढे सांगितले की आज ब्राह्मण्यवादी विचारधारेचे वाहक कोण आहेत हेसुद्धा आपण नीट समजून घेतले पाहिजे. ब्राह्मण्यवादाचा विरोध म्हणजे फक्त ब्राह्मण व्यक्ती आणि धार्मिक ग्रंथांचा विरोध, एवढेच समजणे म्हणजे भयंकर चूक आहे. गेल्या काही वर्षांमध्ये जे अत्यंत भयंकर अत्याचार झालेले आहेत ते प्रामुख्याने श्रीमंत शेतकऱ्यांनी केलेले आहेत, व जातीय सोपानात ते सर्वांत वरच्या स्थानावर नाहीत. जाट, मराठा, यादव इत्यादी जातीच्या लोकांनी सर्वांत भीषण दलित अत्याचार घडवून आणले आहेत. जातीय पायावर दलितांची अन्य मागास जातींसोबत एकता बनवण्याचा पर्याय सुचविणाऱ्या दलित पुढाऱ्यांच्या दाव्यात किती दम आहे, हे यावरून सिद्ध होते. त्यामुळे अशा नेत्यांच्या कचाट्यातून जातिविरोधी आंदोलन सोडवल्याशिवाय आपण एक इंचसुद्धा पुढे सरकू शकत नाही हेच दिसून येते. यानंतर इतर वक्त्यांनीसुद्धा आपले विचार मांडले व घटनेची कठोर निर्भर्त्सना केली.

●









# सनातन संस्था – फासीवादी सरकारच्या छत्रछायेत बहरणारा आतंकवाद

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते व पुरोगामी विचारवंत-लेखक कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या संदर्भात समीर गायकवाड या सनातन संस्थेच्या साधकाला महाराष्ट्र पोलिसांनी नुकतीच अटक केली. वाशी व ठाणे येथील स्फोट, मडगाव गोवा येथील २००९ मधील बॉंबस्फोट व आता कॉ. पानसरेंची हत्या, अशा एका पाठोपाठ एक दहशतवादी कारवायांमध्ये संस्थेच्या "साधकां"चा हात असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे एकीकडे सनातनवर बंदी घालण्याची मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे, तर दुसरीकडे हा संस्थेला बदनाम करण्याचा डाव असून त्याच्या विरोधात सर्व हिंदू धर्माभिमान्यांनी एक होण्याचे आवाहन संस्थेने केले आहे. सध्या देशात पसरत असलेली धार्मिक कट्टरतेची लाट आणि त्याला सरकारकडून मिळत असलेले पाठबळ पाहता, संस्थेवर बंदी घातली जाईल अशी अपेक्षा करणे शहाणपणाचे होणार नाही. मात्र या निमित्ताने सनातन संस्था कोणत्या प्रकारचे "ईश्वरी राज्य" स्थापन करू इच्छिते, ते उघड झाले आहे.

सनातन संस्थेची स्थापना व्यवसायाने संमोहन तज्ञ असलेल्या जयंत आठवले यांनी १९९० साली केली. संस्थेचे संकेतस्थळ व अन्य ठिकाणी दिलेल्या संस्थेच्या माहितीनुसार जिज्ञासूंना शास्त्रशुद्ध भाषेत आध्यात्मिक ज्ञान देणे हा संस्थेचा प्रमुख हेतू आहे. त्यासाठी 'सनातन प्रभात' नावाचे वृत्तपत्र, धार्मिक साहित्याचे वेगवेगळ्या भाषांमध्ये प्रकाशन, नियमित सत्संग मेळावे, भव्य हिंदू धर्म जागृती परिषदा यांसारखे उपक्रम संस्था राबवीत असते. त्याचबरोबर २००८ साली 'श्री शंकरा' या चॅनेलवर धर्मसत्संग आणि धर्मशिक्षणवर्ग हे संस्थेचे कार्यक्रम प्रसारित करण्यास सुरुवात झाली. भारतातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये तसेच भारताबाहेरही संस्थेची केंद्रे असून ही केंद्रे कोवळ्या मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांना हिंदू धर्माच्या श्रेष्ठत्त्वाबद्दल जागृत करण्याचे, त्यांना संघटित करण्याचे व त्यांचे धार्मिक उन्नयन करण्याचे काम करीत असतात. साधकांवर कोणत्याही धर्माची मूल्ये लादली जात नसल्याचा दावा करतानाच "हिंदू राष्ट्रा"ची स्थापना करण्याचे संस्थेचे उद्दीष्टही संस्थेने कधी लपवलेले नाही. "धर्मद्रोह्यां"विरोधात लढा उभारण्याला संस्थेने नेहमीच अग्रक्रम दिलेला आहे. "क्षात्रधर्म", "दुष्टांचे निर्दालन" यांसारख्या शब्दांतून आक्रमक धार्मिकतेचा प्रचार संस्था सतत करीत असते. अगोदर केवळ सनातन प्रभातच्या जळजळीत लेखांमधून शाब्दिक पातळीवर चाललेल्या या धर्मयुद्धाला पहिल्यांदा २००८ साली ठाणे व वाशी येथील नाट्यगृहांत ठोस रूप प्राप्त झाले! "आम्ही पाचपुते" या नाटकात हिंदू देवी देवतांचा अवमान केल्याच्या निषेधार्थ ३१ मे रोजी वाशी येथील विष्णूदास भावे नाट्यगृहात व त्यानंतर ४ जून रोजी ठाणे येथील गडकरी रंगायतनच्या पार्किंगच्या ठिकाणी असे दोन सौम्य बॉंबस्फोट करण्यात आले. या स्फोटांमध्ये ७ जण जखमी झाले. या प्रकरणात संस्थेच्या ६ साधकांना अटक करण्यात आली. पैकी चौघांची न्यायालयाने सुटका केली व दोघांना १० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली. मात्र न्यायालयाने दोषींनी कोणत्याही संस्थेच्या वतीने हे स्फोट घडवून आणल्याचे म्हटले नाही. यानंतर पुढच्याच वर्षी २००९ साली मडगाव गोवा येथे पुन्हा एक बॉंबस्फोट झाला. दिवाळीच्या पूर्वसंध्येला ऐन उत्सवाच्या गर्दीच्या ठिकाणी बॉंब ठेवण्यासाठी जात असतानाच बॉंबचा स्फोट झाल्याने संस्थेच्याच दोन साधकांना "मोक्ष" प्राप्त झाला आणि साहजिकच पुन्हा एकदा पोलिसांची वक्रदृष्टी संस्थेकडे वळली. या प्रकरणात संस्थेच्या पाच साधकांना पोलिसांनी अटक केली परंतु पुराव्याअभावी नंतर त्यांची सुटका करण्यात आली. रुद्रा पाटील याच्यासह अन्य दोन आरोपी मात्र अजूनही फरार आहेत. २०१३ साली नरेंद्र दाभोळकर यांची हत्या झाल्यापासूनच यामागे सनातन संस्थेचा हात असल्याचे बोलले जात होते. आता कॉ. पानसरेंच्या हत्येच्या संदर्भात समीर गायकवाड याला अटक करण्यात आल्यानंतर नरेंद्र दाभोळकर तसेच एम. एम. कलबुर्गी यांच्या हत्येतही सनातनचा हात असल्याचा संशय अधिकच बळावला आहे. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्याला सनातनचा नेहमीच विरोध होता. अंधश्रद्धा विरोधी विधेयकाला समर्थन दिल्याबद्दल नरेंद्र दाभोळकर यांच्या विरोधात संस्थेने एफआयआर नोंदवलेली होती. २०११ साली न्यूज चॅनेलवरील एका चर्चेदरम्यान संस्थेचे प्रतिनिधी अभय वर्तक निरुत्तर होऊन चर्चा अर्ध्यावर सोडून निघून गेले. या चर्चेत डॉ. दाभोळकर यांचा सहभाग होता व पत्रकार निखिल वागळे या चर्चेचे संचालन करीत होते. या घटनेनंतर संस्थेने सनातन प्रभात या आपल्या वृत्तपत्रातून वागळे यांच्या विरोधात मोहीम उघडली व त्यांचा खाजगी मोबाईल क्रमांक छापून वागळेंना फोन करून जाब विचारण्याचे आवाहन आपल्या साधकांना केले. त्यानुसार वागळेंनासुद्धा फोनवरून सतत धमक्या मिळू लागल्या. आता समीर गायकवाड याला अटक झाल्यानंतर, निखिल वागळे हेसुद्धा संस्थेचे लक्ष्य होते, हे उघड झाले आहे. संस्थेच्या "धर्मद्रोह्यां"च्या यादीत कॉ. पानसरे हेही होतेच व संस्थेने त्यांच्या विरोधात मडगाव येथील न्यायालयात १० कोटी रुपयांचा अब्रूनुकसानीचा दावा ठोकला होता. तसेच "तुमचा दाभोळकर करू का?" अशा शब्दांत संस्थेने कॉ. पानसरेंना धमक्यासुद्धा दिल्या होत्या.

डॉ. दाभोळकर, कॉ. पानसरे व प्रा. कलबुर्गी यांच्या हत्येतही मडगाव येथील बॉंब प्रकरणात फरारी असलेल्या रुद्रा पाटील व अन्य साधकांचा हात असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या हत्या जेथे झालेल्या आहेत त्या भागांत संस्था अत्यंत सक्रिय आहे. संस्थेच्या साधकांकडून वापरलेली हत्यारे जप्त करण्यात आली आहेत, व त्यांचा वापर या हत्यांमध्ये झालेला असण्याची शक्यता आहे. दाभोळकरांच्या खूनाचे घटनेच्या साक्षीदाराने दिलेल्या वर्णनावरून बनवलेले रेखाचित्र मडगाव स्फोटातील एका फरारीच्या चेहऱ्याशी जुळणारे आहे. असे असूनही संस्थेने या हत्यांमध्ये आपला कोणताही सहभाग नसल्याचा दावा केला आहे, तसेच समीर गायकवाड हा संस्थेचा साधकसुद्धा निर्दोष असल्याचे सांगत त्याच्या बचावासाठी वकिलांची भलीमोठी फौज उभी केली आहे.

गायकवाड याच्या अटकेनंतर पुन्हा एकदा संस्थेवर बंदी घालण्यासाठी सरकारवर दबाव वाढतो आहे. गोवा येथील संस्थेचे प्रमुख कार्यालय असलेल्या बांदोडा येथील ग्रामस्थांनीसुद्धा संस्थेवर बंदी घालण्याच्या मागणीसाठी आंदोलन पुकारले आहे. त्याचबरोबर दुसरीकडे अन्य कट्टरतावादी हिंदू संघटना व शिवसेनेसारखे भाजपसारखे पक्ष कधी उघडपणे व कधी छुपेपणाने संस्थेची पाठराखण करीत आहेत. संस्थेवर बंदी घालण्यासाठी तसा प्रस्ताव राज्य सरकारकडून येणे गरजेचे असल्याचे केंद्रीय गृह मंत्रालयानेही स्पष्ट केले आहे. त्यामुळे येत्या काळात तरी संस्थेवर बंदी येण्याची शक्यता फारच कमी आहे. सध्या विरोधी बाकांवर बसून सनातनवर ताबडतोब बंदी घालण्याची मागणी करणारे कॉंग्रेस, राष्ट्रवादीचे नेते याआधीच सनातनवर बंदी कां घालण्यात आली नाही यासाठी एकमेकांकडे बोटे दाखवत आहेत.

आज आधुनिक काळातही सनातन संस्थासारख्या संघटना आपल्या समाजात अधिकाधिक बळकट का होत आहेत, व त्यांचा समाजावर होणार एकंदर परिणाम कशा स्वरूपाचा आहे हे समजून घेणे – प्रामुख्याने कष्टकरी समाजाच्या दृष्टीने – अतिशय महत्त्वाचे आहे. आज व्यवस्थेने सर्वसामान्य माणसाचे जगणे कधी नाही इतके बेभरवशाचे बवनलेले आहे. एकीकडे विज्ञानातील प्रगतीबद्दल आपण वाचत ऐकत असतो, तर दुसरीकडे बहुसंख्यांना हलाखीचे व दारिद्र्याचे, कष्टाचे जीवन जगावे लागते. बेरोजगारीचा प्रश्न दिवसेंदिवस विक्राळ रूप धारण करीत आहे. शिक्षणसुद्धा दिवसेंदिवस महागडे होत चालल्यामुळे या मूलभूत अधिकारापासूनसुद्धा माणसे वंचित राहतात. आरोग्य क्षेत्रातील बाजारूपणामुळे चांगल्या आरोग्यसुविधांपासूनही बहुसंख्य समाज वंचित आहे. अशा अनेक समस्यांची यादी बनवता येईल. या प्रश्नांनी सर्वसामान्य माणसाच्या जीवनात एक सततची व भयंकर अशी अनिश्चितता निर्माण केलेली आहे. आर्थिक क्षेत्रातील अनिश्चितता स्वाभाविकपणे हळूहळू माणसाचे एकंदर जीवन व्यापू लागते व वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या अभावामुळे या अनिश्चिततेवर मात करण्यासाठी माणसे एखाद्या पारलौकिक शक्तीचा आधार शोधू लागतात. सर्वसामान्य माणसांच्या जगण्यातील अडीअडचणी दूर होण्यासाठी सामाजिक परिस्थिती बदलणे हाच खरा उपाय असतो. त्यासाठी ठोस सामाजिक लढे उभारावे लागतात. नाहीतर सर्वसामान्य माणूस दुसरा कोणताही पर्याय दिसत नसल्यामुळे दैववाद, धार्मिकता, अंधश्रद्धा यांच्या आहारी जातो. 'सनातन'सारख्या संस्थांची आधारभूमी तयार होते ती अशी. अशा संस्था लोकांचे लक्ष खऱ्या समस्यांपासून, खऱ्या उपायांपासून विचलित करतात व त्यांच्यात भ्रामक जाणिवा निर्माण करतात. यातून एकीकडे परिवर्तनाचे लढे कमकुवत तर होतातच शिवाय सत्ताधारी वर्गाला सोयीच्या विचारांचा प्रचार करून व्यवस्था बळकट करण्याचे, व फॅसिस्ट पक्षांना मजबूत सामाजिक आधार देण्याचे काम अशा संस्था करतात. समाजात पसरलेले दारिद्र्य, विषमता, भेदभाव, दलितांवर-स्त्रियांवर होणारे भीषण अत्याचार यांना 'सनातन'ने कधी विरोध केला आहे का? उलट अशा प्रकरणांमध्ये नेहमीच अत्यंत प्रतिगामी व मानवद्रोही भूमिकाच सनातनने घेतलेली आहे, व आपली "ईश्वरी राज्या"ची व "धार्मिक उत्थाना"ची पुंगी कर्कशपणे वाजवण्याचे काम केले आहे. सनातन संस्था व अशाच अन्य धार्मिक कट्टरतावादी संस्थांचे हे सत्यस्वरूप सर्वसामान्य जनतेने ओळखले पाहिजे. तसेच अशा कट्टरतावादी शक्तींच्या विरोधात लढणाऱ्यांनीसुद्धा हे लक्षात घेतले पाहिजे की फक्त तर्कशुद्धतेचा प्रचार करणे पुरेसे नाही तर ज्या सामाजिक विषमतेमुळे दैववादाला, धार्मिक भावनेला खतपाणी मिळते ती नष्ट करण्यासाठी परिवर्तनाचा व्यापक सामाजिक लढा उभारणे गरजेचे आहे. त्याशिवाय सनातनसारख्या संस्थांची आधारभूमी नष्ट होणार नाही. वेगवेगळ्या समस्यांनी, दुःखांनी ग्रासलेले जीवन बदलण्यासाठी सर्वसामान्य जनतेला योग्य मार्गाचा पर्याय उपलब्ध करून देणे, हे प्रागतिक शक्तींसमोर आज असलेले खरे आव्हान आहे.

**नारायण खराडे**

●


## मानखुर्द (मुंबई) येथे शहीद भगतसिंह पुस्तकालयाचे उद्घाटन

शहीद भगतसिंहांच्या १०८ व्या जन्मदिनानिमित्त मानखुर्द येथे नौजवान भारत सभातर्फे शहीद भगसिंह पुस्तकालय सुरू करण्यात आले. पुस्तकालयाच्या उद्घाटन प्रसंगी लहान मुले, तरुण आणि बजुर्ग मंडळी उपस्थित होती. वेगवेगळ्या शिक्षणसंस्थांचे विद्यार्थीसुद्धा यावेळी उपस्थित होते.

नौभासच्या नारायणने सांगितले की आपल्या समृद्ध देशातील बहुसंख्य जनता आजसुद्धा गरीबी, बेरोजगारी आणि भुकेची बळी ठरते आहे कारण संसाधनांवर काही मूठभर भांडवलदार मांड ठोकून बसले आहेत. ते आपल्या नफ्यासाठी कष्टकऱ्यांना दिवसरात्र राबवत असतात. आज टीव्ही, सिनेमा उद्योग, इंटरनेटपासून सर्व प्रकारची प्रसारमाध्यमे लहान मुले व तरुणांना स्वार्थी, हिंसक आणि विकृत बनवणाऱ्या गोष्टी मनोरंजनाच्या नावाखाली देत आहेत. यामुळे समाजात वेगवेगळ्या विकृती, अंधविश्वास पसरत आहेत. या नफेखोर व्यवस्थेला पर्याय उभा करण्याच्या दीर्घ लढ्यासाठी तरुणांचे व्यक्तिमत्त्व प्रगल्भ आणि समृद्ध असणे गरजेचे आहे. निरोगी मनोरंजनाबरोबरच लहान मुले व तरुणांमध्ये उच्च जीवनमूल्ये आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे गरजेचे आहे. म्हणूनच , वैज्ञानिक विचार देणारी तसेच सामान्य लोकांच्या आयुष्याचे वास्तव व परिवर्तनाचा मार्ग यांच्याशी वाचकांचा परिचय करून देणाऱ्या पुस्तकांची नितांत आवश्यकता आहे.

पुस्तकालयात वृत्तपत्रे, नियतकालिके यांच्याबरोबर मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांमधील देशविदेशातील विख्यात लेखकांची पुस्तके उपलब्ध आहेत. लहान मुलांसाठी, त्यांच्या कल्पनांना वाव देणाऱ्या विशेष पुस्तकांचा वेगळा विभागही आहे.





# समाजवादी सोविएत संघाने वेश्यावृत्ती कशी संपुष्टात आणली?

तजिन्दर

वेश्यावृत्ती प्राचीन काळापासून आपल्या समाजात अस्तित्वात आहे. समाजाचे वर्गांमध्ये विभाजन होण्याबरोबर व स्त्रियांच्या दासतेबरोबरच वेश्यावृत्तीची सुरुवात झाली. परंतु भांडवलशाहीबरोबर देहव्यापाराचा हा धंदा एका व्यापक आणि संघटित रुपात अस्तित्त्वात आला. भांडवलशाहीने एक खुली बाजारपेठ निर्माण केली जेथे कारखान्यात निर्माण होणाऱ्या मालाबरोबर मानवी संबंध आणि शरीरसुद्धा नफ्यासाठी विकले आणि खरेदी केले जाऊ लागले. कलकत्ता, दिल्ली आणि मुंबईसारख्या महानगरांपासून लहान शहरांपर्यंत देह व्यापाराचे बाजार आणि त्याचबरोबर जगभरात मानवी तस्करीचा एक व्यापक व्यवसाय निर्माण झाला.

एकट्या **भारतात जवळपास ३० लाखांहून जास्त वेश्या आहेत.** यांपैकी ३५ टक्के १२ ते १५ वयाच्या मुली आहेत ज्या या अमानवीय धंद्यात अडकल्या आहेत. दर वर्षी लाखो महिला आणि मुलींची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी तस्करी केली जाते व त्यांना बळजबरीने या धंद्यात ढकलले जाते. ही व्यवस्थासुद्धा या समस्येच्या निवारणासाठी प्रयत्न करते आणि बरेचसे एनजीओ आणि समाजसेवी संस्था या संदर्भात कार्यरत आहेत. परंतु या सर्वांचा खरा हेतू या समस्येच्या मूळ कारणांवर पांघरूण घालणे हाच आहे. हा प्रश्न सोडवण्यासाठी आज या धंद्याला कायदेशीर रूप देण्याचे प्रयत्न केले जात आहेत. या व्यवस्थेच्या उष्ट्या-खरकट्यावर जगणारे बुद्धिजीवी या प्रकाराच्या बाजूने युक्तिवाद करीत आहेत आणि मीडियामार्फत या युक्तिवादांचे रूपांतर सर्वसामान्य मतामध्ये करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. विसाव्या शतकाच्या आरंभी अमेरिका आणि युरोपच्या भांडवली देशांमध्ये वेश्यावृत्तीच्या विरोधात जोरदार मोहिमा चालविल्या गेल्या. मात्र महिलांची अवस्था सुधारणे हा या मोहिमांचा उद्देश नव्हता. कारण त्यांमागे खरे कारण होते यौन रोगांचा मोठ्या प्रमाणात फैलाव. म्हणूनच या मोहिमा वेश्यावृत्ती-विरोधी नव्हत्या तर वेश्यांच्या विरोधात होत्या. या मोहिमांचे विश्लेषण अमेरिकन लेखक **डायसन कार्टर** यांनी त्यांचे प्रसिद्ध पुस्तक **पाप आण विज्ञान** मध्ये विस्तारपूर्वक केले आहे. त्याचबरोबर १९१७ च्या रशियन क्रांतीच्या आधी आणि नंतर रशियामधील वेश्यावृत्तीच्या स्थितीचे वर्णनसुद्धा केले आहे.

### रशियामध्ये क्रांतीच्या पूर्वी वेश्यावृत्ती

रशियामध्ये जारशाहीच्या काळात वेश्यावृत्तीची एक संघटित अशी संरचना अस्तित्वात होती. ही एकूण संरचना रशियन बादशहा जारच्या सरकारच्या देखरेखीखाली चालत होती. याला पिवळ्या तिकिटाची व्यवस्था म्हटले जायचे. वेश्यावृत्तीचा व्यवसाय म्हणून अंगिकार करणाऱ्या स्त्रियांना पिवळे तिकिट दिले जायचे, परंतु याच्या बदल्यात त्यांना आपल्या पारपत्राचा (पासपोर्ट) त्याग करावा लागे. याचा अर्थ होता एक नागरिक म्हणून आपल्या सर्व अधिकारांवर पाणी सोडणे. एकदा या धंद्यात आल्यावर माघारी जाण्याचे सारे दरवाजे बंद केले जायचे. त्यानंतर कोणतीही महिला वेश्यावृत्ती सोडून दुसरे कोणतेही काम करू शकत नसे कारण पारपत्राशिवाय कुठेही नोकरी मिळत नसे. त्याचबरोबर या महिलांची सामाजिक प्रतिष्ठासुद्धा संपुष्टात येई. अशा महिलांसाठी वेगळ्या वस्त्या बनवण्यात येत, जशा भारतात रेड लाइट एरिया (वेश्यावस्त्या) आहेत. म्हणजेच या महिलांचे अस्तित्त्व अगदी खालच्या दर्जाच्या जीवांच्या रूपात शिल्लक राहायचे. ही व्यवस्था टिकवून ठेवण्यामागचा हेतू होता यातून सरकारला मिळणारे उत्पन्न. वेश्यांना आपल्या उत्पन्नाचा एक भाग जिल्हा प्रमुख किंवा अन्य एखाद्या सरकारी अधिकाऱ्याला द्यावा लागत असे.

क्रांतीच्या आधी एकट्या पिटर्सबर्ग शहरात सरकारी लायसेंस-प्राप्त महिलांची संख्या ६० हजार होती. १० पैकी आठ वेश्या २१ पेक्षा कमी वयाच्या होत्या. अर्ध्यापेक्षा अधिक महिला अशा होत्या ज्यांनी १८ वर्षे वयाच्या आधी हा व्यवसाय पत्करला होता. रशियाच्या नैतिक पतनाचा हा चिखल एकीकडे उत्पन्नाचा स्रोत होता तर दुसरीकडे रशियाच्या कुलीन लोकांसाठी विदेशातून येणाऱ्या लोकांसमोर लांछनेचे कारणसुद्धा होता. म्हणूनच कुलीन लोकांनी जार सरकारवर दबाव आणला आणि जारने या मुद्द्यावर विचारविनिमय करण्यासाठी एक परिषदसुद्धा बोलावली. या परिषदेत कामगार संघटनांनीसुद्धा आपले सदस्य पाठवले. कामगारांच्या प्रतिनिधींनी परिषदेत जोरकसपणे हे म्हणणे मांडले की रशियामध्ये वेश्यावृत्तीचे मुख्य कारण जारशाहीची आर्थिक आणि राजकीय संरचना हेच आहे. अर्थातच, असे विचार दाबून टाकण्यात आले. पोलिस अधिकाऱ्यांचे म्हणणे होते की चांगल्या घरातील महिलांवर प्रभाव पडू नये, यासाठी खालच्या जमातीच्या महिलांनी आयुष्यभर हा व्यवसाय करणे गरजेचे आहे.

### ऑक्टोबर क्रांतीनंतर

ऑक्टोबर १९१७ मध्ये रशियात कामगार आणि शेतकऱ्यांनी बोल्शेविक पार्टीच्या नेतृत्त्वाखाली जारशाही उलथवून समाजवादी क्रांती केली. खाजगी मालकी नष्ट करून उत्पादनाच्या साधनांचे समाजीकरण करण्यात आले. फक्त आर्थिक गुलामीच्या बेड्या तोडून टाकणे एवढाच या क्रांतीचा हेतू नव्हता. या क्रांतीने लुटीवर आधारित जुन्या व्यवस्थेने निर्माण केलेल्या तमाम सामाजिक रोगांवरही (यांमध्ये दारूबाजी, वेश्यावृत्ती, महिलांची गुलामी इत्यादी) प्रहार केला.

सोविएत शासनाने वेश्यावृत्तीवर पहिला हल्ला १९२३ मध्ये केला. वेश्यावृत्तीची समस्या समग्रपणे समजून घेण्यासाठी डॉक्टर, मनोविशेषज्ञ आणि कामगार संघटनांच्या नेत्यांनी १९२३ मध्ये एक प्रश्नावली तयार केली व रशियाच्या हजारो महिला आणि मुलींमध्ये वितरीत केली.

ज्या परिस्थितीमुळे आणि कारणांमुळे एक महिला आपले शरीर विकण्यासाठी तयार होते त्यांचा शोध घेणे हा या प्रश्नावलीचा हेतू होता. प्रत्येक स्तरावरील आणि वेगवेगळ्या वयोगटातील स्त्रियांकडून या प्रश्नांची उत्तरे लिखित स्वरूपात आणि गोपनीय पद्धतीने घेण्यात आली.

या सर्वेक्षणानंतर जी तथ्ये समोर आली ती पुढीलप्रमाणे:

- ज्या महिलेला जाणूनबुजून दुसऱ्या लोकांनी फूस लावली होती तीच स्त्री देह व्यापारासाठी तयार झाली. कोणत्या लोकांनी? ज्यांनी पहिल्याप्रथम तिच्याशी शरीराचा सौदा केला त्यांनी नाही, तर अशा पुरुष आणि स्त्रियांनी जे वेश्यावृत्तीच्या व्यापारातून भलामोठा नफा कमावत होते किंवा ते जे व्यभिचाराचे अड्डे चालवीत होते.
- मोठ्या संख्येने उपाशी नग्न मुली अस्तित्वात आहेत म्हणून व्यभिचार टिकून आहे, कारण व्यभिचाराच्या व्यापारातून चांगला नफा हाती येत असतो.
- सोविएत विशेषज्ञांच्या हे लक्षात आले की बहुतेक मुली इतक्या गरीब होत्या की थोड्याशा पैशांची लालूच त्यांना वेश्यावृत्तीत फरफटत आणत होती.
- बहुतेक मुलींनी सांगितले की त्यांना जर एखादे चांगले काम मिळाले तर त्या हा धंदा सोडून देतील.

या तथ्यांच्या प्रकाशात सोविएत सरकारने सर्वप्रथम १९२५ साली वेश्यावृत्तीच्या विरोधात एक कायदा संमत केला. देशातील सर्व सरकारी संस्था, ट्रेड युनियन आणि स्थानिक संघटनांना निर्देश देण्यात आले की खाली दिलेल्या उपायांची त्वरित अंमलबजावणी केली जावा :

(येथे आम्ही पाप आणि विज्ञान या पुस्तकातून या कायद्याशी संबंधित संदर्भ देत आहोत)

कामगार संघटनांच्या सहकार्याने कामगारांच्या एका हत्यारबंद सुरक्षा तुकडीने कामगार स्त्रियांची कामावरून कपात कोणत्याही परिस्थितीत बंद करावी. कोणत्याही परिस्थितीत आत्म निर्भर, अविवाहित स्त्रिया, गर्भवती स्त्रिया, लहान मूल असणाऱ्या स्त्रिया आणि घरापासून वेगळ्या राहणाऱ्या मुलींना कामावरून कमी करण्यात येऊ नये.

१. त्या वेळी पसरलेल्या बेरोजगारीवर आंशिक उपाय म्हणून स्थानिक सत्ताधारी संस्थांना निर्देश देण्यात आले की त्यांनी सहकारी फॅक्टरी आणि शेती संघटित करावी जेणेकरून निराधार महिलांना काम देता येईल.

२. स्त्रियांना शाळा आणि प्रशिक्षण केंद्रांमध्ये भरती होण्यासाठी प्रोत्साहन दिले जावे, तसेच स्त्रियांना गिरण्या-फॅक्टरींमध्ये काम करता कामा नये या भावनेच्या विरोधात कामगार संघटनांनी संघर्ष केला पाहिजे.

३. ज्या स्त्रियांना राहण्यासाठी निश्चित जागा नाही व ज्या मुली गावांतून शहरांमध्ये आलेल्या आहेत त्यांच्यासाठी आवास अधिकाऱ्यांनी वास्तव्यासाठी सहकारी घरांची व्यवस्था करावी.

४. बेघर मुले आणि तरुण मुलींच्या सुरक्षेचे नियम सक्तीने लागू केले जावेत.

५. यौन रोग आणि वेश्यावृत्तीच्या धोक्याच्या विरोधात सामान्य लोकांना जागृत करण्यासाठी अज्ञानावर हल्ला केला जावा. आपल्या नव्या लोकतंत्राद्वारे आपण या रोगांना उपटून फेकू शकतो याची जाणीव सामान्य लोकांमध्ये जागवण्यात यावी.

### ठेकेदार, वेश्या आणि ग्राहक यांच्याप्रति तीन वेगळ्या भूमिका

ठेकेदार आणि वेश्यागृहांचे मालक (यांमध्ये घरमालक आणि हॉटेलांचे मालक यांचाही समावेश होता) यांच्या विरोधात कडक भूमिका घेण्याचे आदेश सोविएत सरकारने दिले. सैन्याला आदेश देण्यात आले की माणसांचा व्यापार करणारे आणि वेश्यावृत्तीतून फायदा कमावणाऱ्यांना अटक करून कायद्यानुसार शिक्षा देण्यात यावी.

वेश्यावृत्तीच्या कचाट्यात सापडलेल्या महिलांबद्दल लोकांना आणि सैन्याला ताकीद देण्यात आली की त्यांना चांगली वागणूक दिली जावी. छाप्याच्या वेळी त्यांना समान नागरिक समजले जाण्याविषयीसुद्धा सांगण्यात आले. असेही कलम होते की अशा महिलांना अटक केले जाऊ नये. त्यांना न्यायालयात फक्त ठेकेदारांच्या विरोधात साक्ष देण्यासाठीच आणले जात होते.

ग्राहकांप्रति सामाजिक दबावाची भूमिका घेण्यात आली. ग्राहकांना अटक करण्यात येत नसे तर त्यांचे नाव, पत्ता आणि नोकरीच्या स्थळाचा पत्ता घेण्यात येत असे. नंतर बाजारात एक तक्ता लावण्यात येत असे, ज्यावर ग्राहकांच्या नाव आणि पत्त्यासह लिहिलेले असायचे – महिलांचे शरीर विकत घेणारे! अशा नावांच्या याद्या सर्व मोठमोठ्या इमारती आणि गिरण्या-फॅक्टरींच्या बाहेर लागलेल्या असायच्या.

### सामाजिक पुनर्वसन

अशा महिलासुद्धा होत्या ज्यांची इस्पितळे व आरोग्य केंद्रांमध्ये देखभाल केली जायची, ज्या स्वतःला समाजाच्या अनुकूल बनवू शकत नव्हत्या. त्यामुळे अशा महिला पुन्हा देहव्यापाराकडे जाण्याची शक्यता शाबूत होती. मग सामाजिक पुनर्वसनाची एक योजना बनवण्यात आली. ही योजना थोडक्यात पुढीलप्रमाणे होती.

१. रोग्याला तेव्हाच सुट्टी देण्यात येत होती जेव्हा समाजाच्या एखाद्या हिश्श्यामध्ये त्याच्या राहण्याचा संपूर्ण बंदोबस्त झालेला असायचा. तेथे त्याचा भूतकाळ गोपनीय राखला जाई. या भूतकाळाबद्दल त्या थोडक्या लोकांनाच माहिती असायची ज्यांच्याशी इस्पितळात राहताना शेवटच्या काही महिन्यांमध्ये रोग्याने पत्रव्यवहार केलेला असे. सामाजिक कार्याचे हे स्वयंसेवक अगोदरच अशी एखाद्या नोकरीची तजवीज करून ठेवीत जिच्यासाठी महिला रोग्याला खास शिक्षण दिले गेले असायचे. हे स्वयंसेवक तिच्या राहायाची सोय एखाद्या कुटुंबात करून देत. अशा महिलेच्या एखाद्या नवीन कुटुंबात येण्यासंबंधीच्या प्रत्येक लहानसहान बाबीवर लक्ष ठेवण्यात येईल जेणेकरून तिच्या पूर्वायुष्याबद्दल कोणाला काही शंका येऊ नये.

२. मोजक्या लोकांचा गट प्रत्येक स्त्रीला दीर्घ कालावधीपर्यंत मदतीची शाश्वती देत असे. आपल्या देशातही पडताळणीचा वेळ देण्याची व्यवस्था आहे. परंतु हा सांभाळ मूलभूतरित्या वेगळा होता. या सांभाळाचा आधार होता समानतेच्या आधारावर व्यक्तीगत मैत्री. रोगी आपल्या नव्या कामधंद्यात यशस्वी होईल या गोष्टीला जास्त महत्त्व दिले जात असे. सांभाळ करणारी कमीत कमी एक व्यक्ती त्या महिलेसोबत काम करीत असे.

३. प्रत्येक जिल्ह्यात सांभाळ करणाऱ्यांचे वेगवेगळे गट मिळून साहाय्यता समित्या बनवीत होते. डॉक्टर, मनोविशेषज्ञ आणि फॅक्टरी मॅनेजर यांच्याशी सल्लामसलत करण्यासाठी या समित्यांची महिन्यातून तीन वेळा बैठक होत होती. कोणत्याही रोग्याच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची गडबड दिसून येताच विशेषज्ञ आणि अनुभवी साहाय्यक यांची ताबडतोब मदत घेतली जायची. जसजसा काळ जाऊ लागला तसतशा या स्त्रिया या समित्यांचे काम अधिक चांगले करण्यासाठी त्यांच्यामध्ये सहभागी होऊ लागल्या.

४. विवाह, धंदा, पगार, भाडे यांसारख्या कोणत्याही अडचणींमध्ये अडकल्यास त्यांच्या सुरक्षेसाठी समितीने खास कायद्याच्या मदतीचीही व्यवस्था केली होती.

५. ज्या महिलांचा अजूनही इस्पितळात उपचार सुरू होता, त्यांच्याशी पत्रव्यवहार करण्यासाठी जुन्या रोग्यांना प्रोत्साहन दिले जायचे. समाजात पुन्हा दाखल होण्याची इच्छा रोग्यांमध्ये वाढीस लागावी व लवकर त्यांनी समाजात परत यावे, हे यामागचे कारण होते.

### सोविएत संघाच्या वेश्यावृत्तीच्या विरोधातील पंधरा वर्षांच्या संघर्षानंतर

- अभियानाच्या पहिल्या पाच वर्षांच्या टप्प्यानंतरच, १९२८ मध्ये बिगरव्यावसायिक वेश्यावृत्ती पूर्णपणे नष्ट झाली. २५००० हून जास्त व्यावसायिक महिला इस्पितळांतून बाहेर बडून सन्मान्य नागरिक बनल्या. जवळपास ३ हजार व्यावसायिक वेश्या अजूनही होत्या.
- ८० टक्क्यांहून थोड्या कमी महिला इस्पितळांतून बाहेर पडून उद्योग आणि शेतीचे काम करण्यास पोहोचल्या.
- ४० टक्क्यांहून जास्त शॉक ब्रिगेडमध्ये काम करणाऱ्यांना जाऊन मिळाल्या किंवा देशासाठी प्रतिष्ठेचे काम करून त्यांनी नाव कमावले. बहुतेकींनी विवाह करून त्या माता झाल्या.

डायसन कार्टर यांच्या शब्दांत – व्यभिचाराच्या विरोधातील हा संघर्ष – जो आता गुलाम आणि पीडितांचा संघर्ष बनला होता – सोविएत जीवनातून युगांपासून चालत आलेला हा व्यभिचाराचा व्यापार कायमचा नष्ट करण्यात यशस्वी झाला. या संघर्षाने यौन रोगही नष्ट केले. रशियाच्या नव्या पिढीने वेश्या पाहिलेलीसुद्धा नाही.

रशियामध्ये समाजवादी काळात नशाखोरी आणि वेश्यावृत्तीसारख्या समस्यांच्या विरोधात लढा पुकारण्यात आला आणि या प्रवृत्ती नष्ट करण्यात यशही मिळाले. त्या काळात अवलंबिण्यात आलेले धोरण फक्त यामुळे यशस्वी झाले नाही की जारशाहीनंतर एक इमानदार सरकार सत्तेत आले होते. या समस्या सोडवण्यात यश येण्याचे खरे कारण हे होते की या अपप्रवृत्तींचे मूळ खाजगी मालकीवर आधारित संरचना रशियाच्या कम्युनिस्ट पार्टीच्या (बोल्शेविक) नेतृत्त्वाखाली झालेल्या ऑक्टोबर १९१७ च्या क्रांतीने नष्ट करून टाकली. उत्पादनाच्या साधनांवर समान मालकी असल्यामुळे उत्पादनसुद्धा समाजाच्या गरजा डोळ्यांसमोर ठेवून केले जात होते. काही मूठभर लोकांच्या नफ्यासाठी नाही. म्हणूनच सोविएत सरकारद्वारा बनवलेली धोरणेसुद्धा बहुसंख्याक कष्टकरी जनतेला लक्षात घेऊन केली जात होती, मूठभर लोकांच्या नफ्यासाठी नाही.

आज भांडवली संरचना पूर्वीपेक्षा जास्त पतित झालेली आहे आणि नशाखोरी, वेश्यावृत्तीसारख्या अपप्रवृत्तींनी अधिक व्यापक रूप धारण केले आहे. आज जेव्हा समाजवादी काळाच्या सोनेरी इतिहासावर चिखलफेक केली जात आहे, अशा वेळी समाजवादी काळातील उपलब्धींचे वास्तव सामान्य लोकांपर्यंत घेऊन जाणे गरजेचे आहे, जेणेकरून सध्याच्या वयोवृद्ध रोगट व्यवस्थेला लोकांसमोर नागडे केले जाऊ शकेल. आज रशिया आणि चीनमध्ये समाजवादी संरचना शिल्लक नाही हे खरे, परंतु या काळातील उपलब्धी आजसुद्धा आपल्याला सध्याच्या लुटीवर आधारित व्यवस्था नष्ट करण्यासाठी आणि नवी समाजवादी व्यवस्था उभारण्यासाठी प्रेरणा देत आहेत.

**अनुवाद : अभिजीत**

●

# फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे?

**गेल्या काही वर्षांपासून चालू असलेल्या खोल आर्थिक मंदीमुळे एकीकडे लाखो लोकांना आपला रोजगार गमवावा लागत असताना बहुतेक देशांमध्ये एक तर फासीवादी पक्ष सत्तेत आले आहेत किंवा बळकट तरी झाले आहेत. (जसे आपल्या देशात फासीवादी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निवडणुकांमध्ये प्रतिनिधित्व करणारा भाजप) असे पक्ष सत्तेत येताच कामगारांच्या अधिकारांवर जोरदार हल्ला चढवतात आणि कॉर्पोरेट घराण्यांचा नफा वेगाने वाढविणारी धोरणे बनवतात. जर्मनीत हिटलर आणि इटलीमध्ये मुसोलिनी यांना आपण इतिहासातील फासीवादाचे जनक म्हणून ओळखतो. त्यांनी लाखो-कोट्यावधी निर्दोष माणसांची कत्तल केली आणि आजसुद्धा तमाम फासीवादी त्यांना आपले गुरू मानतात. अशा परिस्थितीत, आर्थिक अरिष्ट किंवा मंदी म्हणजे नेमके काय असते, ती फासीवादाला कसा जन्म देते, फासीवाद कसा ओळखावा आणि त्याच्याशी लढण्याचा खरा मार्ग कोणता, यांसारख्या गोष्टी समजून घेणे गरजेचे आहे.**

**एखादा फासीवादी पक्ष सत्तेत असतो तेव्हाच फासीवादाचा धोका असतो, आणि फासीवादी पक्ष सत्तेतून बाहेर पडताच फासीवादाचा धोका टळतो, असे मानणाऱ्या लोकांची संख्या कमी नाही. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत जेव्हा लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्त्वातील भाजप सरकारचा पराभव झाला होता, तेव्हा अनेकांचा असा गैरसमज झाला होता की फासीवादाचा धोका आता टळलेला आहे. त्यांचा समज किती बालीश होता हे स्पष्ट झालेच आहे, व आता फासीवादाचा धोका सर्वांत भयंकर रूपात आपल्या डोक्यावर घिरट्या घालीत आहे. फासीवाद म्हणजे काय? हे समजून घेतल्याशिवाय आपण काही झाले तरी त्यांच्या विरोधात लढण्याचा प्रभावी मार्ग शोधून काढू शकत नाही. त्याच्या सर्वच सामाजिक-आर्थिक-राजकीय-सांस्कृतिक पैलूंची योग्य जाणीव विकसित करूनच आपण त्याला पराभूत करण्याचा एक व्यावहारिक कार्यक्रम आखू शकतो. गेल्या वर्षी मोदी सरकार सत्तेत येताच, पाच वर्षांपूर्वी फासीवादाचा धोका टळला म्हणून सांगणारे लोक रडू-विव्हळू लागले आणि फासीवाद फासीवाद म्हणून ओरडू लागले आहेत. त्यांच्या मते भाजप सत्तेत असला, तर फासीवादाचा धोका असतो आणि जर भाजप सरकार बनवू शकला नाही तर फासीवादाचा धोका टळतो! फासीवादाची एवढी बालीश समज असल्यामुळेच हे लोक फासीवादाला पराभूत करण्याचा जो कार्यक्रम तयार करतात तोसुद्धा विसंगतींनी भरलेला असाच असतो. बिहारमध्ये नुकत्याचा झालेल्या भाजपच्या पराभव म्हणजे फासीवादाचे दिवस संपत आल्याचे द्योतक आहे असे हे लोक मानत आहेत. त्यामुळे ते उत्सव साजरा करण्याच्या मनस्थितीत आहेत. बिहारसारखे महागठबंधन किंवा व्यापक डाव्या आघाडीच्या बळावर फासीवाद संपवण्याची योजना बनवणाऱ्या डॉन क्विहोतेंची सध्या कमी नाही. ते फक्त निवडणुकीच्या माध्यमातून फासीवादाला पराभूत करण्याचे शेखचिल्लीचे स्वप्न पाहत आहेत. परंतु हे खरेच शक्य आहे का? निवडणुकीच्या माध्यमातून फासीवाद संपवला जाऊ शकतो का?**

**या प्रश्नावर गंभीरपणे विचार करणे व फासीवाद विरोधी लढ्याला योग्य दिशा देणे आज गरजेचे आहे. अशा वेळी, हा दीर्घ लेख फासीवादाची एक सुस्पष्ट समज निर्माण करण्यास वाचकांना साहाय्यक ठरेल, असे आम्हांला वाटते. हा लेख फासीवाद निर्माण होण्याच्या आर्थिक-राजकीय कारणांवर विस्ताराने चर्चा करतो, जर्मनी आणि इटलीमधील फासीवादाच्या इतिहासाचे विश्लेषण करून महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढतो, भारतातील सर्वांत मोठी फासीवादी शक्ती असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची एकंदर जन्मकुंडली मांडतो आणि शेवटी फासीवादाशी लढण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यावहारिक कार्यक्रम सादर करतो. फासीवादाच्या निरनिराळ्या सैद्धांतिक पक्षांवरही हा लेख प्रकाश पाडतो व इतिहासात केल्या गेलेल्या सैद्धांतिक चुकांची समीक्षासुद्धा करतो.**

**हा निबंध सर्वप्रथम २००९ साली कामगारांसाठी प्रसिद्ध होणाऱ्या मजदूर बिगुल या मासिक वृत्तपत्रात सहा भागांमध्ये प्रसिद्ध झाला होता. हा निबंध मुळात हिंदीत लिहिला गेला होता व या लेखाने मांडलेल्या प्रस्थापनांना गेल्या पाच वर्षांतील घटनाक्रमाने योग्य सिद्ध केले आहे.**

**संपादक**

---

भाग - १

लेखक : अभिनव


मराठी अनुवाद : अमित शिंदे

२००९ च्या सार्वत्रिक निवडणुकांमधील संयुक्त पुरोगामी आघाडीच्या विजयाबरोबर बुद्धीजीवी, सामाजिक लोकशाहीवादी इतकेच काय तर क्रांतिकारी कम्युनिस्टांचाही एक हिस्सा भारतीय जनता पक्षाच्या रुपात आलेले फासीवादी संकट टळल्याच्या आनंदात आहे. निवडणुकीचे निकाल आश्चर्यकारक असू शकतात आणि अडवाणीच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीसुद्धा विजय मिळवू शकते किंवा त्यांना संयुक्त पुरोगामी आघाडीइतक्या वा थोड्याबहुत कमी जास्त जागा मिळतील, असे निवडणुकांपूर्वीचे सर्वेक्षण सांगत होते. निवडणूक निकालांनी हे अंदाज खोटे ठरवले आणि कांग्रेसच्या नेतृत्वाखाली संयुक्त पुरोगामी आघाडीने विजय मिळवला. निवडणूक निकालांच्या दृष्टीने पाहिले तर भारतीज जनता पक्षाला मोठे नुकसान सहन करावे लागले आहे आणि पराभवानंतर भाजपमध्ये फुटीचे आणि आंतरिक वादाचे पर्व सुरू झाले आहे. भाजपच्या शीर्षस्थ विचारवंतांपैकी एक सुधींद्र कुलकर्णी यांनी पराभवाचं खापर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रणनीतीवर फोडून वादंग माजवले आहे. जसवंत सिंग यांनी पराभवाच्या कारणांवर भाजपमध्ये जाहीर चर्चेची मागणी केली आहे. भाजप मधील नेत्यांचा एक मोठा गट भाजप अध्यक्ष राजनाथ सिंग यांच्या नावे गळे काढत आहे आणि राजनाथ सिंग यांची अवस्था बिकट झाली आहे.

हा सगळा घटनाक्रम निश्चितपणे आनंद होण्यासारखाच आहे. परंतु केवळ हा निवडणूक निकाल आणि त्यानंतर भाजपमध्ये माजलेली सुंदोपसुंदी बघून भारतात फासीवादाला उतरती कळा लागली आहे, हे म्हणणे योग्य ठरेल का? भाजपचा पराभव हा भारतातील फासीवादाचा पराभव आहे हा निष्कर्ष योग्य आहे का? ह्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी आधी फासीवाद म्हणजे नेमकं काय आहे? त्याचा इतिहास काय आहे? त्याची उत्पत्ती कशी होते? वेग-वेगळ्या देशांत त्याने कोण-कोणते रूप धारण केले? हे समजून घेतले पाहिजे. ह्या प्रश्नांची उत्तरे दिल्यानंतरच आपण भारतात फासीवादाचं भवितव्य काय असेल ते सांगू शकू. फासीवादाचा इतिहास आणि आणि त्याचा अर्थ जाणून घेण्याअगोदर आपल्याला काही दुसऱ्या मुद्द्यांवर प्रारंभिक चर्चा करणे गरजेचे आहे. ह्या चर्चेनंतरच आपण फासीवादाचे विविध पैलू समजून घेण्यासाठीचा आधार तयार करू शकू. ही चर्चा भांडवलशाहीचे स्वरूप, तिचे स्वाभाविक संकट आणि त्याचे संभावित परिणाम ह्यासंबंधी आहे.

### भांडवलशाहीचे स्वाभाविक परिणाम भांडवली व्यवस्था कशा प्रकारे तिच्या स्वाभाविक गतीने संकटाकडे जाते?

आपण एका भांडवली व्यवस्थेत आणि समाजात जगत आहोत. त्याचे चारीत्रिक वैशिष्ट्य काय आहे? तर ही एक खाजगी मालकीवर आधारित व्यवस्था आहे व तिच्या केंद्रस्थानी खाजगी मालकाचा नफा आहे. खाजगी मालकांचा एक पूर्ण वर्ग आपापसात प्रतिस्पर्धा करतो आणि त्यांच्या ह्या प्रतिस्पर्धेचे मैदान असते भांडवली बाजार! भांडवली उत्पादन व्यवस्थेमध्ये समाजातील व्यापक वर्गांच्या गरजांचे कुठलेही विस्तृत मूल्यांकन आणि अनुमान लावले जात नाही. बाजारात मागणीच्या परिमाणाच्या ढोबळ मूल्यांकनाच्या आधारे भांडवलदार काय निर्माण करायचे आहे आणि ते किती प्रमाणात निर्माण करायचे आहे, हे ठरवतो. परंतु हे मूल्यांकन समस्त भांडवली वर्ग मिळून करत नाही. प्रत्येक भांडवलदार ते व्यक्तिगत पातळीवर करतो आणि त्याआधारे प्रतिस्पर्धा करण्यासाठी बाजारपेठेत उतरतो. त्यामुळे समाजात होणारे उत्पादन नियोजनपूर्वक न होता अराजक पद्धतीने होते. बाजाराकडून असलेली मागणी आणि पुरवठ्याच्या स्थितीनुसार प्रत्येक भांडवलशहा उत्पादनासंबंधी निर्णय घेतो. बाजारात वेगवेगळ्या क्षेत्रांचे अस्तित्व असते. ह्या सर्व क्षेत्रांचे ढोबळमानाने दोन वर्ग पाडले जाऊ शकतात - उपभोग्य वस्तूंचे उत्पादन आणि उत्पादनाच्या साधनांचे उत्पादन. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनामध्ये माणसाच्या दैनंदिन गरजेच्या वेगवेगळ्या वस्तूंच्या उत्पादनाचा समावेश होतो - उदाहरणार्थ खाण्याच्या वस्तू, कपडे, फ्रीज-टी.व्ही. मोटारी ह्यासारख्या उपभोग्य वस्तू, करमणुकीच्या वस्तू इत्यादी. उपभोग्य वस्तूंनाही दोन प्रकारात विभागले जाते - टिकाऊ वस्तू आणि चैनीच्या वस्तू. परंतु आपल्याला ह्या विभाजनात खोलवर जाण्याची (ह्या विषयाच्या अनुषंगाने) गरज नाही. प्रत्येक




**महामंदीच्या वेळी अमेरिकेत निदर्शने करणारी बेरोजगारी कामगारांची मुले. फलकांवर लिहिले आहे - तू माझ्या बाबांना नोकरी कां देऊ शकत नाहीस?**

क्रयवस्तच्या उत्पादनामध्ये एकापेक्षा जास्त भांडवलदार गुंतलेले असतात आणि ते आपआपल्या वस्तूंच्या विक्रीसाठीच्या प्रतिस्पर्धेत गुंतलेले असतात. त्यासाठी ते वृत्तपत्र, टी.व्ही., रेडीओ, विजेचे खांब, होर्डिंग्स, बस थांबे आणि रेल्वे स्टेशनवर असलेल्या जाहिरात फलकांचा वापर करतात आणि आपला माल सर्वोत्तम असल्याचे सांगतात.

उत्पादनाच्या साधनांच्या निर्मितीच्या क्षेत्रातही हीच परिस्थिती असते, पण थोड्याश्या वेगळ्या रुपात. ह्या क्षेत्रात मशिन्स, उपकरणे आणि औजारे ह्यांच्या बरोबरीनेच वेगवेगळ्या प्रकारच्या माध्यमिक कच्च्या मालाचे उत्पादन केले जाते. इथे उत्पादित सामग्रीचा उपभोक्ता सामान्य जनता नसून भांडवलदार वर्ग असतो. तो त्याच्या वस्तूंच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या उत्पादन-साधनांची खरेदी त्यांच्या उत्पादक भांडवलदारांकडून करत असतो. सध्या ही विभाजन रेखा खूप धुसर झाली आहे कारण बऱ्याच वेळा, एकच भांडवलदार क्रयवस्तूंच्या आणि उत्पादन-साधनांच्या उत्पादनामध्ये गुंतवणूक करतो. परंतु ह्यामुळे आपल्या विश्लेषणात काहीही फरक पडणार नाही. उत्पादनाच्या दोन्ही क्षेत्रांत उत्पादन आणि श्रमाच्या परिस्थितीचे विश्लेषण केले जाऊ शकते. परंतु सध्या आपला हा उद्देश नाही. उत्पादन-साधनांच्या निर्मितीच्या क्षेत्रातही एकाच मशीनच्या, उपकरणाच्या निर्मितीमध्ये एकापेक्षा जास्त भांडवलदार गुंतलेले असतात आणि क्रयवस्तूंचे उत्पादन करणाऱ्या भांडवलदारांना आपले उत्पादन विकण्याच्या प्रयत्नात असतात.

विभिन्न वस्तू आणि उत्पादन-साधनांच्या (मशिन्स, उपकरण इत्यादी) उत्पादनामध्ये वेगवेगळ्या वेळी वेगवेगळी स्थिती असते. कधी कोणत्या वस्तूचे उत्पादन अधिक फायदेशीर असते तर कधी कुठल्या. उदाहरणार्थ, अगदी काही वर्षांपूर्वी सूर्यफूल आणि पुदिन्याची जबरदस्त मागणी असल्याने भारतातील अनेक धनी आणि मोठ्या शेतकऱ्यांनी त्यांची शेती केली. कृषी क्षेत्रात सक्रिय असलेल्या भांडवलदारांनी बाजारातील मागणी आणि पुरवठ्याची परिस्थिती बघून सूर्यफूल आणि पुदिन्याच्या शेतीमध्ये भांडवल गुंतवण्यास सुरुवात केली. परंतु, ह्या स्थितीचे मूल्यांकन सर्व शेतकी भांडवलदारांनी मिळून केले नाही, तर वेगवेगळे केले. ज्याला कुणाला सूर्यफूल आणि पुदिन्याच्या शेतीसाठी आवश्यक मोठे भांडवल आणि कुशल मनुष्यबळ पुरवणे शक्य होते त्याने ह्यात भांडवल गुंतवणूक केली. ह्याचा परिणाम असा झाला की या दोन्ही उत्पादनांचे बाजारात अतिरिक्त उत्पादन झाले आणि त्यांचे उत्पादन खरेदी करण्यासाठी बाजारात पुरेशे खरेदीदारच उरले नाहीत. बाजारातील मागणी आणि पुरवठ्याची परिस्थिती बदलली. त्यामुळे पुदिना आणि सूर्यफूल ह्यांची बाजारपेठ कमी झाली. ह्या प्रक्रियेत बरेच मोठे, श्रीमंत शेतकरी - ज्यांनी मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवणुकीसाठी कर्ज घेतले होते ते उध्वस्त झाले. भारतात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे हेही एक कारण राहीले आहे. त्यांच्या उध्वस्त होण्यामुळे शेतीमध्ये गुंतलेले मजूर मोठ्या प्रमाणात बेरोजगार झाले आणि छोटे शेतकरी सर्वहाराच्या पंक्तीत जाऊन बसले. पूर्वी फायदेशीर नव्हता तो माल आता बाजारपेठेत फायदेशीर ठरला आहे. अशा पिकांमध्ये अगोदर पुरेशे भांडवल गुंतलेले होते आणि त्यांचे उत्पादन मागणीपेक्षा जास्त होत होते. त्याच कारणाने त्यातील भांडवल गुंतवणुक कमी होऊन ती अशा पिकांमध्ये झाली जिथे मागणी जास्त होती व गुंतवणूक कमी होती. अशाप्रकारे, भांडवली अर्थव्यवस्थेमध्ये भांडवल स्वाभाविकपणे जास्त फायद्याच्या वस्तूंच्या उत्पादनाकडे प्रवाहित होते. उत्पादनाची ही क्षेत्रे बदलत असतात आणि भांडवल अराजक पद्धतीने ह्या क्षेत्राकडून त्या क्षेत्राकडे वळत असते, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. ही प्रक्रिया भांडवली अर्थव्यवस्थेअंतर्गत एक संतुलनकारी प्रक्रिया असते. ती कागदावर वरकरणी अगदी सामान्य भासते पण वास्तवात ही एक अत्यंत विध्वंसक प्रक्रिया आहे. ह्या प्रक्रियेदरम्यान लाखो मजूर उध्वस्त होतात, आपल्या नोकऱ्या गमावतात आणि नारकीय जगणे जगण्यासाठी बाध्य होतात. हेच भांडवलशाहीच्या अराजकतेचे मूळ कारण आहे. खाजगी

**पान ९ वर**

# फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे?


पान ८ वरून

मालकीवर आधारीत अशी ही व्यवस्था आहे. तिच्या अंतर्गत वस्तूंचे उत्पादन समाजाच्या गरजेनुरूप होत नाही, तर भांडवलदार आपल्या नफ्यासाठी बाजारात एकमेकांशी प्रतिस्पर्धा करतात. ह्या प्रक्रियेत भांडवलदारांचा एक भाग उध्वस्त होऊन मध्यम वर्ग, निम्न मध्यम वर्ग किंवा सर्वहाराच्या पंक्तीमध्ये जाऊन बसतो, तर लाखो-करोडोंच्या संख्येने कामगार आपले रोजगार गमावतात आणि बेरोजगारांच्या गर्दीत सहभागी होतात. भांडवलशाही आपल्या अराजक गतीने कामगारांना बर्बाद करते आणि त्यांना बेरोजगारांच्या फौजेत भरती करते. ही मानव-केंद्रित व्यवस्था नसून एक नफा-केंद्रित व्यवस्था आहे.

भांडवली अर्थव्यवस्थेत विविध क्षेत्रांमध्ये मंदीसदृश स्थिती येत-जात असते. परंतु भांडवली व्यवस्थेत निश्चित अंतराने सार्वत्रिक संकटाची स्थिती उत्पन्न होत असते. जेव्हा बहुतेक क्षेत्रांमध्ये अति-उत्पादन होते आणि मंदी तयार होते, तेव्हा असे होते. हे कसे होते हे समजून घेणे इथे उपयुक्त ठरेल.

प्रतिस्पर्धेत टिकून राहण्यासाठी प्रत्येक भांडवलदार आपला उत्पादन खर्च कमी करतो. उत्पादन खर्च म्हणजे उत्पादनामध्ये लागणारे एकूण भांडवल. ह्या भांडवलाचे दोन भाग असतात - पहिले, स्थिर भांडवल, जे मशिन्स, इमारत, वीज, पाणी आणि कच्चा माल यासाठी लागते आणि दुसरे, परिवर्तनीय भांडवल, जे भांडवलदार कामगारांना त्यांच्या मजुरीच्या रुपात देतात. स्थिर भांडवलाला स्थिर ह्यासाठी म्हटले जाते कारण उत्पादन प्रक्रियेमध्ये हे भांडवल (दुसऱ्या रुपात) परावर्तीत होत नाही. त्याचे मूल्य सरळ-सरळ, कुठल्याही वाढीशिवाय उत्पादित वस्तूमध्ये स्थानांतरीत होते. काही वेळा स्थिर भांडवलाचे मूल्य लगेच वस्तू मध्ये रुपांतरीत होते. उदाहरणार्थ कच्चा माल, वीज इत्यादी. तर काही वेळा स्थिर भांडवलाचे मूल्य एका दीर्घ प्रक्रियेदरम्यान वस्तूमध्ये रुपांतरीत होते, उदाहरणार्थ मशिन्स, उपकरण इत्यादी. स्थिर भांडवलाचे मूल्य, ते झीज होऊन व त्यांचे आयुष्य संपून खराब होईपर्यंत मालामध्ये रुपांतरीत होत असते. एका वेळच्या उत्पादनामध्ये त्याच्या एकूण मूल्यापैकी एक भाग उत्पादित वस्तूमध्ये जातो. त्याला अवमूल्यन मूल्य म्हटले जाते. परंतु हे मूल्यही उत्पादन प्रक्रियेत वाढत-घटत नाही. हे जशास तसे उत्पादित वस्तूमध्ये जाते. ह्यामुळे मशिन्स आणि कच्च्या मालावर खर्च होणाऱ्या भांडवलाला स्थिर भांडवल म्हटले जाते. मजुरीच्या रुपात लागणाऱ्या भांडवलाला परिवर्तनीय भांडवल म्हणतात, कारण निरुपयोगी वस्तूंच्या समूहाला मशिन्स, उपकरणे ह्यांच्या सहाय्याने उपयोगी क्रयवस्तूचे रूप कामगारांचे श्रमच देत असतात. उत्पादित वस्तूंमध्ये उपयोग मूल्य म्हणजेच त्यांना उपयुक्त बनविणारा कारक मानवी श्रम हाच आहे. कुठलाही कारखाना किंवा मशिन्स स्वतःहून कच्च्या मालाला उपयुक्त वस्तूचे रूप देऊ शकत नाहीत. जोपर्यंत कच्च्या मालावर मानवी शारीरिक आणि मानसिक श्रम खर्च केले जात नाहीत तोपर्यंत तो कच्चा माल मूल्यहीन निरुपयोगी वस्तू असतो. जसे-जसे त्यावर कामगाराचे श्रम खर्च होतात, त्यांना आकार येऊ लागतो आणि त्यांची मिळून एक उपयोगी वस्तू तयार होते. एखादी वस्तू उपयोगी असेल तरच बाजारात कुणीतरी ती खरेदी करतो. कामगाराचे श्रमच वस्तूमध्ये उपयोग मूल्य तयार करतात. भांडवली समाजात कामगाराची श्रम शक्ती ही सुद्धा एक क्रयवस्तूच असते आणि तीसुद्धा बाजारात विकली जाते. श्रम-शक्तीची किंमत ही बाजारातील तिच्या मागणी आणि पुरवठ्यावर ठरते. उत्पादनाच्या प्रक्रियेत श्रम-शक्ती हाच तो कारक असतो ज्याचे मूल्य संवर्धित होऊन म्हणजेच वाढून वस्तूमध्ये रुपांतरित होते. त्याचमुळे भांडवलदाराकडून श्रम-शक्ती खरेदी करण्यासाठी लावलेल्या भांडवलाला परिवर्तनीय भांडवल म्हणतात कारण उत्पादन प्रक्रियेच्या अगोदरच्या तुलनेत त्याचा परिणाम वाढलेला असतो. या वाढलेल्या मूल्याला अर्थशास्त्राच्या भाषेत वरकड मूल्य म्हटले जाते. हे वरकड मूल्यच भांडवली व्यवस्थेमध्ये भांडवलदार वर्गाच्या फायद्याचे मूळ असते. हे मूल्य कामगाराच्या श्रमातून तयार होते परंतु ते भांडवलदाराकडून लुबाडले जाते.

वरकड मूल्य हेच भांडवलदाराच्या नफ्याचे उगमस्थान असते त्यामुळेच तो येन-केन प्रकारे त्याला वाढवण्याचा प्रयत्न करत असतो. हे वरकड मूल्य भांडवलदार दोन प्रकारे वाढवतो. एक, कामगाराचे कामाचे तास वाढवून आणि त्याच्या श्रमाची सघनता वाढवून आणि दुसरे, अधिक उन्नत मशिन्सचा वापर करून. पहिली पद्धत समजणे सोपे आहे. जर कामगाराने त्याच मजुरीवर किंवा थोड्या बहुत जास्त मजुरीवर जास्त वेळ काम केले तर तो जास्त वरकड मूल्य निर्माण करेल. हे अगदी सरळ आहे. दुसरी पद्धत थोडीशी क्लिष्ट आहे. चला, ती पद्धतही समजून घेऊयात. उन्नत मशिन्स लागल्यावर कामगाराचे श्रमसुद्धा अधिक उत्पादक होतील आणि तो अधिक दराने वरकड मूल्य तयार करेल. हे एका उदाहरणाने समजून घेऊ. समजा एका शिलाई कारखान्यात कामगार पायाने चालणाऱ्या शिलाई मशिन्सवर काम करतात. सध्या एक कामगार १२ तासांमध्ये १० कुर्ते शिवतो. कारखाना मालक पायावर चालणाऱ्या मशीन ऐवजी विजेवर चालणारी मशीन बसवतो. आता तोच कामगार १२ तासांत १८ कुर्ते शिवतो. ह्याचाच अर्थ त्या कामगाराच्या उत्पादन करण्याच्या गतीला वाढवले गेले आहे. आता उत्पादन सरळ १.८ पट वाढले आहे. ह्यासाठी भांडवलदाराला एका वेळेस थोडीशी भांडवल गुंतवणूक करावी लागते पण त्या बदल्यात तो प्रदीर्घ काळ वाढीव उत्पादकतेने काम करवून घेऊ शकतो. त्या बदल्यात भांडवलदार कामगाराला काहीच देत नाही किंवा त्याच्या मजुरीमध्ये नाममात्र वाढ करून देतो. कामगार हे समजू शकत नाही की त्याचे शोषण वाढले आहे आणि तो स्वतः काहीही न मिळवता भांडवलदाराचा फायदा कीतीतरी वेगाने वाढवत आहे.



**फासीवादचे दोन प्रमुख नेते - जर्मनीत हिटलर आणि इटलीमध्ये मुसोलिनी. दोघांनीही आपापल्या देशात कामगारांचे भयंकर दमन केले, ट्रेड यूनियनना चिरडून टाकले. दोघांनाही औद्योगिक घराण्याचा जबरदस्त पाठिंबा होता. हिटलरने दुसऱ्या जागतिक युद्धाच्या काळात लाखों यहुद्यांना, कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना, कामगारांना गॅस चेंबरमध्ये विषारी वायूत कोंडून मारले. तरीही, आजशुद्धा अशा फासीवादी संघटना आपल्या देशात (आणि जगभरात) अस्तित्त्वात आहेत ज्या त्यांना आपले आदर्श मानतात.**

भांडवलदार एकूण भांडवलातील खर्चाचा टक्का कमी करून वरकड मूल्य वेग-वेगळ्या पद्धतीने वाढवतो हे स्पष्टच आहे. उत्पादन मोठ्या प्रमाणावर करूनच तो हे साध्य करू शकतो. उत्पादन जितक्या मोठ्या प्रमाणावर होईल तेवढा एकूण भांडवलातील खर्चाचा टक्का कमी होतो. वरकड मूल्य वाढवण्यासाठी भांडवलदार ज्या मार्गांचा उपयोग करतो त्यामुळे उत्पादन आपोआपच मोठ्या प्रमाणावर होते. ह्याचाच अर्थ, भांडवलदार निरंतर ह्याच प्रयत्नात असतो की उत्पादन जास्तीत-जास्त मोठ्या प्रमाणात व्हावे, जेणेकरून वरकड मूल्य वाढेल आणि खर्चाचा टक्का एकूण भांडवलाच्या तुलनेत कमी होईल. पण उत्पादन वाढवण्याच्या ह्या आंधळ्या शर्यतीत तो हे विसरतो की ते उत्पादन विकत घेण्यासाठी बाजारात तेवढे खरेदीदारसुद्धा असायला हवेत. हे केवळ एका भांडवलदाराबरोबरच होते असे नव्हे तर संपूर्ण भांडवलदार वर्गाच्या बाबतीत होते. अंतर्गत प्रतिस्पर्धा आणि एकमेकांना गिळून टाकण्याच्या इच्छेने प्रत्येक भांडवलदार वस्तूंच्या उत्पादनाच्या क्षेत्रात वस्तूंचे उत्पादन लाभदायक सीमेच्या पुढे घेऊन जातो आणि त्या पूर्ण क्षेत्रातच अतिरिक्त उत्पादन होते. हीच प्रक्रिया इतर क्षेत्रांतसुद्धा घडत राहते. ठराविक अंतराने भांडवली अर्थव्यवस्थेमधील बहुतेक क्षेत्रे अतिरिक्त उत्पादनाच्या समस्येने ग्रस्त होतात आणि संपूर्ण अर्थव्यवस्था मंदीच्या गर्तेत सापडते. भांडवली अर्थव्यवस्थेची गतीच अशी असते की ती समाजातील क्रयक्षमता (वस्तू खरेदी करण्याची क्षमता) असलेल्या लोकांची संख्या कमी-कमी करत जाते, हे येथे समजून घेणे गरजेचे आहे. भांडवलदार कामगारांना लुटूनच नफ्यात वाढ करत जातो. जेव्हा तो उत्पादन वाढवण्यासाठी आधुनिक मशिन्स बसवतो तेव्हा काही कामगारांना कामावरून कमी करतो कारण आता पूर्वीपेक्षा कमी कामगारच आधुनिक मशिन्सच्या मदतीने पूर्वीच्या उत्पादन क्षमतेपेक्षा जास्त उत्पादन करू शकतात. ह्या प्रक्रियेमध्ये समाजात बेरोजगारांची मोठी फौज तयार होते आणि बहुसंख्याक लोक स्वतःची क्रयशक्ती गमावून बसतात. अशा प्रकारे एकीकडे उत्पादनात वाढ होते, बाजारपेठा वस्तूंनी भरून जातात पण दुसरीकडून त्या वस्तू घेणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत जाते. हेच ते भांडवलशाहीचे संकट आहे जे निश्चित अंतराने आधीपेक्षा अक्राळ-विक्राळ स्वरुपात येऊन सतावत राहते आणि भांडवलशाहीला तिच्या थडग्याकडे ढकलते. हे एक असे संकट आहे ज्यापासून भांडवली व्यवस्था इच्छा असूनही मुक्त होऊ शकत नाही. एका योजनाबद्ध माणूस-केन्द्री व्यवस्थेच्या माध्यमातूनच ह्या संकटातून सुटका होऊ शकते - उत्पादनाची साधने आणि संपूर्ण समाजरचनेवर कामगारांच्या सामूहिक मालकीच्या स्वरूपातच हे शक्य आहे. भांडवलशाहीने असे केले तर ती भांडवलशाही राहणारच नाही. ह्या व्यवस्थेला चालवणारा भांडवलदार वर्ग कधीही त्याच्या वैयक्तिक नफ्यावर पाणी सोडणे शक्य नाही. त्याचमुळे भांडवली व्यवस्थेला केवळ संपवणे शक्य आहे. तिच्यात कुठलाही सुधार करणे शक्य नाही. कारण प्रतिस्पर्धा, खाजगी मालकी आणि खाजगी नफ्यावरती उभी असलेली अशी ही व्यवस्था आहे.

## साम्राज्यवादी युगात भांडवलशाही

भांडवलशाहीच्या ह्याच संकटाने मानव-समाजाला दोन महायुद्धांना सामोरे जाण्यास भाग पाडले. १८७० च्या दशकानंतर युरोपीय देशांतील भांडवलशाहीला भयंकररित्या ह्या अति-उत्पादनाच्या संकटाने ग्रासले होते. ब्रिटन, फ्रान्स, हॉलण्ड, पोर्तुगाल, स्पेनसारख्या काही देशांकडे पूर्वीपासूनच काही स्थापित वसाहती होत्या. त्यामुळे ते अति-उत्पादित वस्तू आपल्या देशाबाहेर आपल्या वसाहतींमध्ये विकू शकत होते. वस्तूंच्या विक्रीबरोबरच उत्पादनाचा खर्च अजून कमी करण्याच्या हेतूने स्वस्त मानवी श्रम मिळवण्यासाठी ह्या वसाहतींमध्ये भांडवल गुंतवणूक करू लागले होते. म्हणजेच वसाहतींमध्येच कारखाने उभे करून गुलाम देशांमधील स्वस्त श्रमाची लुट करत होते. लवकरच ही शक्यताही लुप्त झाली आणि १९१० चे दशक येता-येता जागतिक भांडवली अर्थव्यवस्था पुन्हा अति-उत्पादन आणि मंदीने ग्रस्त झाली. त्याचबरोबर, वसाहती नसलेल्या इतर युरोपीय भांडवली शक्तींयचा उदय झाला. अशा देशांपैकी जर्मनीचे नाव सर्वांत ठळकपणे घ्यावे लागेल. ह्या देशांमध्ये तयार झालेले भांडवली संकट आणि ह्या देशांची आर्थिक व सैन्यशक्ती वाढण्याबरोबरच जागतिक स्तरावर गरीब देशांमधील भांडवली लुटीच्या पुनर्वितरणाचा प्रश्न ऐरणीवर आला. हा प्रश्न सोडवण्यासाठीच भांडवली देशांमधील राज्यकर्त्या वर्गाने संपूर्ण जगाला पहिल्या साम्राज्यवादी महायुद्धात लोटले. ह्यात जर्मनी आणि तिच्या मित्र देशांना पराभव पत्करावा लागला. परंतु त्याचबरोबर ह्या युद्धाने रशियातील महान क्रांतीसाठीसुद्धा सुपीक जमीन तयार केली. खरे तर, क्रांतीसाठीची सुपीक जमीन जर्मनीमध्येसुद्धा तयार झाली होती. जर्मनीतील कामगार चळवळ रशियातील कामगार चळवळीच्या तुलनेत मजबूत असूनही जर्मनीतील सामाजिक-लोकशाहीवाद्यांचा ऐतिहासिक विश्वासघात आणि काऊत्स्कीच्या नेतृत्वाखाली सामाजिक-लोकशाहीवादी पक्षाच्या साम्राज्यवादी भांडवलशाहीच्या गळ्यात गळे घालण्याच्या धोरणामुळे तिथे क्रांती होऊ शकली नाही. पहिल्या महायुद्धातील जर्मनी आणि ऑस्ट्रिया-हंगेरीच्या पराभवानंतरच्या कालखंडात रशियात समाजवादाच्या झेंड्याखाली अभूतपूर्व प्रगती करून रशियाने संपूर्ण जगासमोर एक अद्वितीय मॉडेल प्रस्तुत केले. दुसरीकडे, पहिल्या जागतिक महायुद्धात शस्त्रे विकून आणि कर्ज वाटून अमेरिकन संघराज्याने मोठ्या प्रमाणात नफा कमावला. पण पहिल्या जागतिक महायुद्धाचा शेवट होऊन एक दशक उलटता-उलटता ह्याच अमेरिकन संघराज्यात भांडवली व्यवस्थेतील आतापर्यंतच्या सर्वांत मोठ्या संकटाचा उदय झाला. त्याला आपण जागतिक महामंदी म्हणून ओळखतो. १९२९ ते १९३१ पर्यंत चाललेल्या ह्या महामंदीने रशिया सोडून जगातील सर्व देशांना गंभीररित्या प्रभावित केले. विशेषकरून, अमेरिका आणि युरोपीय देशांना. ह्या मंदीनंतरच फासीवादाने इटली आणि जर्मनीमध्ये जबरदस्त पाय पसरले. महामंदीने जर्मनी आणि इटली मध्ये फासीवाद कशा पद्धतीने निर्माण झाला आणि महामंदीने त्याला कसे बळकट केले, इतर देशांमध्ये फासीवाद जम का बसवू शकला नाही, ह्या प्रश्नांवर आम्ही आमचे मत पुढे व्यक्त करू. तत्पूर्वी, द्वितीय जागतिक महायुद्धानंतरच्या संकटाच्या इतिहासाबद्दल थोडेसे!

दुसऱ्या महायुद्धात सर्वांत कमी नुकसान अमेरिकन संघराज्याचे झाले आणि सर्वांत जास्त नुकसान सोविएत रशियाचे झाले. संपूर्ण युरोपची राख-रांगोळी झाली. अमेरिकेने युरोप आणि जपानच्या पुनर्निर्माणाच्या माध्यमातून गुंतवणुकीच्या शक्यतांचा उपयोग केला आणि आपली मंदी कमीत कमी ३० वर्षांसाठी टाळली. १९५० ये १९७० पर्यंत अमेरिकन भांडवलशाहीने मोठ्या प्रमाणात नफा कमावला. १९६० च्या दशकाला तर अमेरिकेमध्ये सुवर्ण युग म्हणूनच ओळखले जाते. अति-उत्पादनाच्या संकटावर मात करण्यासाठी भांडवलशाहीकडे एकमेव

पान १० वर

# फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे?

पान ९ वरून

उपाय असतो - उत्पादक शक्तींचा विनाश. त्यामुळे त्यांच्या पुनर्निर्मितीच्या शक्यता मोठ्या प्रमाणात तयार करणे शक्य होते. उत्पादक शक्तींचा हा विनाश वेळोवेळी साम्राज्यवादी युद्धांद्वारे घडवून आणला जातो. १९७० चे दशक येताच जागतिक भांडवलशाहीला पुन्हा एकदा संकटाने घेरले. त्यानंतर जागतिक भांडवलशाही ह्या संकटातून बाहेर पडते न पडते तोच १९८० च्या दशकाच्या मध्यावर पुन्हा एकदा तिला संकटाने घेरले. त्यानंतर जागतिकीकरणाच्या धोरणांच्या सुरुवातीबरोबरच जागतिक साम्राज्यवादाने एका नवीन टप्प्यात प्रवेश केला. जागतिकीकरणाच्या युगात भांडवलशाहीने मंदी दूर करण्यासाठी एक नवी रणनीती आखली. वित्तीय भांडवलाच्या वर्चस्वाच्या ह्या कालखंडात भांडवलाची अति-उपलब्धता आणि मंदी अशा दुहेरी संकटाला दूर करण्यासाठी बँकांमार्फत ग्राहकांना कर्ज देण्यास सुरुवात केली. मध्यम वर्गापर्यंतच्या लोकांना वस्तू खरेदी करण्यासाठी कर्ज देण्याची प्रथा जगभर सुरु केली गेली. म्हणजेच, सर्वप्रथम लोकांची क्रयशक्ती संपवून बाजारपेठ वस्तूंनी भरून टाकल्या आणि जेव्हा खरेदी करणारे लोकच उरले नाहीत तेव्हा काही काळासाठीच का होईना मंदी टाळण्यासाठी स्वतःच लोकांना व्याजाने पैसे देऊन त्या वस्तू खरेदी करावयास लावल्या. पण लवकरच मध्यमवर्गाला कर्ज देऊन वस्तू विकत घ्यावयास लावण्याच्या शक्यता समाप्त झाल्या. त्यानंतर, तात्पुरती का होईना, मंदी दूर करण्यासाठी कर्जाचे व्याज चुकवण्याचीही ज्यांची क्षमता नव्हती अशा लोकांनाही कर्ज देण्यास सुरुवात झाली. लवकरच ही शक्यताही संपुष्टात आली आणि २००६ मध्ये सुरु झालेल्या मंदीच्या रुपात भांडवलशाहीच्या समोर महामंदीनंतरचे सगळ्यात मोठे संकट उभे ठाकले आहे. त्यातून भांडवलशाहीला बाहेर काढण्यासाठी जगभरातील भांडवली महाविद्वान द्रविडी प्राणायाम करत आहेत.


थोडक्यात, भांडवलशाही तिच्या स्वभावानुसार नैसर्गिकपणे वेळोवेळी संकटांना जन्म देते. संकटांमधून बाहेर पडण्यासाठी युद्धे खेळली जातात. पण हा एक तात्पुरता मार्ग असतो आणि मंदीचा हा भांडवली वेताळ पुन्हा त्याच फांदीवर येऊन लटकतो. साम्राज्यवादी युगात जागतिक भांडवलशाहीने स्वतःची कार्यप्रणाली जरी बदलली असली तरी सव्वाशे वर्ष निघून जाता-जाता त्यातील हवा निघून गेली आहे आणि आता परत ती त्याच अटळ संकटाला सामोरी जात आहे.

### भांडवली संकटाच्या संभावित प्रतिक्रिया

संकटकाळात बेरोजगारी वेगाने वाढते. संकटकाळात अति-उत्पादन झाल्यामुळे आणि उत्पादित वस्तू बाजारात पडून राहिल्यामुळे भांडवलदारांचा नफा परत त्यांच्या हाती येत नाही. तो वस्तूंच्या रुपात बाजारपेठेत अडकून पडतो. परिणामी भांडवलदार अधिक उत्पादन करू इच्छित नाही आणि उत्पादनात कपात करतो. ह्या कारणामुळे तो भांडवली गुंतवणुकीमध्ये कपात करतो, कारखाने बंद करतो, कामगारांना कामावरून काढून टाकतो. २००६ मध्ये सुरु झालेल्या मंदीमध्ये एकट्या अमेरिकेमध्ये जवळपास ८५ लाख लोक बेरोजगार झाले होते. भारतामध्ये मंदीच्या सुरुवातीनंतर जवळपास १ कोटी लोकांना आपल्या नोकऱ्यांवर पाणी सोडावे लागले आहे. बेरोजगारांच्या संख्येमध्ये जगभर करोडो लोकांची भर पडली आहे. ह्यामुळे केवळ तिसऱ्या जगातील गरीब भांडवली देशच नव्हे तर युरोपीय देशांमध्ये सुद्धा दंगली होत आहेत. ग्रीस, फ्रान्स, इंग्लंड, आईसलंड आदी देशांमध्ये मागील काही दिवसांमध्ये झालेल्या दंगली आणि आंदोलने ह्या मंदीचाच परिपाक आहेत. संपूर्ण जगातील भांडवली देशांमधील शासकवर्गाने ह्या मंदीमुळे निर्माण झालेल्या जनक्षोभास ज्या पद्धतीने उत्तर दिले आहे त्यात नवीन असे काहीही नाही. हे उत्तर म्हणजे कल्याणकारी राज्याचा केन्सिअन उपाय. हे 'कल्याणकारी' राज्य काय करते हे समजून घेणेही गरजेचे आहे.

मंदीमुळे सर्वप्रथम कामगार वर्ग, गरीब आणि निम्न मध्यम शेतकरी, शेतमजूर, शहरी निम्न मध्यम वर्ग आणि मध्यम वर्ग उध्वस्त होतात. हे सगळे मिळून एकूण लोकसंख्येच्या जवळपास ९० टक्के असतात. ह्या व्यतिरिक्त छोटे व्यापारी आणि दलालांचा एक वर्गही ह्यात उध्वस्त होतो. ह्या कारणाने एकंदरीत समाजाच्या ९० टक्के जनतेसाठी भयंकर आर्थिक आणि सामाजिक असुरक्षिततेचे वातावरण तयार होते. ह्यातून मोठ्या प्रमाणात व्यापक आणि तीव्र जन-असंतोष तयार होतो. तो संपूर्ण व्यवस्थेलाच धोका ठरू शकतो. ह्या धोक्यापासून भांडवलशाहीचा बचाव करण्यासाठी १९३० च्या दशकात भांडवलशाहीचा निष्णात वैद्य म्हणवला गेलेल्या जॉन मेनोर्ड कीन्सने अराजक भांडवलशाहीला थोड्या-थोड्या प्रमाणात व्यवस्थित करण्याची गरज प्रतिपादित केली. जर खाजगी प्रतिस्पर्धा करणारी भांडवलशाही आणि एकाधिकारशाही ह्यांना मुक्त बाजारपेठेत खुले सोडले तर भांडवलाची अराजक गती आत्मघातकी रुपात अशी परिस्थिति उत्पन्न करेल जी सगळ्या भांडवली व्यवस्थेलाच गिळंकृत करेल. त्यामुळेच संयम पाळण्याची आवश्यकता आहे. व्यवस्थापनाचे हे कार्य भांडवली राज्याला पार पाडावे लागेल. त्याला काही अशा लोक-कल्याणकारी योजनांमध्ये गुंतवणूक करावी लागेल जेणे करून जनतेला आर्थिक आणि सामाजिक सुरक्षा मिळाल्याचा भास व्हावा. उदाहरणार्थ, सार्वजनिक क्षेत्रामध्ये गुंतवणूक करून रोजगार निर्माण करावे लागतील, विमा योजना कार्यान्वित कराव्या लागतील, काही पायाभूत क्षेत्रांना, उदाहरणार्थ - परिवहन, दूरसंचार इत्यादि - ह्यांना सरकारी नियंत्रणात ठेवावे लागेल, खाजगी क्षेत्रावर काही प्रमाणात लगाम बसवावा लागेल, जनतेला घरे उपलब्ध करून देण्यासाठी काही योजना सुरु कराव्या लागतील, कामगारांचे पगार काही अंशी वाढवावे लागतील इत्यादि इत्यादी. म्हणजेच, लोकांचा असंतोष तात्पुरत्या स्वरुपात थंड करण्यासाठीची काही सुधारात्मक पाऊले उचलावी लागतील! अशा प्रकारचे कार्य करणाऱ्या राज्यालाच "कल्याणकारी" राज्य म्हटले जाते. हे तथाकथित कल्याणकारी राज्य भांडवलशाहीच्या दूरगामी कल्याणासाठी आणि जनतेच्या मनात तात्पुरत्या कल्याणाची खोटी जाणीव तयार करण्यासाठी उभे केले जाते, हे वेगळे सांगायला नकोच.

पण ह्या कल्याणकारी राज्याची मुख्य अडचण असते ती म्हणजे त्याचा भरमसाठ खर्च! ह्या सगळ्या लोक-कल्याणकारी योजना लागू करण्यासाठी भांडवलदारांच्या नफ्यावर थोडासा अंकुश लावावा लागतो आणि कामगारांना थोड्याशा सवलती द्याव्या लागतात. ज्या देशामध्ये भांडवलशाहीची स्थापना सामंतवादविरोधी क्रांतीतून झाली आणि जिथे भांडवलशाहीच्या विकासाची खोलवर रुजलेली प्रक्रिया चालली, त्या ठिकाणी भांडवलदार वर्ग ह्या कल्याणकारी राज्याचे खर्च उचलू शकण्याच्या आर्थिक स्थितीत होता आणि राजकीयदृष्ट्या इतका चेतना-संपन्न होता की ह्या "कल्याणकारी" राज्याला काही काळ चालू ठेवेल आणि काही अवधी नंतर पुन्हा मोकाट जनावरासारख्या भांडवलशाहीची सुरुवात करेल. ज्या देशांमध्ये भांडवलशाही कुठल्याही क्रांतिकारी बदलातून नव्हे तर क्रमिक प्रक्रियेतून आली त्या ठिकाणी अशा "कल्याणकारी" राज्याचे काही वेगळेच परिणाम समोर आले. ह्या देशांमध्ये जर्मनी आणि इटली अग्रणी होते. जर्मनीचे भांडवलशाहीमधील संक्रमण हे भांडवली क्रांतीमधून झालेले नव्हते. तिथे क्रांतिकारी जमीन सुधारणा लागू झाल्या नाहीत तर सामंती जमीनदारांनाच भांडवली जमीन मालकांमध्ये रुपांतरीत होण्याची संधी देण्यात आली. औद्योगिक भांडवलदार वर्ग राज्याद्वारे दिल्या गेलेल्या मदतीतून उभा राहिला, एका दीर्घ अशा भांडवली विकासाच्या स्वाभाविक प्रक्रियेमधून नाही. इंग्लंड किंवा फ्रान्समध्ये घडले तशा प्रकारे नाही. कल्याणकारी राज्याच्या परिणामांवर येथील भांडवली वर्ग, कुलक आणि श्रीमंत शेतकऱ्यांची प्रतिक्रिया इंग्लंड, अमेरिका आणि फ्रान्सच्या भांडवलदार वर्गापेक्षा एकदम निराळी होती. ह्या शासनकर्त्या वर्गाच्या वेगळ्या प्रकारच्या प्रतिक्रियेने जर्मनी आणि इटलीमध्ये फासीवादाच्या विकासाची सुपीक जमीन तयार केली. शिवाय, आणखी एका कारकाने फासीवादाच्या उभारीमध्ये मोठी भूमिका पार पाडली. हा कारक होता जर्मनी आणि इटलीच्या सामाजिक-लोकशाही आंदोलनाने केलेला विश्वासघात आणि कामगार चळवळीचे भांडवली कुंपणात मर्यादित राहणे. जर्मनीच्या सामाजिक-लोकशाहीवादी पक्षाच्या नेतृत्वाखाली मोठी कामगार चळवळ होती. तिने १९१९ पासून १९३१ पर्यंत भांडवली राज्याकडून कामगारांसाठी बरेच अधिकार मिळवले होते. जर्मनीमध्ये कामगारांचे वेतन हे युरोपातील कुठल्याही देशापेक्षा जास्त होते. एकूण राष्ट्रीय उत्पादनात कामगारांचा वाटा युरोपातील कुठल्याही देशातील कामगारांपेक्षा जास्त होता. परंतु सामाजिक-लोकशाहीवादी ह्याच्या पुढे जाऊ शकले नाहीत. ते यथास्थिती टिकवू पाहत होते आणि त्यामुळेच कामगार चळवळीला सुधारवादी संसदवाद आणि अर्थवादाच्या काळोख्या गल्ल्यांमध्ये फिरवत राहीले.



फासीवादाच्या धोक्यावर फक्त संघटित कामगार वर्गच मात करू शकतो

पण दुसरीकडे, जर्मनीतील भांडवलदार वर्ग कामगारांना मिळणाऱ्या ह्या सवलती आणि सुविधांवरील खर्च सहन करण्याची कुवत गमावत चालला होता. कारण ह्यामुळे त्यांची भांडवली संचयाची गती कमी झाली होती, काही अंशी चक्क थंडावली होती. ह्या कारणाने जागतिक प्रतिस्पर्धेत त्याचे टिकून राहणे दुरापास्त झाले होते. १९२८ पर्यंत, औद्योगिक उत्पादनामध्ये, जर्मनी संयुक्त अमेरिकन संघराज्यानंतरचा दुसरा देश बनला होता आणि तिच्या उत्पादकतेची गतीसुद्धा अमेरिकेनंतर सर्वाधिक होती. त्याचबरोबर जागतिक स्तरावर जर्मनीची साम्राज्यवादी प्रतिस्पर्धासुद्धा अधिकाधिक तीव्र होत चालली होती. पण देशांतर्गत पातळीवर कामगारांच्या सशक्त सुधारवादी आंदोलनामुळे त्यांचा नफ्याचा दर दिवसेंदिवस कमी होत चालला होता. याला इतिहासकारांनी "नफ्याचे आकुंचन" असे नाव दिले आहे. नेमक्या ह्याच वेळी जर्मन अर्थव्यवस्थेला जागतिक महामंदीचा फटका बसला. अगोदरच नफ्याच्या आकुंचनामुळे हैराण झालेल्या जर्मन भांडवलदार वर्गासाठी हे अत्यंत त्रासदायक होते. परिणामी सर्वप्रथम जर्मनीतील छोटा भांडवलदार उद्ध्वस्त होण्यास सुरुवात झाली. बड्या भांडवलदार वर्गालासुद्धा मोठे नुकसान सहन करावे लागले. बेरोजगारीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. शहरी निम्न मध्यमवर्गामध्ये सुद्धा बेकारी वेगाने वाढली. ज्यांच्या हाताला काम होते त्यांच्या डोक्यावरसुद्धा बेकारीची टांगती तलवार होतीच. अशा सगळ्या असुरक्षिततेच्या परिस्थितीने निम्न भांडवलदार वर्ग, व्यापारी वर्ग आणि शहरी बेकारांचा एक वर्ग ह्यांच्या मध्ये प्रतिक्रियावादाची जमीन तयार केली. हीच ती सुपीक जमीन होती जिच्यावर जर्मन राष्ट्रीय समाजवादी कामगार पक्षाने (हिटलरचा नात्झी पक्ष) एक प्रतिक्रियावादी आंदोलन उभे केले. त्याच्या शीर्ष स्थानी निम्न भांडवलदार वर्ग, पांढरपेशा मध्यमवर्ग, शहरी सुशिक्षित मध्यमवर्ग, लंपट सर्वहारा आणि त्याचबरोबर सर्वहारा वर्गाचा एक हिस्सासुद्धा सहभागी झाला होता.

असुरक्षिततेच्या ह्या वातावरणात भांडवलशाहीचा पर्दाफाश करून भांडवलशाही जनतेला फक्त गरिबी, बेरोजगारी, असुरक्षा आणि भूक ह्याच गोष्टी देऊ शकते, हे जनतेला सांगण्याची जबाबदारी क्रांतिकारी कम्युनिस्ट पक्षाची होती. ह्यावर सुधारवादाच्या माध्यमातून ठिगळ जोडून, अर्थवादाच्या माध्यमातून थोडे बहुत भत्ते वाढवून आणि संसदबाजीच्या माध्यमातून मात केली जाऊ शकत नाही. ह्यावरचा एकमेव उपाय म्हणजे म्हणजे कामगार वर्गाच्या पक्षाच्या नेतृत्वामध्ये, कामगार वर्गाच्या विचारधारेच्या प्रकाशात, कामगार वर्गाची क्रांती! परंतु सामाजिक-लोकशाहीवाद्यांनी संपूर्ण कामगार वर्गाला चुकीच्या मार्गाने नेले आणि शेवटी हिटलरने सत्ता हाती घेईपर्यंत ते नात्झी-विरोधी संसदीय आघाडी उघडण्याचे प्रयत्न करीत राहिले. ह्याचा परिणाम असा झाला की हिटलर भांडवलशाहीने निर्माण केलेल्या असुरक्षिततेच्या वातावरणात निर्माण झालेल्या प्रतिक्रियावादाच्या लाटेवर स्वार होऊन सत्तेत आला. त्यानंतर कामगार, कम्युनिस्ट, ट्रेड युनियनवादी आणि ज्यूंच्या शिरकाणाचे जे तांडव-नृत्य त्याने सुरु केले त्याच्या नुसत्या आठवणीने आजही काळजाचा थरकाप उडतो! सामाजिक-लोकशाहावाद्यांनी कामगार वर्गाशी केलेल्या विश्वासघातामुळेच जर्मनीमध्ये फासीवाद विजयी होऊ शकला. जर्मन कम्युनिस्ट पक्ष कामगार वर्गाला संघटित करू शकण्यात आणि त्याला क्रांतीच्या दिशेने अग्रेसर करण्यात अपयशी ठरला. परिणामी फासीवादाचा प्रतिरोध करणे शक्य असूनही प्रतिरोध केला जाऊ शकला नाही आणि फासीवाद फोफावला.

**जर्मनीमध्ये फासीवादाचा विजय कसा झाला हे आपण पुढच्या अंकात पाहू. जर्मनीच्या उदाहरणातून आपण फासीवादाच्या उदयाची कारणे सुस्पष्टपणे समजू शकू व त्याचे साधारणीकरण करू शकू. भारतात फासीवादासाठी आधारभूमी कशी अस्तित्वात आहे आणि भारतात अस्तित्वा शकत असलेल्याक फासीवादाचा सामना येथील क्रांतिकारी आंदोलन कशा प्रकारे करू शकते, हे त्यात साधारणीकरणाचे निष्कर्ष भारताला लागू करून आपण समजू शकतो.**

**.....उर्वरीत पुढील अंकात**

●

# या मृत्यूंचे कारण आजार आहे की आणखी काही?

नवमीत

काही दिवसांपूर्वीची बातमी आहे. दिल्ली या देशाच्या राजधानीत डेंगूची लागण झालेल्या एका सहा वर्षाच्या मुलाचा वेळेत उपचार न मिळू शकल्यामुळे मृत्यू झाला. मुलाचे आईवडील आजारी मुलाला घेऊन या इस्पितळातून त्या इस्पितळात धावपळ करीत राहिले, मात्र मुलाला ना सरकारी इस्पितळात दाखल करून घेण्यात आले ना खाजगी इस्पितळात. सरकारी इस्पितळांनी नेहमीचेच उत्तर दिले की त्यांच्याकडे रिकामी खाट नाही. मुलाचे आईवडील निम्न मध्यवर्गातील असल्याने मोठ्या कॉर्पोरेट इस्पितळांतील फी त्यांना परवडण्यासारखी नव्हती. शेवटी एका खाजगी इस्पितळात जेव्हा त्याला दाखल करण्यात आले त्यावेळी खूपच उशीर झाला होता आणि हा मुलगा अखेरीस या नफेखोर व्यवस्थेला बळी पडला. त्यानंतर या धक्क्याने मुलाच्या आईवडिलांनीसुद्धा आत्महत्या केली. परंतु हे काही नवीन प्रकरण नाही किंवा असे पहिल्यांदाच घडले, असेही नाही. गेल्या दोन दशकांपासून दर वर्षी देशभरात आणि प्रामुख्याने दिल्लीत डेंग्यूचा फैलाव होत असतो. फक्त डेंग्यूच नाही तर मलेरिया, जपानी ताप, इन्फ्लुएन्झा, हैजासारखे आजार दर वर्षी लाखो लोकांचे जीव घेत असतात. आज आरोग्य विज्ञानाने इतकी प्रगती केलेली आहे की आपण बहुतेक आजारांवर उपचार करू शकतो आणि अन्य आजारांचा फैलाव रोखू शकतो. परंतु इतके संशोधन आणि विकासानंतरसुद्धा देशातील जनतेवर या आजारांचे घातक आक्रमण होत असते. एका अभ्यासानुसार भारतात दर वर्षी डेंग्यूची ६० लाख प्रकरणे अशी असतात ज्यांची नोंद होत नाही. जागतिक आरोग्य संघटनेनुसार भारतात दर वर्षी मलेरियाच्या एकूण १०००००० प्रकरणांची नोंद होते, व त्यांपैकी १५००० रुग्णांचे मृत्यू होतात, तर दुसऱ्या एका अभ्यासानुसार भारतात दर वर्षी मलेरियामुळे २००००० मृत्यू होत असतात ज्यांची नोंद होत नाही. भारत सरकारच्या आकड्यांनुसार दर वर्षी जपानी तापाची १७४१ ते ६५९४ पर्यंत प्रकरणे समोर येतात व त्यांपैकी ३६७ ते १६६५ पर्यंत मृत्युमुखी पडतात. अशाच प्रकारे टायफॉईडबद्दल बोलायचे झाले तर या आजाराची भारतात दर वर्षी १० लाख लोकांना लागण होते. ढोबळमानाने दर १ लाख लोकांपैकी ८८ लोक या आजाराचा दर वर्षी बळी ठरतात. या आकड्यांवरून देशातील आरोग्याचे एक भयावह चित्र उभे राहते हे स्पष्टच आहे. परंतु ही मानवताविरोधी व्यवस्था या रोगांच्या उपचारावेळी त्याहून भयावह चित्र आपल्यासमोर उभे करते.

आज आपल्यापाशी बहुतेक आजारांवर औषधे आहेत. औषधे उपलब्ध आहेत एवढेच नाही तर त्यांचा भलामोठा साठा आपल्यापाशी आहे. अशा वेळी खरेतर प्रत्येक माणसाला वेळोवेळी व मोफत औषधे मिळायला हवीत, परंतु बहुसंख्य जनतेला अत्यंत गरजेची औषधेसुद्धा मिळू शकत नाहीत. ही औषधे त्यांच्यासाठी उपलब्ध नाहीत, किंवा जेथे ती उपलब्ध आहेत तिथपर्यंत बहुतेक लोक पोचू शकत नाहीत. भारतात जवळपास दोन तृतियांश जनतेला वेळीच औषधे मिळत नाहीत. मोठी लोकसंख्या धड पोटभर अन्न मिळवू शकत नाही, मग ती औषधांसाठी पैसा कुठून खर्च करणार? काही वर्षांपूर्वी हरयाणा आणि राजस्थान सरकारने सर्व सरकारी इस्पितळांमध्ये आणि मेडिकल कॉलेजांमध्ये मोफत औषधे उपलब्ध करण्याची योजना सुरू केली होती. भांडवली घाण झाकण्यासाठी बऱ्याचदा राज्यसत्ता अशा कल्याणकारी योजना सुरु करीत असते. परंतु बहुसंख्य कष्टकरी जनतेला या कल्याणकारी योजनांचा कसलाही लाभ मिळू शकत नाही, आणखी भयंकर अशी विडंबना आहे. राजस्थानमध्ये गेल्या दोन वर्षांपासून ही योजना बासनात गुंडाळून ठेवण्यात आली आहे व रोग्यांना खाजगी औषधालयांत जाऊन आपला खिसा कापून घ्यावा लागत आहे. सरकारने पाठवलेली औषधेसुद्धा रोग्यांना खाजगी दुकानांतून विकत घ्यावी लागत असल्याचेही पाहण्यात आले आहे. औषधांची कमतरता आहे किंवा सरकारकडे पैसा नाही, असेही नाही. इंडियन ब्रांड इक्विटी फाउंडेशन नावाच्या एका बिगरसरकारी संघटनेने केलेल्या सर्वेक्षणानुसार २०२० पर्यंत भारतीय औषध बाजारपेठेचा एकूण कारभार ८५ अब्ज अमेरिकन डॉलर इतका होण्याची शक्यता आहे. वेगाने वाढणारा औषध उद्योग म्हणजे आपल्याच देशात नाही तर जगभरात शस्त्रव्यवसायापाठोपाठ सर्वाधिक नफा मिळवून देणारा व्यवसाय बनू लागला आहे. परंतु ही व्यवस्था तर नफेखोर व्यवस्था आहे व तिच्यामध्ये माणुसकीला बिलकूल थारा नाही. एका अंदाजानुसार सरकारी बजेटचा दोन टक्के भाग जरी औषधांवर खर्च करण्यात आला तर देशभरात मोफत औषधे पुरवली जाऊ शकतात. गेल्या बजेटमध्ये केंद्र सरकारने मोठ्या कॉर्पोरेट हाउसेसना जवळपास ६ हजार कोटी रुपयांचे अनुदान व सब्सिडी दिल्या आहेत, व दुसरीकडे कल्याणकारी योजनांसाठी (त्यामध्ये आरोग्याचाही समावेश होतो) दिल्या जाणाऱ्या बजेटमधून १८ हजार कोटी रुपयांची कपात केली आहे. सरकारला पैशाची चणचण नाही. वास्तव हे आहे की सरकारला जनतेशी काही सोयरसुतक नाही.

आरोग्यसुविधांबद्दल बोलायचे झाले तर जागतिक आरोग्य संघटनेनुसार आरोग्य व्यवस्थेच्या क्रमवारीत भारत जगभरात ११२ व्या स्थानी आहे. गृहयुद्धाचे तडाखे झेलणारा लिबियासुद्धा या बाबतीत भारताच्या पुढे आहे. भारतात दर ३० हजार माणसांमागे एक प्राथमिक आरोग्य केंद्र आहे, दर एक लाख माणसांमागे ३० बेडवाले एक सामुदायिक आरोग्य केंद्र आहे व दर सब डिविजनसाठी १०० बेडवाल्या सामान्य इस्पितळाची तरतूद आहे. आजच्या परिस्थितीत या तरतुदी म्हणजे उंटाच्या तोंडी जिरे असावे तसेच आहे, परंतु वास्तविक या तरतुदीसुद्धा लोकांपर्यंत पोचू शकत नाहीत. म्हणजेच उंटाच्या तोंडी जिरेसुद्धा नाही. भारतात आज ३८१ सरकारी मेडिकल कॉलेज आहेत. तेथे एक एमबीबीएस डॉक्टर घडवण्यासाठी ३० लाखहून जास्त खर्च होत असतो. ही मेडिकल कॉलेज बनवण्याचा व डॉक्टरांच्या शिक्षणाचा सगळा खर्च देशाच्या जनतेने भरलेल्या टॅक्समधून केला जातो, परंतु येथून डिग्री घेतल्यानंतर बहुतेक डॉक्टर कॉर्पोरेट इस्पितळांमध्ये किंवा खाजगी दवाखान्यात जनतेला लुबाडण्याच्या कामाला लागतात. जे काही डॉक्टर सरकारी नोकरी करू इच्छितात त्यांच्यासाठी जन आरोग्य सेवांमध्ये किंवा सरकारी इस्पितळांमध्ये जागा नसतात. सरकारी आरोग्य सेवांमध्ये डॉक्टरांच्या कमतरतेची अवस्था अशी आहे की भारतात दर १० हजार लोकांमागे सरकारी आणि खाजगी मिळून फक्त ७ डॉक्टर आहेत आणि इस्पितळांतील बेडबद्दल बोलायचे झाले तर दर दहा हजार माणसांमागे फक्त ९ बेड आहेत. इतर देशांशी तुलना करायची झाली तर क्युबामध्ये दर १० हजार माणसांमागे ६७ डॉक्टर आहेत, रशियामध्ये ४३, स्वित्झरलंडमध्ये ४० आणि अमेरिकेत २४ डॉक्टर आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकांनुसार दर १० हजार माणसांमागे किमान २५ डॉक्टर आणि ५० बेड असायला हवेत. इतक्या आजारांचा बोजा पाहता खरेतर हे मानकसुद्धा पुरेसे नाहीत. परंतु आपल्या देशात ही किमान सुविधासुद्धा लोकांना मिळू शकत नाही. अशा वेळी एखादी महामारी पसरली तर सरकार ताबडतोब पैसा आणि इन्फ्रास्ट्रक्चर कमी असल्याचे कारण देत जबाबदारी झटकून टाकत असते. फार फार तर सरकार आजारांना अटकाव करण्यासाठी ठोस पाउले उचलण्याऐवजी लोकांमध्ये आजारांबद्दल मोठा बागुलबोवा उभा करण्याचे काम करते. त्यामुळे आजार आटोक्यात तर येत नाहीतच, उलट खाजगी डॉक्टरांच्या नफ्यात तेवढी वाढ होते. नाहीतर महामारी पसरून लोक मरू लागताच पटापट संबंधित रजिस्टर भरले जातात व रेकॉर्ड तयार केले जातात व सरकार पुरेपूर प्रयत्न करत असल्याचे दाखवण्यात येते. आरोग्यकर्मी आणि डॉक्टरांच्या बनावट विजिट्ससुद्धा संबंधित क्षेत्रांमध्ये दाखवण्यात येतात. आता डेंग्यूचेच उदाहरण घ्या. हा एडिस नावाच्या डासामुळे फैलावणारा रोग आहे. पूर्वी सरकार आणि नगरपालिका रहिवासी वस्त्यांमध्ये डास मारण्यासाठी फोगिंग किंवा किटकनाशकांचा छिडकावा अधूनमधून तरी करायचे. आता अवस्था अशी आहे की कित्येक वस्त्यांमध्ये लोकांना फोगिंग ही काय चिज आहे तेसुद्धा माहिती नसते. साधे गणित आहे. डास मारले तर डेंग्यू पसरणार कसा आणि डेंग्यू पसरला नाही तर खाजगी आरोग्य सेक्टर आणि औषध कंपन्यांचा फायदा कसा होणार! ही बाब फक्त डेंग्यूलाच लागू पडते असे नाही, तर सर्वच आजारांना हे लागू पडते. दूषित पाण्यामुळे पसरणारे टाइफॉईड आणि हेपेटाइटिस ए चा कारभारसुद्धा असाच चालत असतो. सर्व नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवणे ही सरकारची जबाबदारी असते. मात्र बऱ्याच भागांत, विशेषतः कामगार वस्त्यांमध्ये एक तर पाणी पोचतच नाही, आणि जे पोहोचते ते तुटक्या फुटक्या पाईपमधून घाणेरड्या ठिकाणांहून येत असते, व ते पिल्यामुळे टाइफॉइडच काय, इतरही अनेक रोग होऊ शकतात. व याचा थेट फायदा औषध कंपन्या आणि खाजगी इस्पितळांना होत असतो.




वर म्हटल्याप्रमाणे भांडवलशाही काही प्रमाणात कल्याणकारी योजना राबवित असतेच. याला तिचा नाइलाज आहे. परंतु आज भांडवलशाही अशा परिस्थितीत नाही की कल्याणकारी योजना चालू ठेवता येतील. कल्याणकारी राज्याचा किंसियन फॉर्मुला सततच्या भांडवली अरिष्टांमुळे कुचकामी ठरला आहे. अशात जगभरातच सरकारे नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवण्यातून आपला हात आखडता घेत आहेत. परंतु भारतासारख्या देशात हे काम अधिकच निर्लज्जपणे व जास्त वेगाने सुरू आहे. आरोग्य आणि शिक्षण हे दोन्ही भरपूर नफा कमावून देणारे व्यवसाय आहेत. व सरकार या दोन्हीपासून अंग झटकून जनतेला खाजगी रक्तपिपासू जळवांच्या तोंडी देऊ पाहत आहे. आरोग्य सुविधांबाबत बोलायचे झाले तर प्रत्येक क्षेत्राप्रमाणेच येथेसुद्धा पब्लिक प्राइवेट पार्टनरशिप नावाची अत्यंत घाणेरडी योजना राबवण्याचे प्रयत्न केले जात आहेत. या अंतर्गत इन्फ्रास्ट्रक्चर आणि पैसा सरकारचा – म्हणजेच जनतेचा – आणि नफा मात्र भांडवलदारांचा असतो. गरीब माणसाला यामुळे उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा मिळतील म्हणून सांगितले जाते, परंतु वास्तव फारच वेगळे आहे. गरिबाला मिळतात फक्त धक्के. जसे आपण डेंग्यूने ग्रस्त मुलाच्या बाबतीत पाहिले आहे. खाजगी इस्पितळांबद्दल बोलायचे झाले तर तेथे उपचार केले जात नाहीत तर उपचारांना एखाद्या मालासारखे विकले जाते. अशा प्रकारे त्यांच्यासाठी रोगी हा रोगी नसतो तर तो एक ग्राहक – कस्टमर- असतो, व ज्याच्यापाशी माल खरेदी करण्याची क्षमता असते तो माल खरेदी करतो, व ज्याच्यापाशी ही क्षमता नसते तो मरून जातो. २००७ साली दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार दिल्ली सरकारने खाजगी इस्पितळांना नोटिफिकेशन जारी केले आहे की खाजगी इस्पितळांमध्ये १० टक्के बेड गरीब रोग्यांसाठी मोफत राखून ठेवले पाहिजेत. परंतु यामुळे त्यांच्या मालकांवर काहीही परिणाम होत नाही. कारण या आदेशाच्या उल्लंघनासाठी होणारा आर्थिक दंड रोग्यांकडून लाखो रुपये उकळणारी ही इस्पितळे कधीही भरू शकतात. ही इस्पितळे बेड रिकामी ठेवतात परंतु गरिबांना दाखल करून घेत नाहीत कारण गरीब त्यांची फी भरू शकत नाहीत, व काही करून रोग्याने फीच्या पैशांचा बंदोबस्त केलाच तर मग त्याचा खिसा चांगल्या प्रकारे कापला जातो. तऱ्हेतऱ्हेच्या अनावश्यक टेस्ट आणि महागडी असणारी अनावश्यक औषधे त्यांच्या माथी मारली जातात. बेडचा खर्च आणि डॉक्टरची फी तर वेगळीच असते. दोन वर्षांपूर्वी सीमा चौहान नामक महिलेने दिल्ली उच्च न्यायालयात तक्रार दाखल केली होती की अपोलो इस्पितळाने अगोदर लिव्हरच्या आजाराने ग्रस्त असलेल्या तिच्या पतीच्या मृत्यूनंतर ८ लाख रुपयांचे बिल तिच्या हाती दिले व पैसे भरेपर्यंत मृतदेह तिच्या हवाली केला नाही. मानवी संवेदनांचा इतका भयंकर ऱ्हास मानवीय समजल्या जाणाऱ्या या व्यवसायात झालेला आहे. हे फक्त एक उदाहरण आहे. अशा घटना दररोज घडत असतात, परंतु सरकार किंवा प्रशासनाचे बहिरेपण काही दूर होत नाही. हे सर्व काही सरकारच्या डोळ्यांसमोर, किंवा खरे तर सरकारच्या भागीदारीने होत असते. भांडवलदारांची मॅनेजिंग कमिटी असण्याचे आपले कर्तव्य सरकार उत्तम प्रकारे बजावीत असते, हे अगदी स्पष्टच आहे.

थोडक्यात, भांडवलशाही व्यवस्था स्वतःतच एक असा रोग आहे जो उभ्या समाजाला कुरतडतो आहे. अशा या व्यवस्थेत कोणत्याही प्रकारचे लोक-कल्याणकारी कार्य होण्याची आशा बाळगणे हा शुद्ध वेडेपणा आहे. या व्यवस्थेत जर कुणाचे कल्याण होऊ शकत असेल, तर ते फक्त भांडवलदारांचे आणि त्यांच्या दलालांचे. तसे पाहता, समाजवादी व्यवस्था कोणत्याही क्षेत्रात भांडवलशाहीपेक्षा कित्येक पट चांगलीच असते, मात्र केवळ आरोग्याबद्दल बोलायचे झाले तर सोविएत संघ आणि चीनमध्ये समाजवादाच्या काळात झालेल्या महान प्रयोगांच्या वेळी आरोग्य आणि उपचारांच्या क्षेत्रात जे यश मिळाले ते अद्वितीय होते. अगदी क्युबातील आरोग्य सुविधा आजसुद्धा जगातील सर्वश्रेष्ठ आरोग्य सुविधांपैकी एक मानल्या जातात. नफ्यावर उभ्या असलेल्या या मानवद्रोही संवेदनाहीन व्यवस्थेला उपटून फेकण्याची व कष्टकरी जनतेच्या लोकस्वराज्याच्या स्थापनेची आज खरी गरज आहे. तेव्हाच या रोगाने मरणाऱ्या मानवतेला वाचवता येईल.

**लेखक पेशाने डॉक्टर आहेत.**

●

# बिहारमध्ये मोदी आणि संघ परिवाराच्या धोरणांना चपराक

पान १ वरून

कष्टकरी आणि मध्यमवर्गीय माणसेच मतदानाबद्दल काहीशी उत्साही असतात. म्हणजेच, बिहारच्या सामान्य कष्टकरी मतदारांच्या बहुसंख्येने नरेंद्र मोदी सरकार आणि संघ परिवावाच्या धोरणांना नाकारले आहे.

सर्वसामान्य मतदार कोणत्याही पार्टीच्या धोरणांच्या चांगलेवाईटपणाचा सांगोपांग विचार करून मतदान करीत नाही, असा युक्तिवाद येथे केला जाऊ शकतो. जातीय आणि धार्मिक आधारावर होणाऱ्या धृवीकरणाशिवाय पैसा आणि ताकद मतदान करायला लावण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असतात. परंतु तरीसुद्धा, निवडणूक व्यवस्थापकांनी वेगवेगळे डावपेच खेळण्यात कोणतीही कसर बाकी न ठेवूनसुद्धा हे धृवीकरण भाजप आघाडीच्या बाजूने कां होऊ शकले नाही? पैशाच्या ताकदीसह समाजातील दांडगट आणि प्रभुत्त्वशाली हिश्शाचे समर्थनही त्यांना होते.

म्हणूनच, मतदारांच्या बहुसंख्येने भाजप आघाडीला नकार दिला आहे, असे निश्चितच बिहार निवडणुकांच्या निकालानंतर म्हणता येईल. म्हणजे त्यांनी महायुतीच्या पक्षांना खराच पठिंबा दिला आहे का? आपल्या जीवनात काही बदल घडून येईल अशी आशा मतदारांना त्यांच्याकडून आहे का? नाही, असे समजणे चुकीचे आहे. खरे तर ही पर्यायहीनतेची निवडणूक होती. मतदारांच्या मनात या बाबतीत कोणताही भ्रम नाही. अर्ध्या शतकापेक्षा जास्त काळाच्या अनुभवातून ते समजून चुकले आहेत की कोणताही भांडवली राजकीय पक्ष त्यांच्या आकांक्षा पूर्ण करू शकत नाही. लालू प्रसाद यादव आणि नितीश कुमार यांचे अडीच दशकांचे शासन त्यांना चांगले माहीत आहे. परंतु आपल्या आकांक्षांची पूर्तता करणारा कोणताही पर्याय समोर नसेल तर दोन वाईट प्रवृत्तींपैकी कमी वाईट पर्याय निवडावा, असा विचार निवडणुकीच्या वेळी मतदार करतात. महायुतीची निवड म्हणजे कमी वाईट पर्यायाची निवड होती. ही लालू-नितीश-कॉंग्रेसमध्ये लोकांनी दाखविलेली आस्था नाही किंवा त्यांच्या धोरणांना लोकांनी दिलेला हा पाठिंबाही नाही.

बिहार निवडणुकीत झालेल्या पराभवामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्याच्या मित्र संघटना आपली कुकर्मे थांबवतील हा गैरसमज टिपू सुलतान जयंतीच्या विरोधात त्यांनी मांडलेल्या उच्छादावरून आणि गिरिश कर्नाड यांच्यासारख्य सन्मान्य लेखक आणि कलाकाराला मिळालेल्या जिवे मारण्याच्या धमकीनंतर दूर झाला पाहिजे. मोदी सरकारच्या जनताविरोधी आर्थिक धोरणांमध्ये काही बदल होईल, अशी अपेक्षा बाळगायलासुद्धा काही आधार नाही. निवडणुकीनंतर भाजप सरकारने शेती, पशुपालन, संरक्षण, बँकिंग, किरकोळ व्यापार आणि निर्माण उद्योगासह १५ महत्त्वपूर्ण क्षेत्रे ४९ टक्क्यांपासून १०० टक्क्यांपर्यंत थेट विदेशी गुंतवणुकीकरिता खुली करून त्यांच्यात साम्राज्यवादी घुसखोरीचा मार्ग मोकळा केला आहे. विदेशी भांडवल येण्याने कामगार, कर्मचारी, लहान शेतकरी आणि लहान दुकानदार यांची अवस्था आणखीनच बिकट होणार, हे वेगळे सांगयला नकोच. ज्या भांडवली संकटाचा परिणाम म्हणून नरेंद्र मोदी आणि संघ परिवार सत्तेत पोहोचले ते अजूनही ओसरलेले नाही व भांडवलदारांचा जो अजेंडा लागू करण्यासाठी त्यांना सत्तेत आणले गेले आहे तो धुमधडाक्यात राबवण्याऐवजी दुसरा मार्ग त्यांच्यापाशी नाही. या धोरणांमुळे उसळणारा जनतेचा विरोध निष्प्रभ करण्यासाठी आणि त्यांच्यामध्ये फूट पाडण्यासाठी संघ परिवाराचा फडतूस प्रतिगामी आणि रानटी कार्यक्रम लागू करण्याला आणि समाजात विष कालवण्याच्या प्रयत्नांना सूट देणेसुद्धा त्यांच्यासाठी गरजेचे आहे.

त्याचबरोबर बिहारमधील विजयी महायुतीच्या महानायकाच्या महान भूतकाळावरूनसुद्धा एक नजर फिरवली पाहिजे. अगदी हल्लीपर्यंत नितीश कुमार आणि नरेंद्र मोदीं यांच्या मित्रत्वाच्या बातम्या मीडियामध्ये झळकत होत्या. ज्या नितीश कुमारांकडून बरेच जण सामाजिक न्यायाची आस धरून आहेत त्यांनी नवउदारवादी धोरणे बिहारमध्ये एवढ्या कौशल्याने लागू केली आहेत की भांडवली बुद्धिजीवींपासून कॉर्पोरेट मिडियासुद्धा त्यांच्यावर जीव ओवाळून टाकत होते. नवउदारवादानेच फासीवादासाठी सुपीक जमीन निर्माण केलेली आहे. गुजरात नरसंहाराच्या वेळी वाजपेयी सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री राहिलेले नितीश कुमार फासीवादाच्या विरोधात लढा काय देणार आहेत! गुजरातच्या निर्दोष लोकांच्या प्रेतांवरून चालत नरेंद्र मोदी २००३ मध्ये पुन्हा गुजरातचे मुख्यमंत्री झाले त्यावेळी त्यांना शुभेच्छा देताना नितीश कुमार म्हणाले होते – नरेंद्र मोदी फक्त गुजरातपुरते मर्यादित राहणार नाहीत, अशी मला आशा वाटते. उभ्या देशाला त्यांच्या सेवेची गरज आहे. नितीश यांच्या सुशासनाच्या काळात बिहारच्या अल्पसंख्याकांच्या विरोधात फार्बिसगंज येथे झालेली पाशवी घटनासुद्धा आपण स्मरणात ठेवली पाहिजे. रणवीर सेनेने घडवूण आणलेल्या दलितांच्या हत्याकांडांच्या चौकशीसाठी गठित केलेल्या अमीरदास आयोगाची सुशासन बाबूंच्या काळात काय अवस्था झाली, तेही विसरता कामा नये.

तरीही, निवडणूक निकालांनी भगवा ब्रिगेडच्या मनसुब्यांवर जोरदार प्रहार केलेला आहेच. राज्यसभेत बहुमत मिळवून जीएसटी आणि आर्थिक सुधारांचे इतर कायदे संसदेत संमत करण्याची स्वप्ने सध्या तरी भंगली आहेत. कित्येक अहवालांनुसार संघ परिवाराच्या रणनीतिकारांनी हे अगोदरच ओळखले होते की बिहारमध्ये त्यांचा मार्ग खडतर आहे, मात्र मतदारांचा मूड नेमका हेरण्यात ते कमी पडले. जगभरात फासिस्टांच्या अति आत्मविश्वासाचा फुगा पूर्वीसुद्धा असचा फुटत आला आहे. शिखरावरून ते धाडकन खाली कोसळतात आणि तोंडात माती भरून घेतात. संघ परिवाराचे रणनीतिकार या वेळी पुरते फसले. अर्थव्यवस्थेच्या विकासाचे खोटारडे आकडे देऊन, जगभरात देशाचे नाव उंचावण्याचे देशभक्तिपूर्ण दावे करून आणि सोनेरी भविष्याची सोनेरी आश्वासने देऊन सामान्य जनतेला नेहमीच गंडवता येत नाही. भाकरीचा प्रश्न हा सामान्य जनतेचा मूलभूत मुद्दा आहे. भावनिक मुद्दे काढून काही काळासाठी या मूलभूत मुद्द्यांना दडपले तरी फार काळ तसे करता येत नाही. प्रत्येक प्रकारच्या फासिस्ट राजकारणाची इमारत भावनात्मक मुद्द्यांच्या पायावर उभी असते आणि हा पोकळ पाया ढासळायला वेळ लागत नाही. या निवडणुकीतसुद्धा हेच झाले.

पाठोपाठ दोन निवडणुकांमध्ये पराभवाची नामुश्की वाट्याला आल्यानंतर संघ परिवाराला काही काळासाठी आपल्या उत्पाती घटकांना काही काळासाठी थोडे मागे खेचावे लागेल. परंतु देशाच्या सामाजिक सांस्कृतिक वातावरणास भगव्या रंगात रंगवून टाकण्याच्या संघ परिवाराच्या अजेंड्यात काही बदल होईल, असे मानण्याचे कारण नाही. केंद्रात सत्तेत आल्यावर शिक्षण आणि संस्कृतीच्या विभिन्न क्षेत्रांमध्ये ज्या वेगाने संघ परिवाराने आपला अजेंडा पुढे रेटला आहे, त्याच्या रणनीतीत थोडाफार बदल झाला तरी हे रेटणे थांबणार नाही. दुसरे, सामाजिक सांस्कृतिक वातावरणात जिथवर त्यांची घुसखोरी झालेली आहे, तेथून ते स्वतःहून मागे हटणार नाहीत. म्हणूनच निवडणुकांतील "धर्मरिपेक्ष" शक्तींच्या यशामुळे निश्चिंत होऊन शांत बसून चालणार नाही. हे आत्मघातकी ठरेल. आपण कष्टकरी समाजाची एकजूट बांधण्याचे काम पूर्वीसारखेच सुरू ठेवावे लागेल. भारतीय भांडवलशाही आणि जागतिक भांडवलशाहीच्या ज्या संकटांनी हिंदुत्त्ववादी फासिस्ट शक्तींना दाणापाणी पुरविले आहे, ती संकटे अजूनही कायम आहेत असे नाही तर येत्या काळात ती आणखी बिकट होणार आहेत. फासिस्ट शक्तींना देशातील शासक भांडवलदार वर्ग फक्त साखळीने बांधलेल्या शिकारी कुत्र्यासारखा पोसतो असे नाही तर वेळप्रसंगी ही साखळी सोडण्यासही ते मागेपुढे पाहणार नाही. म्हणूनच फासीवाद विरोधी लढ्याची तयारी सुरूच ठेवली पाहिजे व ती गतिमान करावी लागेल.

नरेंद्र मोदींच्या पुढारीपणाखाली भाजपप्रणित राजग सरकार बनण्यापूर्वी देशातील जनतेला निरनिराळी गुलाबी स्वप्ने दाखविण्यात आली होती. महागाई आणि बेरोजगारी संपून जाईल, पेट्रोल डिझेलपासून घरगुती गॅसच्या किंमती कमी केल्या जातील, रेल्वेचे भाडे वाढवले जाणार नाही, भ्रष्टाचाराला चाप लागेल, स्विस बॅंकेतून काळा पैसा परत आणला जाईल आमि चांगले दिवस येतील, असे सांगण्यात आले होते. परंतु सरकार बनल्यानंतर दीड वर्षातच देशातील सामान्य कष्टकरी जनतेला कळून चुकले आहे की चांगले दिवस कुणाचे आले आहेत. एकीकडे खोटे आकड्यांच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेच्या विकासाचे खोटे दावे केले जात आहेत आणि मुद्रास्फिती कमी झाल्याचे आकडे चमकवले जात आहेत, तर दुसरीकडे सामान्य माणूस डाळ आणि तेलापासून प्रत्येक जीवनावश्यक वस्तूच्या बेलगाम महागाईमुळे बरबाद होत आहे. घरगुती गॅसपासून रेल्वे प्रवास महाग झाला आहे, औषधांच्या किंमती भरमसाठ वाढल्या आहेत. श्रम कायद्यांद्वारे श्रमिकांना मिळणारी थोडकी सुरक्षासुद्धा हिरावून घेतली जात आहे आणि कामगारांच्या अधिकारांमध्ये कपात करणारे कायदे बनवण्याची तयारी सुरू आहे. पब्लिक सेक्टरच्या नफा कमावणाऱ्या कंपन्यांचे खाजगीकरण केले जात आहे. याचा स्वाभविक परिणाम असणार आहे सरकारी कर्मचाऱ्यांची कपात. कंत्राटी पद्धतीला अप्रेंटिससारखी नवी गोंडस नावे देऊन प्रोत्साहन दिले जात आहे. नवीन नोकरभरती होत नाहीये, आणि कुठे झालीच तर कायमस्वरूपी कर्मचारी म्हणून नाही तर कंत्राटावर होते आहे. तमाम कंपन्यांना कामगार आणि कर्मचाऱ्यांकडून खुलेआम ओव्हरटाईम करून घेण्याची आणि हवे तेव्हा त्यांना लाथ मारून कामावरून काढून टाकण्याची सूट दिली जात आहे. जागतिक बाजारपेठेत पेट्रोलियम उत्पादनांच्या किंमतीत मोठी घसरण होऊनसुद्धा मोदी सरकारने त्यांच्यावर वेगवेगळे टॅक्स आणि शुल्क वाढवून किंमती जशाच्या तशाच ठेवल्या. विदेशातून काळा पैसा आणण्याचे आश्वासन म्हणजे निवडणुकीतील एक अलंकारिक बोलणे होते, असे खुद्द अमित शहा यांनीच घोषित केले आहे. रुपया मजबूत करायचे दूर राहिले, रुपयाच्या किंमतीत विक्रमी घसरण आल्यामुळे महागाई आणखीनच वाढली आहे. सत्तेत आल्या आल्या केंद्र आणि राज्य स्तरावर भाजपच्या मंत्र्यांनी भ्रष्टाचार आणि गुंडगिरीचे जुने विक्रम मोडीत काढायला सुरवात केलेली आहे. दंगे आणि बलात्काराचे आरोपी असेलेले नेते मोदी सरकारमध्ये बसले आहेत.

दुसरीकडे, अंबानी, अडानी, टाटा यांसारख्या देशातील सर्वात मोठ्या धनदांडग्यांना एकाहून एक सरस भेटवस्तू दिल्या जात आहेत. त्यांना वेगवेगळ्या करांमधून सूट दिली जात आहे, जवळपास मोफत वीज, पाणी, जमीन, बिनव्याजी कर्ज, श्रम कायद्यामध्ये सूट दिली जात आहे. देशातील जनतेची सामूहिक संपत्ती असलेली देशातील नैसर्गिक संपदा कवडीमोल किंमतीने त्यांच्या हवाली केली जात आहे आणि सांस्कृतिक संसाधनांच्या अंधाधुंद शोषणासाठी पर्यावरणाच्या सुरक्षेसंबंधीचे कायदे मनमान्या पद्धतीने बदलले जात आहेत किंवा त्यांच्या उल्लंघनाची सूट दिली जात आहे. स्वदेशी, देशभक्ती, राष्ट्रवादाचा ढोल वाजवत सत्तेत आलेल्या मोदी यांनी सरकार बनवताच विमा, संरक्षण यांसारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रांसह वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये थेट विदेशी गुंतवणुकीला परवानगी दिली आहे. आता ही प्रक्रिया आणखीनच गतिमान होते आहे. व्यापारात सुलभतेच्या नावाखाली देशातील निसर्ग आणि जनतेला लुटण्याची सूट देऊन तिला मेक इन इंडियाचे नाव दिले जात आहे. देशातील वरच्या १५ टक्के श्रीमंत लोकांना हरतऱ्हेच्या सुविधा, टॅक्समध्ये सूट आणि इतर सवलती दिल्या जात आहेत. त्यांच्यासाठी चकचकीत मॉल, मल्टिप्लेक्स, अम्युजमेंट पार्क आहेत! आणि देशातील ८५ टक्के जनतेला सांगण्यात येत आहे की त्यांनी "विकासा"करिता आवाज न काढता फॅक्टरी, दुकाने, हॉटेल आणि कार्यालयात घाम गाळला पाहिजे! देशातील अमीरजाद्यांच्या विकासाकरिता कष्टकरी जनतेने पोटाला चिमटा काढून हिंदू राष्ट्राचे निर्माण केले पाहिजे. आणि कुणी अमीरजाद्यांच्या चांगल्या दिवसांवर प्रश्नचिन्ह उभे करीत असेल, तर त्याला राष्ट्रविरोधी आणि देशद्रोही घोषित केले जाईल!

निवडणुकीतील जय-पराजयाने फासीवाद विरोधी लढ्यात काही निर्णायक फरक पडेल, हा भ्रम दूर करण्यासाठी हे तथ्य लक्षात ठेवले पाहिजे की ज्या काळात भारतात नवउदारवादी धोरणांचे वर्चस्व स्थापित झाले, तोच हिंदुत्त्ववादी फासीवादाच्या प्रभाव-विस्ताराचाही काळ राहिलेला आहे. बाबरी मशिदीत राम जन्मभूमीचे टाळे उघडणे, अडवाणी यांची रथयात्रा, गुजरात २००२, देशभरात सांप्रदायिक दंगे, तणाव आणि अल्पसंख्याक जनतेचे सतत वाढत गेलेल तुटलेपण आणि नंतर मोदी यांचे सत्तेत येणे – या एकूण राजकीय घटनाक्रमास नवउदारवादी धोरणांच्या निर्णायक वर्चस्वाच्या प्रक्रियेशी जोडूनच पाहता येऊ शकते. नवउदारवादी धोरण राबविण्यात आणि सौम्य हिंदुत्ववादी दिशा बाळगण्यास कॉंग्रेसने कधीच हरकत घेतलेली नाही. लहान भांडवलदार आणि भांडवली भूस्वामींच्या क्षेत्रीय पक्षांचीसुद्धा या धोरणांना किंवा भाजपशी हातमिळवणी करायला काही हरकत नसते. परंतु या पक्षांच्या पाठीशी ना कोणतेही कट्टर प्रतिक्रियावादी आंदोलन आहे, ना कार्यकर्त्यां च्या फौजेवर आधारित संरचना. म्हणूनच तळागाळात जाऊन सांप्रदायिक आधारावर जनसमुदायाला विभाजित करण्याच्या व कामगारांची संघटित शक्ती वा त्यांच्या संघटित होण्याच्या शक्यतेवर घाव घालण्याच्या बाबतीत हे पक्ष भाजप आणि संघ परिवाराइतके प्रभावी होऊ शकत नाहीत. ते सत्तेत आले तर नवउदारवादी धोरणांच्या अंमलबजावणीमध्ये काही फरक पडणार नाही, परंतु समाजात खोलवर जनतेला फोडण्यासाठी आणि कष्टकरी जनतेच्या एकतेवर घाव घालण्यासाठी हिंदुत्त्ववादी फॅसिस्ट तेव्हासुद्धा अशाच व्यापकपणे आणि रानटीपणे काम करीत राहतील. भाजपचा एखाद्या निवडणुकीतील पराभव म्हणजे फासिस्ट शक्तींची पिछेहाट मानणे एका धोकादायक गैरसमजाचा बळी ठरण्यासारखे आहे. दुसरीकडे, संसदीय डाव्या पक्षांनी कामगार वर्गाला अर्थवाद आणि संसदीय श्रमजालात अडकवून अराजकीय आणि निःशस्त्र बनवण्यात अगदी तीच भूमिका वठवली आहे जी १९२० आणि १९३० च्या दशकात युरोपातील सामाजिक लोकशाही

पान १३ वर

# युद्धाची विभीषिका आणि शरणार्थ्यांचे भीषण संकट

## भांडवलशाहीपाशी मानवतेला देण्यासाठी आता फक्त शोकांतिकाच आहेत

भांडवलशाहीने आपल्या जन्मापासूनच लोकांच्या उपजीविकेची साधने त्यांच्याकडून हिरावून त्यांना उघड्यावर पाडून एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात, एका देशातून दुसऱ्या देशात, इतकेच नाही तर एका खंडातून दुसऱ्या खंडात पळ काढण्यास भाग पाडले आहे. जोपर्यंत भांडवलशाही सरंजामशाहीच्या विरोधात लढा देत होती, तोपर्यंत तिच्यापाशी मानवतेला देण्यासाठी काही सकारात्मक मूल्ये आणि चांगल्या जीवनाची स्वप्ने होती, तसेच तिच्या येण्यामुळे मानवता निश्चितच एका अधिक उन्नत अवस्थेला पोचली, मात्र आज ही व्यवस्था इतकी मानवद्रोही झाली आहे की तिच्यापाशी मानवतेला देण्यासाठी विनाशकारी युद्धे आणि त्यातून उद्भवणाऱ्या शोकांतिकांखेरीज दुसरे काही शिल्लक राहिलेले नाही. शरणार्थ्यांतचे संकट हे भांडवलशाहीने जन्माला घातलेली अशीच एक शोकांतिका आहे, व जसजसे भांडवलशाहीचे वय वाढत चालले आहे, तसतशी ही शोकांतिका एक विक्राळ रूप धारण करू लागली आहे.

दोन महिन्यांपूर्वी अलान कुर्दी नावाच्या तीन वर्षीय मुलाच्या टर्कीमध्ये भूमध्यसागराच्या तटावर पालथ्या पडलेल्या शवाची हृदयद्रावक छायाचित्रे जगभरातील मीडिया आणि सोशल मीडियाच्या बातम्यांमध्ये झळकली. तान्ह्या अलान कुर्दीचा जन्म सिरियात राहणाऱ्या एका कुर्दी कुटुंबातला. हे कुटुंब सिरियात सुरू असलेल्या गृहयुद्धामुळे नौकेतून कॅनडात शरण घेण्यासाठी जात होते, व नौकेच्या क्षमतेहून जास्त लोक भरल्यामुळे ही नौका बुडाली. या घटनेनंतर युरोप आणि अमेरिकेतील तमाम भांडवली देशांच्या शासकांनी शरणार्थ्यांच्या प्रश्नावर मगरीचे अश्रू ढाळले. मानवतावादाचा मुखवटा लावलेल्या या भांडवली शासकांच्या आणि त्यांच्या तुकड्यांवर जगणाऱ्या मुख्य प्रवाहातील मीडियाने मगरीच्या अश्रूंच्या पुरामध्ये हे नंगे सत्य दाबून टाकण्यात आले की या भयंकर शोकांतिकेला जबाबदार तेच आहेत.



शरणार्थ्यांतचा प्रश्न हाताळणारी संयुक्त राष्ट्रची संस्था यूएनएचसीआर (युनायटेड नेशन्स हाई कमिश्नर फॉर रिफ्यूजीज) नुसार जगभरातील शरणार्थ्यांची संख्या आज ६ कोटींच्या पलीकडे गेलेला आहे आणि हा आकडा आजवरच्या इतिहासात सर्वात मोठा आहे. या शरणार्थ्यांमध्ये बहुतेक मुले आहेत, हेही उल्लेखनीय आहे. २०१४ साली जवळपास १.४ कोटी लोकांना गृहयुद्धांमुळे व अन्य प्रकारच्या हिंसेमुळे विस्थापित व्हावे लागले आहे. यांपैकी १.१ कोटी आपापल्या देशाच्या सीमे अंतर्गत विस्थापित झाले आहेत, तर ३० लाख लोकांना आपला देश सोडावा लागला आहे. या वर्षी तर ही संख्या आणखीनच वाढली आहे. कोणत्या भागांतून आज हे विस्थापन सगळ्यात जास्त होते आहे हे समजून घेणे एवढ्या मोठ्या प्रमाणातील विस्थापन समजून घेण्यासाठी गरजेचे आहे. आकड्यांवरून असे लक्षात येते आहे की अलीकडच्या वर्षांमध्ये ज्या देशांमध्ये साम्राज्यवादी हस्तक्षेप वाढलेला आहे त्याच देशांमध्ये सर्वाधिक लोकांना विस्थापनाचा दंश सहन करावा लागला आहे, जसे की सीरिया, अफगाणीस्तान, इराक आणि लिबिया. गेल्या दिड दशकामध्ये अमेरिकेच्या नेतृत्त्वाखाली चाललेल्या साम्राज्यवादी हस्तक्षेपातून उत्पन्न झालेली हिंसा आणि अराजकतेने या प्रदेशांत राहणाऱ्या लोकांसमोर जणू अस्तित्त्वाचे संकट उभे राहिले आहे. या हिंसेमध्ये मोठ्या प्रमाणात जीविताची आणि संपत्तीची हानी झाली आहे, आणि जे लोक बचावले आहेत त्यांनासुद्धा सुरक्षित जीवनासाठी आपले वसतीस्थान सोडून देणे भाग पडले आहे. अमेरिकेने २००१ साली अफगाणीस्तानमध्ये आणि २००३ साली इराकवर हल्ला केला. त्यामुळे या दोन्ही देशांतील लाखो लोक विस्थापित झाले आहेत, व आता त्यांना शेजारच्या देशांमध्ये नारकीय जीवन जगावे लागत आहे. २०११ साली इजिप्तमध्ये मुबारक यांच्या सत्तेच्या पतनानंतर सीरियामध्ये उत्फूर्ध्येर्तपणे लोकविद्रोहाला सुरुवात झाली. याचा फायदा घेऊन अमेरिकेने साउदी अरबच्या साह्याय्याने इस्लामिक स्टेन नावाच्या सुन्नी इस्लामिक कट्टरपंथी संघटनेला आर्थिक मदत आणि सैन्य प्रशिक्षण देऊन सीरियातील गृहयुद्ध आणखीनच विनाशकारी बनवण्यास महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. त्यामुळे २०११ नंतर सीरियातील १ कोटीहून जास्त लोक विस्थापित झाले आहेत. त्यांपैकी ४० लाख लोकांनी देशत्याग केला आहे. तसे पाहता भांडवलशाहीच्या इतिहासाची परिचय असणाऱ्यांसाठी ही काही नवीन गोष्ट नाही. गेल्या शतकातसुद्धा भांडवलशाही-साम्राज्यवादाने दोन महायुद्धे आणि त्यानंतर इजराइल-पॅलेस्टाईन विवाद, कोरियाचे युद्ध, विएतनाम युद्ध आणि सोमालिया, रवांडा, कांगोसारख्या आफ्रिकेतील देशांतील क्षेत्रीय युद्धांना उत्तेजन देऊन लाखो लोकांच्या माथी विस्थापन मारले आहे. भांडवलशाही देशांतील शासक वर्गामध्ये उजव्या आणि डाव्या गटांमध्ये शरणार्थ्यांच्या प्रश्नावरची एकूण चर्चा, त्यांना देशात येऊ द्यावे अथवा नाही, याच एका मुद्द्यावर केंद्रित झालेली असते. सापेक्षतः मानवतावादी चेहऱ्याच्या शासकवर्गाच्या डाव्या गटाशी जोडलेले लोक साधारणपणे शरणार्थ्यांबाबत उदार आचरणाचे समर्थन करतात आणि शरणार्थ्यांमुळे त्यांच्या अर्थव्यवस्थेला लाभच मिळत असल्याचा युक्तीवाद करतात. परंतु शासकवर्गाचे असे डावे गटसुद्धा शरणार्थ्यांच्या समस्येचे मूळ कारण काय आहे, हा प्रश्न कधी उपस्थित करीत नाहीत. त्यांनी असे प्रश्न विचारायला सुरुवात केल्यास भांडवली व्यवस्थाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभी केली जाईल व तिचे मानवद्रोही चारित्र्य उघडे पडेल, हे त्यांना माहीत असल्यामुळेच ते तसे करीत नाहीत. साम्राज्यवादाच्या काळात कच्चा माल, स्वस्त श्रम आणि बाजारांवर कब्जा यासाठी वेगवेगळ्या साम्राज्यवादी देशांमध्ये शर्यत लागणे अटळपणे युद्धाच्या संकटाला जन्म देते, हे वास्तव आहे. एवढेच नाही, संकटग्रस्त भांडवलशाहीसुद्धा संकटापासून सुटका करून घेण्यासाठी युद्धाचा आधार घेत असते कारण युद्धांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्पादक शक्तींचा नाश भांडवलाच्या अतिउत्पादनाच्या संकटावर संजीवनीचे कार्य करतो. याशिवाय, जगाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये छोट्यामोठ्या प्रमाणात युद्धे होणे किंवा तणावाची स्थिती राहणे शस्त्रांचा विश्वव्यापी व्यापार कायम राण्यासाठी गरजेचे असते. हीच भौतिक परिस्थिती शरणार्थ्यांचे संकट निर्माण करते.

जगाच्या विभिन्न भागांमध्ये राहणाऱ्या कामगार वर्गाची शरणार्थ्यांप्रति भूमिका मित्रत्त्वाची असायला हवी कारण हे शरणार्थीसुद्धा कामगार वर्गाचाच एक भाग आहेत. त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा भेदभाव किंवा अत्याचारांच्या विरोधात आपण आवाज उठवला पाहिजे. कामगार वर्गाने आंतरराष्ट्रीय भावनेचे दर्शन घडवीत प्रत्येक देशात शरणार्थ्यांजच्या हक्कांसाठी लढले पाहिजे तसेच शरणार्थ्योंमध्ये कामगार वर्गाचे ऐतिहासिक उत्तरदायित्वाचे, म्हणजेच भांडवलशाहीचे उच्चाटन आणि समाजवादाची स्थापनेचे विचार घेऊन गेले पाहिजे, आणि शरणार्थ्यांच्यिा दुर्दशेचा शेवटसुद्धा सर्वहारा क्रांतीतच दडलेला आहे, हेसुद्धा त्यांना समजावले पाहिजे.

**आनंद सिंह**

●

# बिहारमध्ये मोदी आणि संघ परिवाराच्या धोरणांना चपराक

पान १२ वरून

पक्षांनी बजावली होती, हेही लक्षात घेतले पाहिजे. जर्मनीत हिटलर आणि इटलीत मुसोलिनीच्या नेतृत्त्वात फासीवादी सत्तेत येण्यामागे या पक्षांची भूमिकासुद्धा कारणीभूत होती. भारतात संसदीय डाव्यांनी हिंदुत्त्ववादी कट्टरपंथाच्या विरोधातील संघर्षाला फक्त निवडणुकीतील जय पराजयाचा आणि औपचारिक प्रतिकात्मक विरोधाचा मुद्दा बनविले आहे.

व आता ते तळागाळात कष्टकऱ्यांना सोबत घेऊन फासिस्ट फौजेच्या कारवायांना प्रभावीपणे हाणून पाडण्याची क्षमता हरवून बसले आहेत. क्रांतिकारी डाव्यांच्या विखुरलेल्या शक्तीबद्दल बोलायचे झाले तर स्वतःच्या विचारधारात्मक कमकुवतपणामुळे व दीर्घ काळ विखुरलेपण आणि अवरोधामुळे ते प्रभावी हस्तक्षेप करण्याच्या परिस्थितीत नाहीत. अशा वेळी फासिझमविरोधी नवी एकजूट एकदम नव्याने सुरू करण्याते आव्हान आपल्यासमोर आहे. भांडवलाच्या शक्तीने राज्याच्या उपकरणांच्या माध्यमातून आपले वर्चस्व स्थापित करतानाच वर्गयुद्धात फासिस्ट टोळक्यांद्वारे समाजामध्ये वेगवेगळ्या रूपांमध्ये आपले खंदक खोदून ठेवले आहेत, बुरुज उभारले आहेत. त्यांचा सामना करण्यासाठी आपल्याला पर्यायी शिक्षण, प्रचार आणि संस्कृतीच्या आपल्या तंत्राद्वारे प्रतिवर्चस्वासाठी झुंज द्यावी लागेल, कामगार वर्गाला राजकीयदृष्ट्या शिक्षित संघटित करावे लागेल आणि मध्यम वर्गातील क्रांतिकारक घटकांना त्यांच्यासोबत उभे करावे लागेल. संघटित क्रांतिकारी फौजेच्या शक्तीच्या साहाय्यानेच आपण आपले खंदक खोदून आणि बुरूज उभारून भांडवल आणि श्रमादरम्यान मोर्चेबांधणी करून चालणाऱ्या दीर्घ वर्गयुद्धात भांडवलाचे भाड्याचे गुंड असलेल्या फासिस्टांशी दोन हात करू शकतो. ही रणनीती फक्त राजकारणाच्या क्षेत्रातच नाही, तर समाज आणि संस्कृतीच्या प्रत्येक आघाडीवर आपल्याला लागू करावी लागेल.

मोदी सरकारच्या कारनाम्यांमुळे मोहभंग होऊन देशभरात कष्टकरी लोक आणि विद्यार्थी तरुण रस्त्यावर उतरून विरोध नोंदवीत आहेत. संघ परिवार पसरवीत असलेल्या द्वेषाच्या विषाच्या विरोधात बुद्धिजीवी-लेखक-कलाकारांपासून सामान्य नागरिकसुद्धा सतत आवाज उठवीत आहेत. या विरोधातही विद्यार्थी तरुण आघाडीवर आहेत. नरेंद्र मोदींचा पाखंडी मुखवटा फाटून गेला आहे. देशातच नाही तर विदेशातही छी-थू होते आहे आणि देशात संघ परिवाराने निर्माण केलेल्या घृणेच्या वातावरणावर चहूकडून टीका होते आहे. परंतु एवढ्यानेच सांप्रदायिक फासीवाद आपल्या बिळात गुडुप होणार नाही.

बिहारमध्ये नितीश आणि लालूच्या नेतृत्वात सरकार बनल्यानंतर देशभरात राबविण्यात येत असलेल्या घोर जनताविरोधी आर्थिक धोरणांहून वेगळी धोरणे तेथे लागू होतील असे मानणे भाबडेपणाचे आहे. संकटग्रस्त अर्थव्यवस्थेत जेवढे शक्य असेल तिथपर्यंत काही प्रतिकात्मक कल्याणकारी कार्यक्रम लागू होऊ शकतात, मात्र सरकार बदलल्यामुळे कष्टकऱ्यांच्या जीवनात काहीही फरक पडणार नाही. त्यांची फरफट अशीच यापुढेही चालूच राहील. कपात-बेरोजगारी-महागाई आणि सामाजिक उत्पीडनाचा राक्षस त्यांची पाठ सोडणार नाही.

नवीन सरकार बनणे हे कष्टकरी जनतेसाठी सापनाथच्या जागी नागनाथ खुर्चीवर बसण्यासारखे आहे. लुटारूंच्या एका टोळीच्या जागी दुसरी टोळी त्यांना लुटणार. देशी विदेशी भांडवलदारांची लूट फक्त चालूच राहणार नाही तर ती वाढतच जाईल. उदारीकरण-खाजगीकरणाच्या धोरणांचे कारण सरकारचे एखादे कारस्थान किंवा जगभरातील भांडवलदारांचा विकृतपणा हे नाही. ही जागतिक भांडवलशाहीच्या विकासाच्या आंतरिक तर्कातून पैदा झाली आहेत. ती बाजार आणि नफ्याच्या व्यवस्थेच्या गतित्त्वाच्या नियमांनी संचालित होत आहेत. याला सध्याच्या भांडवली संरचनेच्या अंतर्गत कोणताही पर्याय नाही. एकाच परिस्थितीत ही धोरणे उलटी फिरवली जाऊ शकतात. सध्याची भांडवली संरचना पुरती ध्वस्त करून. बाजार आणि नफ्यावर उभ्या असलेल्या या संपूर्ण भांडवली व्यवस्थेला नेस्तनाबूत करून. कामगारांनी या मार्गाने पुढे जाण्याची तयारी केली पाहिजे.

●



# एका गोभक्ताची भेट

हरिशंकर परसाई

एका संध्याकाळी रेल्वे स्टेशनवर एका स्वामीजींचे दर्शन झाले. साधु महाशय उंच, गोरे आणि धष्टपुष्ट होते. चेहरा लाल. भगवे रेशमी कपडे. सोबत आकाराने लहान एक किशोर सन्यासी होता. त्याच्या हातात एक ट्रान्झिस्टर होता आणि तो गुरुजींना रफीची गाणी ऐकवीत होता.

मी विचारले, स्वामीजी कुठे चाललाय?

स्वामीजी म्हणाले, बच्चा, दिल्लीला चाललोय.

स्वामीजी मजेदार वाटले. मी त्यांच्या जवळ जाऊन बसलो. त्यांनीसुद्धा बाकड्यावर आसन ठोकले आणि सेवकाला गाणे बंद करायला सांगितले. म्हणाले, बच्चा, धर्मयुद्ध पेटले आहे. गोरक्षा आंदोलन तीव्र झाले आहे. दिल्लीत संसदेसमोर सत्याग्रह करणार आहे.

मी विचारले, स्वामीजी हे आंदोलन कशासाठी चालले आहे?

स्वामीजी म्हणाले, तू फारच अडाणी दिसतोयस बच्चा. अरे, गाईचे रक्षण करायचे आहे. गाय आपली माता आहे. तिचा वध होतो आहे.

वध कोण करतो आहे, मी विचारले.

ते म्हणाले, परधर्मी कसाई.

मी विचारले, त्यांना मारण्यासाठी गाई विकतं कोण? ते आपले स्वधर्मी गोभक्तच आहेत ना?

स्वामीजी म्हणाले, ते तर आहे. पण त्यांनी तरी काय करावं? एक तर गाय व्यर्थ खात राहते, दुसरे म्हणजे, विकल्यामुळे पैसे मिळतात.

मी म्हटले, म्हणजे पैशासाठी जो मातेचा वध करील, तो सच्चा गो पूजक झाला.

स्वामीजी माझ्याकडे पाहू लागले. म्हणाले, वादविवाद चांगला करतोस बच्चा. पण ही तर्काची नाही, भावनेची बाब आहे. यावेळी जे गो भक्त आंदोलन करताहेत, त्यांच्यापैकी क्वचितच कुणीतरी गाय पाळत असेल. पण आंदोलन करतायत. हा भावनेचा प्रश्न आहे.

स्वामीजींशी चर्चेचा मार्ग मोकळा झाला होता. त्यांच्याशी मस्त गप्पा झाल्या. त्यांमध्ये तात्विक चर्चा होती. तात्विक चर्चेच रस असणाऱ्यांसाठी तो वार्तालाप सारांश खाली देत आहे.

स्वामी आणि बच्चामधील बातचित.

स्वामीजी, तुम्ही तर गायीचेच दूध पित असाल?

नाही बच्चा, आम्ही म्हशीचे दूध प्राशन करतो. गाय कमी दूध देते आणि ते पातळही असते. म्हशीच्या दुधाला चांगली जाड साय येते आणि त्याची रबडी बनते.

म्हणजे सगळेच गोभक्त म्हशीचेच दुध पितात का?

हा बच्चा, जवळजवळ सगळेच.

तर मग म्हशीच्या रक्षणासाठी आंदोलन झाले पाहिजे. दूध म्हशीचे पितात आणि माता गायीला म्हणतात. जिचे दूध प्यायले जाते, तिलाच तर माता म्हटले जाते.

म्हणजे आम्ही म्हशीला माता... नाही बच्चा, तर्क ठीक आहे, पण भावना वेगळी आहे.

स्वामीजी प्रत्येक निवडणुकीआधी गोभक्तीला जोर का चढतो ? या हवामानात काही खास असते का?

बच्चा, जेव्हा निवडणुका जवळ येतात तेव्हा नेत्यांना गोमाता स्वप्नात येऊन दर्शन देते. म्हणजे, बेटा, निवडणूक येते आहे. आता माझ्या रक्षणासाठी आंदोलन कर. देशाची जनता अजून मूर्ख आहे. माझ्या रक्षणाचे आंदोलन चालवून मते मिळव. बच्चा, जसे काही पक्षांना बैल मते मिळवून देतात, तसेच काही पक्षांना गोमाता मते मिळवून देते. म्हणून हे नेते ताबडतोब आंदोलन पुकारतात व आम्हां साधूंना त्यात सामील करून घेतात. आम्हांलासुद्धा मजा येते राजकारणात. बच्चा, तू आम्हांलाच काहीबाही विचारत आहेस, तूसुद्धा काहीतर सांग. चाललायस कुठे?

स्वामीजी, मी मनुष्य रक्षा आंदोलनासाठी जातोय.

ते काय असतं बुवा?

स्वामीजी, मी जसा गायीबाबत अज्ञानी आहे, तसेच तुम्ही मनुष्याबाबत अज्ञानी आहात.

पण मनुष्याला कोण मारतं आहे?



या देशातील मनुष्याला दुष्काळ मारतो आहे, महागाई मारते आहे, मनुष्याला नफेखोर मारताहेत, काळा बाजारवाले मारताहेत, भ्रष्ट शासनतंत्र मारतं आहे, सरकारसुद्धा जिकडे तिकडे पोलिसांच्या गोळीने मनुष्याला मारतं आहे, स्वामीजी तुम्हीसुद्धा मनुष्य रक्षा आंदोलनात सामील व्हा ना.

नाही बच्चा, आम्ही धर्मात्मा आहोत. आम्ही हे नाही करू शकत. एक तर मनुष्य आमच्या नजरेत फारच तुच्छ आहे. मंदिर आणि मठांमध्ये असलेली सगळी संपत्ती सरकारने जप्त केली पाहिजे म्हणून सांगणारे मनुष्यच तर आहेत. बच्चा, मनुष्याला मरू दे. गोमातेची रक्षा करा. कोणताही जीव मनुष्यापेक्षा श्रेष्ठ आहे. गोरक्षेच्या जुलुसामध्ये जेव्हा तंटे होतात तेव्हा मनुष्यच मरतात, हे बघितलं नाहीस का तू. आणखी एक गोष्ट बच्चा. तुझ्या बोलण्यावरून असं दिसतंय की मनुष्यरक्षेसाठी नफेखोरी आणि काळाबाजारच्या विरोधात लढावं लागणार. हे आमच्यानं होणार नाही. हेच लोक तर मंदिर, मठ आणि गोरक्षा आंदोलनासाठी देणग्या देतात. आम्ही त्यांच्या विरोधात कसे काय लढू शकतो?

असो, मनुष्यरक्षा जाऊ द्या. गोरक्षेबद्दल माझ्या ज्ञानात आणखी थोडी भर पडू द्या. एक गोष्ट सांगा. समजा, तुमच्या पडवीत गहू वाळत टाकले आहेत. तेवढ्यात एक गोमाता येऊन गहू खाऊ लागली. तुम्ही काय कराल?

बच्चा, आम्ही तिला काठीचा फटका देऊन हाकलून लावू.

पण स्वामीजी, ती तर गोमाता आहे, पूज्य आहे. आपल्या मुलाचे गहू खायला आली आहे. तुम्ही हात जोडून स्वागत का नाही करत, की माते, मी कृतार्थ झालो, सगळे गहू फस्त करू टाक.



बच्चा, आम्हांला मूर्ख समजतोस का?

नाही, मी आपल्याला गोभक्त समजतो.

ते तर आम्ही आहोतच, पण इतके मूर्ख नाही की गायीला गहू खायला देऊ.

पण स्वामीजी ही कसली पूजा झाली ? म्हणजे गाय हाडांचा सापळा होऊन रस्त्यावर कागद आणि कपडे चघळत फिरते आहे आणि ठिकठिकाणी मार खाते आहे?

बच्चा, त्यात आश्चर्य वाटण्यासारखं काय आहे? आपल्याकडे ज्याची पूजा होते त्याची दुर्दशाच करून टाकली जाते. हीच तर खरी पूजा आहे. स्त्रीलासुद्धा आम्ही पूज्य मानतोच. तिची कशी वाट लावून टाकली आहे ते तर तुला माहीत आहेच.

स्वामीजी, इतर देशांमध्ये लोक गायीची पूजा करत नाहीत, मात्र तिची चांगली काळजी घेतात, तिला नीट खायला घालतात आणि ती उत्तम दुध देते.

बच्चा इतर देशांच्या गोष्टी सोडून दे. आपण त्यांच्यापेक्षा उच्च आहोत. म्हणून देवता फक्त आपल्याकडेच अवतार घेतात. इतर देशांमध्ये गाय फक्त दुधाच्या उपयोगासाठी असते, आपल्याकडे ती दंगा भडकवण्यासाठी, आंदोलन करण्यासाठी असते. आपली गाय इतर गायींपेक्षा वेगळी आहे.

स्वामीजी, बाकी सगळे प्रश्न सोडून आपण याच कामला कां लागला आहात?

कारण यामुळे सर्वांचंच भलं होणार आहे, बच्चा. जर गोरक्षा कायदा आला तर देश आपोआप समृद्ध होईल. मग ढग वेळी पाऊस देतील. जमीन भरपूर अन्न देईल, आणि कारखाने न चालताच उत्पादन करतील. धर्माचा प्रताप तुला ठाऊक नाही बच्चा. आज जी देशाची दुर्दशा झालेली आहे, ती गोमातेच्या अनादरामुळे झालेली आहे.

स्वामीजी, पाश्चात्य देश गोमातेची पूजा करत नाहीत, उलट गोमांस खातात. तरी ते समृद्ध आहेत.

त्यांचा देव वेगळा आहे बच्चा. त्यांचा देव या गोष्टींना महत्त्व देत नाही.

आणि रशियासारखे देशसुद्धा गायीची पूजा करत नाहीत, तरी समद्ध आहेत.

त्यांचा तर देवच नाही बच्चा. त्यांना दोष लागत नाही.

म्हणजे, देव बाळगणं म्हणजे एक कटकटच आहे. प्रत्येक गोष्टीची शिक्षा देऊ लागतो.

तर्क बरोबर आहे बच्चा, पण भावना चुकीची आहे.

स्वामीजी, माझ्या माहितीप्रमाणे, लोकांच्या मनात आज गोरक्षा नाही, महागाई आहे आणि आर्थिक शोषण आहे. जनता महागाईच्या विरोधात आंदोलन करते आहे. जनता आर्थिक न्यायासाठी लढते आहे. आणि आपण मात्र इकडे गोरक्षा आंदोलन घेऊन बसला आहात. याला काय अर्थ आहे?

याला अर्थ आहे बच्चा. तुला आतली गोष्ट सांगतो. जनता जेव्हा आर्थिक न्यायाची मागणी करत असते तेव्हा तिला दुसऱ्या एखाद्या गोष्टी अडकवून टाकलं पाहिजे, नाहीतर ती फार धोकादायक बनते. जनता म्हणते, आमची मागणी आहे महागाई कमी करा, नफेखोरी बंद करा, पगार वाढवा, शोषण बंद करा, तेव्हा आम्ही तिला सांगतो, नाही, तुझी खरी मागणी आहे गोरक्षा! आर्थिक क्रांतीकडे जाणाऱ्या जनतेला आम्ही वाटेतच गायीच्या खुंट्याला बांधून टाकतो. हे आंदोलन जनतेला गुंगवून टाकण्यासाठी आहे.

कोणातर्फे आपण जनतेला असे गुंगवत आहात?

जनतेच्या मागणीचा ज्या लोकांवर परिणाम होणार आहे, त्यांच्यातर्फे. हाच धर्म आहे. एक उदाहरण देतो.

बच्चा, लुटणाऱ्यांच्या गोटात सगळ्या धर्माचे लोक सामील आहेत हे तर तुला माहीत आहेच. आणि लुटल्या जाणाऱ्या कामकऱ्यांमध्येसुद्धा सगळ्या धर्माचे लोक सामील आहेत. कल्पना कर, एक दिवस सगळ्या धर्माचे हजारो उपाशी लोक एक दिवस गोळा होऊन आपल्या धर्माच्या एखाद्या व्यापाऱ्याच्या गोदामामध्ये साठवलेले अन्न लुटण्यासाठी निघाले. व्यापारी आमच्याकडे आला. म्हणाला, स्वामीजी काहीतरी करा. हे लोक तर माझी सगळी पुंजीच लुटून नेतील. तुम्हीच वाचवू शकता. म्हणाल तशी सेवा करू. बस्स, आम्ही उठलो, हातात एक हाडूक घेतला आणि मंदिराच्या चबुतऱ्यावर उभे राहिलो. ते हजोर लोक जेव्हा गोदाम लुटण्याच्या घोषणा देत आले त्यावेळी हाडूक दाखवून जोरात आरोळी ठोकली, कुणीतरी देवाचे मंदिर भ्रष्ट केले आहे. हे हाडूक कुणी पाप्याने देवळात फेकले. परधर्मी आपले मंदिर अपवित्र करीत आहेत. आपला धर्म नष्ट करीत आहेत. लाज वाटली पाहिजे आपल्याला. या क्षणापासून मी इथे उपवास करणार आहे. देवळाच्या पुन्हा रंगरंगोटी होईल आणि होम हवन करून ते पुन्हा पवित्र केले जाईल तेव्हाच माझा उपवास संपेल. बस्स! झालं. ती जमाव जो व्यापाऱ्याशी दोन हात करायला आला होता, तो धर्माच्या नावावर आपापसात लढायला लागला. मी त्यांची घोषणा बदलून टाकली. त्यांच्या लढून झाल्यावर मी म्हटले, धन्य आहे या देशाची धर्मशील जनता! धन्य आहेत धान्याचे व्यापारी अमुकजी. त्यांना मंदिराच्या शुद्धीसाठी सगळा खर्च द्यायला सांगितले. बच्चा, लोक ज्या व्यापाऱ्याचे गोदाम लुटण्यासाठी आले होते, ते त्याचाच जयजयकार करायला लागले. बच्चा, असा असतो धर्माचा प्रताप. या जनतेला जर गोरक्षा आंदोलनात नाही लोटले, तर ते रोजगार मिळवण्यासाठी आंदोलन करतील, पगारवाढीसाठी आंदोलन करतील, नफेखोरीच्या विरोधात आंदोलन करतील. जनतेला गुंतवून ठवणे आमचे काम आहे.

स्वामीजी, तुम्ही खरोखर माझ्या ज्ञानात फारच भर टाकलीय. आणखी एक गोष्ट सांगा. कित्येक राज्यात गोरक्षेसाठी कायदा आहे, इतर राज्यांत लागू होईल. तेव्हा हे आंदोलनसुद्धा संपून जाईल. त्यानंतर आपण कोणत्या गोष्टीसाठी आंदोलन करणार?

अरे बच्चा, आंदोलनासाठी विषय बरेच आहेत. सिंह दुर्गेचे वाहन आहे. त्याला सर्कसवाले पिंजऱ्यात डांबतात. त्याचे खेळ करतात. हा अधर्म आहे. सर्कसवाल्यांच्या विरोधात आंदोलन करून देशातल्या सगळ्या सर्कस बंद करून टाकू. मग देवाचा आणखी एक अवतार आहे, मत्स्यावतार. मासा देवाचे प्रतीक आहे. माच्छिमारांच्या विरोधात आंदोलन पुकारू. सरकारचा मासेपालन विभागच बंद करून टाकू. बच्चा, जोपर्यंत लूट संपत नाही, तोपर्यंत काही लोकांच्या अडचणी संपणार नाहीत. एक मुद्दा आणखी आहेच बच्चा. आम्ही जनतेत पसरवू, की आपल्या धर्माच्या लोकांच्या सगळ्या अडचणींचे कारण दुसऱ्या धर्माचे लोक आहेत. या ना त्या प्रकारे आम्ही जनतेला धर्माच्या नावाखाली गुंतवून ठेवूच बच्चा.

एवढ्यात गाडी आली. स्वामीजी गाडीत बसून निघून गेले. बच्चा तिथेच राहिला.

**मराठी अनुवाद : नारायण खराडे**

# भांडवली शेती, दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या

पान १६ वरून

उत्पन्नात शेतीचा वाटा होता फक्त १३.७ टक्के जो १९५०-५१ मध्ये ५२ टक्के असायचा. म्हणूनच ५० व ६० च्या दशकात राज्याकडून शेतीसाठी कमीत कमी एक कामचलाऊ संरचना उभी केली गेली. याच काळात शेतीचे धिम्या गतीने भांडवली रूपांतरसुद्धा होत गेले. आज हे रूपांतर पूर्ण झाले आहे.

भांडवली विकासाचे एक वैशिष्ट्य असते. तो कधीच सर्व क्षेत्रांत समान नसतो. काही क्षेत्रे इतरांच्या तुलनेत मागे पडतात. आज भारतात ज्या प्रदेशांत दुष्काळ पडतो त्यांना दुष्काळमुक्त करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याची गरज आहे. राज्य ही गुंतवणूक करू इच्छित नाही. याची दोन कारणे आहेत. एक तर या प्रदेशांना दुष्काळमुक्त करण्यासाठी राज्याला मोठा खर्च करावा लागणार आहे. राज्य आज कल्याणकारी धोरणांचा त्याग करीत आहे आणि जनतेच्या कष्टाचा पैसा भांडवलदार घराण्यांच्या खिशात सारते आहे हे तर आपण पाहातच आहोत. अशा वेळी कल्याणकारी योजना लागू करून सरकार भांडवलदार वर्गाला बिलकूल नाराज करू इच्छित नाही. दुसरी गोष्ट म्हणजे या प्रदेशांमध्ये भांडवली विकास झालेला आहे आणि तेथे उद्योग आणि शेतीमधील अंतर्विरोध स्पष्टपणे दिसू लागला आहे. एकीकडे मोठमोठे पावर प्लांट सुरु झाले आहेत. ते मोठ्या प्रमाणात पाण्याची मागणी करीत असतात, व दुसरीकडे शेतीसुद्धा पाण्याशिवाय शक्य नाही. सरकारे औद्योगिक भांडवलदारांनाच प्राधान्य देतात हे इतिहासाने दाखवून दिले आहे. प्रामुख्याने या दोन कारणांमुळे या प्रदेशांना दुष्काळमुक्त करणे कोणत्याही सरकारच्या प्राधान्यक्रमात बसत नाही.

शेतीच्या भांडवली रूपांतराबरोबर आणखी एक परिघटना समोर आलेली आहे. ती म्हणजे ग्रामीण लोकसंख्येचे विभेदीकरण. भांडवलशाही जसे जसे आपले हातपाय पसरू लागते तसतशी मोठ्या संख्येने ग्रामीण जनता आपल्या घर-जमिनीपासून तुटू लागते व ग्रामीण सर्वहारा बनून एक तर श्रीमंत शेतकऱ्यांच्या शेतात राबते किंवा शहरांकडे धाव घेते व तेथे औद्योगिक भांडवलदारांच्या शोषणाची बळी ठरते. दुष्काळ या प्रक्रियेला वेग देतो. यामुळे गावातील श्रीमंत शेतकरी व शहरातील उद्योगपती दोघांचाही फायदा होतो. दुष्काळ पडल्यावर जेव्हा ग्रामीण सर्वहारा जनतेचे अगदी खाण्याचे वांदे होतात तेव्हा श्रीमंत शेतकरी आणि उद्योगपतींकडून त्यांना अत्यंत कमी मजुरीवर राबवले जाते. अशा प्रकारे श्रीमंत शेतकरी आणि उद्योगपतींना स्वस्त श्रम मिळू लागतो. प्रामुख्याने इतर प्रदेशांतल्या श्रीमंत शेतकऱ्यांना याचा फार फायदा होतो. पूर्व महाराष्ट्रात दुष्काळ पडतो तेव्हा पश्चिम महाराष्ट्रातील ऊस शेतकऱ्यांना अत्यंत कमी दरांवर मजूर मिळू लागतात. दर वर्षी दुष्काळग्रस्त क्षेत्रांतून कामाच्या शोधात पलायन करून मोठ्या संख्येने लोक दुसऱ्या क्षेत्रांतील श्रीमंत शेतकऱ्यांकडे अत्यंत कमी मजुरीवर काम करतात. याशिवाय गांजलेल्या ग्रामीण जनतेची जमीन श्रीमंत शेतकरी अत्यंत कमी दरात घशात घालतात. जास्त किंमतीची जमीन थोडेसे कर्ज फेडण्यासाठी सोडून द्यावी लागते. यातूनही श्रीमंत शेतकऱ्यांचाच फायदा होतो. अर्थातच श्रीमंत शेतकऱ्यांनाही दुष्काळाच्या वेळी मोठे नुकसान सहन करावे लागते, परंतु त्यांच्याकडे भांडवल असल्यामुळे हे भांडवल ते शेतीतून काढून इतर क्षेत्रांत लावू शकतात. जवळपासच्या शहरांमध्ये ते नवीन उद्योगधंदे सुरू करू शकतात व दुष्काळाच्या कोपापासून स्वतःला काही प्रमाणात वाचवू शकतात. थोडक्यात, त्यांच्यावर आत्महत्या करण्याची पाळी येत नाही. याला काही अपवादही असतात. मात्र आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये मध्यम शेतकऱ्यांची संख्या जास्त असते. शेतीचे भांडवली रूपांतर होते तेव्हा मध्यम शेतकरीसुद्धा अधिकाधिक उपभोगासाठी नाही तर बाजारासाठी शेती करू लागतात. नगदी पिके (कॅश क्रॉप्स) उत्पादनात मुख्य स्थान घेऊ लागतात. शेतकरी जेव्हा ही पिके घेऊ लागतात तेव्हा त्यांच्यासाठी जास्त भांडवलाचीही गरज असते व पिक येण्याचा कालावधीसुद्धा जास्त असतो. शिवाय अशी बहुतेक पिके जास्त पाण्याची मागणी करतात. अशा प्रकारे उत्पादन बाजारासाठी होऊ लागते खरे, पण जेव्हा पाणी आणि भांडवलाची समस्या निर्माण होते तेव्हा उभे पिक बरबाद होऊ लागते. याशिवाय त्यांना शेतीसाठी कर्जसुद्धा घ्यावे लागते. कसेही करून पिक विकून हे कर्ज ते फेडू शकत नाहीत. अशा परिस्थितीतच ते आत्महत्या करतात. गरीब शेतकरी आणि ग्रामीण सर्वहारांमध्ये आत्महत्येचे प्रमाण जवळपास देशभरात कमीच आहे, व ही जनता कुठे वेगाने तर कुठे धिम्या गतीने शहरांकडे जात असते. दुष्काळामुळे शहरांकडे होणाऱ्या या पलायनाचा वेग नक्कीच वाढतो. दुष्काळाचा वेगवेगळ्या वर्गांवर कसा वेगवेगळा प्रभाव पडतो तेसुद्धा यावरून दिसून येते. बहुतेक लोक ही प्रक्रिया समजू शकत नाहीत व सतत राज्याच्या हस्तक्षेपाद्वारे दुष्काळावर उपाय काढण्याचे प्रयत्न करीत राहतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्या अन्य प्रदेशांमध्येही होतात व फक्त दुष्काळावर उपाय काढून आत्महत्या टाळणे अशक्य आहे, हे ते समजू शकत नाहीत. भांडवलशाहीने शेतीला आपल्या पंखाखाली घेताच मध्यम शेतकरी नेहमी जास्त उत्पादन करून पिक चांगल्या किंमतीवर बाजारात विकून नफा कमावण्याचा विचार करीत असतो. उत्पादनाच्या काळात पिक खराब होते तेव्हा तोसुद्धा बरबाद होतो आणि बाजारात पिकाला चांगला दाम मिळत नाही तेव्हासुद्धा तो बरबाद होतो. अशा बऱ्याच घटना पाहण्यात आहेत ज्यांमध्ये पिक चांगले आलेले आहे परंतु चांगला दाम न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. थोडक्यात, मध्यम आणि लहान शेतकऱ्यांचे बरबाद होणे भांडवलशाहीत अटळ आहे. दुष्काळ फक्त त्याचा वेग वाढवतो. अशा वेळी, बहुतेक लोक व स्वतःला क्रांतिकारक म्हणवून घेणाऱ्या संघटनासुद्धा जेव्हा मध्यम शेतकऱ्याच्या बरबाद होण्याबद्दल अश्रू ढाळतात तेव्हा त्यांनी ही एकंदर परिघटना नीट समजून घेतलेली नसते. त्यामुळे त्यांची मागणीसुद्धा शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यापर्यंत व आलेल्या पिकाला हमीभाव वाढवून देण्यापर्यंत मर्यादित राहते. दुष्काळाचा सर्वांत भयंकर परिणाम ग्रामीण सर्वहारा आणि शेतमजूरांवर होत असतो कारण त्यांची मजुरी घसरते व त्यांच्यावर उपाशी मरण्याची पाळी ओढवते, याकडे ते पूर्ण डोळेझाक करतात. त्यांना कोणतीही नुकसान भरपाई मिळत नाही, व त्यांच्यापाशी कोणतीही जमीन नसल्यामुळे हमीभाव वाढवल्यामुळे त्यांना काहीच फायदा होत नाही. उलट सापेक्षतः त्याचे नुकसानच होत असते. परंतु ग्रामीण सर्वहाराच्या मागण्या मांडण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नसतो व ते असा एक रथ रोखण्याचा प्रयत्न करीत असतात जो वेगाने खोल दरीच्या दिशेने धावतो आहे, व त्याचा वेग कमी करून त्याला दरीत कोसळण्यापासून रोखता येणार नाही. मध्यम शेतकऱ्यांच्या बरबाद होण्याचा उत्सव साजरा केला जावा, असा याचा अर्थ अजिबात नाही. याचा अर्थ इतकाच आहे की भांडवलशाहीत मध्यम शेतकऱ्याचे बरबाद होणे टाळले जाऊ शकत नाही. त्याचबरोबर, नुकसान भरपाई देऊन किंवा हमीभाव वाढवून मध्यम शेतकऱ्याची परिस्थिती सुधारता येणार नाही. नुकसान भरपाई आणि हमीभावाचा लाभ खरा त्यालाच मिळतो ज्याच्यापाशी जमीन अधिक आहे, म्हणजेच श्रीमंत शेतकरी. कर्जमाफीची मागणीसुद्धा श्रीमंत शेतकऱ्यांनाच जास्त लाभदायक ठरते कारण त्यांना सरकारी बँकांकडून कर्ज मिळत असते. लहान किंवा मध्यम शेतकऱ्यासाठी कर्जाचा स्रोत असतो गावातील ब्याजखोर महाजन किंवा श्रीमंत शेतकरी, व ते कोणत्याही परिस्थितीत कर्जमाफीचा विचारसुद्धा करीत नाहीत. अशा प्रकारे प्रगतिशील संघटनांच्या मागण्यासुद्धा वास्तविक श्रीमंत शेतकऱ्यांच्याच मागण्या असतात व ज्यांची परिस्थिती सगळ्यात जास्त खराब आहे त्यांना त्यांपासून कोणताही लाभ मिळत नाही, म्हणजेच शेतमजुरांना! त्यांच्यासमोर पलायनाशिवाय दुसरा कोणताही मार्ग शिल्लक राहत नाही.

आज दुष्काळाचे संकट आपल्यासमोर असताना आपण सर्वप्रथम ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले आहे तेथे ताबडतोब मदत पोहोचवण्याची मागणी केली पाहिजे. बऱ्याचदा वास्तवाबद्दल अनभिज्ञ असल्यामुळे छोट्या प्रमाणातली माल उत्पादनाला वाचवण्याची मागणी लोक करीत असतात. मात्र आपण वर पाहिल्याप्रमाणे या मागण्या मध्यम शेतकऱ्यांचे उद्ध्वस्त होणे काही टाळू शकत नाही, व मुख्य मागण्या मात्र बाजूलाच पडतात. सर्वप्रथम आपण सर्वांना सारख्या प्रमाणात मदत पोहोचविणाऱ्या मागण्या पुढे ठेवल्या पाहिजेत. इच्छा असल्यास सरकार या मागण्या लगेच पूर्ण करू शकते. अशा मागण्यांमध्ये घरगुती उपयोगाकरिता पुरेशा पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्याची मागणी सर्वप्रथम येते. कारणांबद्दल बोलायचे झाले तर अशा प्रदेशांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या हीसुद्धा भांडवलशाहीचीच देणगी आहे. बाजारावर आधारित शेतीसाठी भूमिगत पाण्याची प्रामुख्याने गेल्या दोन दशकांमध्ये जबरदस्त धूप झाली आहे. यामुळे भूमिगत पाण्याची पातळी सतत घसरत गेली आहे, व आज परिस्थिती अशी ओढवली आहे की गावागावांमध्ये विहिरी आणि हॅण्डपंप पाणी देईनासे झाले आहेत. नगदी पिके काढून नफा कमावण्यासाठी या प्रदेशांमध्ये मोठ्या प्रमाणात बोरवेल लावल्या गेल्या आहेत व आज परिस्थिती अशी आहे की ८०० फूटच्या बोरिंगनंतरही पाणी मिळेल याची शाश्वती राहिलेली नाही. आता काहीत बोरवेल पाणी देत आहेत आणि लोकांना कित्येक किलोमिटर अंतरावरून पाण्याची सोय करावी लागत आहे. सरकार पिण्याच्या पाण्याचा पुरवठासुद्धा करीत नाहीये आणि पाण्याच्या टँकरांतून लोकांना फक्त ५- ७ लिटर पाणीच दिले जात आहे. जर लोकांना घरगुती गरजांसाठी पुरेसे पाणी उपलब्ध करून देण्यात आले तर त्यामुळे अस्तित्त्वाचे संकट झेलणाऱ्या लोकसंख्येला तात्पुरता सुटकेचा श्वास घेता येईल. अर्थातच, घरगुती गरजेपुरत्या पाण्याचा पुरवठा केल्याने लोकांना तात्कालिक फायदाच होऊ शकतो कारण शेतीसाठी पाणी नसल्यावर लोक वेगाने शहरांकडेच धाव घेऊ लागतील.


आता सारांश म्हणून काही मुद्दे मांडता येतील. दुष्काळाची कारणे आपण या व्यवस्थेच्या चारित्र्यामध्ये शोधली पाहिजेत व याला नैसर्गिक संकट मानण्याची चूक करता कामा नये. पाऊस कमी झाला तरी पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध असते व ते प्रामुख्याने उद्योगांच्या गरजा भागवण्यासाठी वापरले जाते. दुसरी गोष्ट म्हणजे, या व्यवस्थेच्या अंतर्गत दुष्काळाचा पक्का उपाय अशक्य आहे. याचे मुख्य कारण म्हणजे आज कोणत्याही प्रदेशातील शेतीवरील संकटाने देशाच्या अर्थव्यवस्थेवर खूप मोठा परिणाम होत नाही व श्रीमंत वर्गाला वास्तविक यातून फायदाच होतो कारण स्वस्त श्रम त्यांच्यासाठी उपलब्ध होतो. तिसरी गोष्ट, दुष्काळग्रस्त भागांत सर्वच वर्गातील लोकांना अडचणींना सामोरे जावे लागत असले तरी वेगवेगळ्या वर्गांवर यांचा परिणाम वेगवेगळा असतो. शेतमजुरांनाच सर्वांत जास्त नुकसान झेलावे लागते. लहान आणि मध्यम शेतकरी उद्ध्वस्त होऊन सर्वहारा वर्गात सामील होण्याची गती दुष्काळामुळे वाढते व कोणताही उपाय ही बरबादी थांबवण्यासाठी कुचकामी ठरतो. चौथी गोष्ट, दुष्काळाच्या समस्येचे निदान झाले म्हणून शेतकऱ्यांच्या सगळ्या समस्या दूर होत नाहीत, व दुष्काळ हे आत्महत्यांचे एकमेव कारण आहे असे समजणे चुकीचे आहे. दुष्काळाच्या समस्येचे निवारण झाले तरी गावांमध्ये विभेदीकरणाची प्रक्रिया सुरूच राहते. फक्त प्रभुत्त्वशाली वर्गाला लाभदायक ठरणाऱ्या मागण्या करून दुष्काळाच्या समस्येचे निवारण होऊ शकत नाही. सर्वांना समान रुपात लाभ देणाऱ्या मागण्या आपण सर्वप्रथम केल्या पाहिजेत. याचा अर्थ असा नक्कीच नाही की दुष्काळाच्या समस्येच्या कायमस्वरूपी सोडवणुकीच्या मागण्या आपण सरकारकडे करू नयेत व केवळ तात्कालिक मदतीच्या मागण्या केल्या पाहिजेत. आपण दुष्काळाची समस्या कायमची सोडवण्यासाठी सरकारकडे मागण्या केल्या पाहिजेत, मग सरकार त्या पुऱ्या करो अथवा न करो. परंतु अशा मागण्यांच्या माध्यमातून या व्यवस्थेचे स्वरूप व चारित्र्य आपण लहान आणि मध्यम शेतकऱ्यांसमोर व ग्रामीण सर्वहारा वर्गासमोर उघडे पाडले पाहिजे.

**विराट**

•

**फिरून येतील लांडगे**
**अंधकार त्यांची ताकद आहे**
**आणि अजूनही दूर झालेला नाही अंधकार**
**ते येत राहतील उजाडेपर्यंत**
**दर वेळी अधिक आततायी**
**अधिक हिंस्र बनून**
**त्यांचे अधिक हिंस्र बनणेच**
**त्यांच्या कमकुवत होण्याची खूण असेल...**

**रवि कुमार**



# भांडवली शेती, दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या

## नफ्याच्या व्यवस्थेत लहान शेतकऱ्यांचे उद्‌ध्वस्त होणे अटळ आहे!

महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरूच आहेत. गेल्या काही वर्षांच्या मानाने या वर्षी आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. २०१५ मध्ये जानेवारी ते जून या सहा महिन्यांत १३०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. (हा सरकारी आकडा आहे. काही विश्लेषकांच्या मते खरा आकडा २००० पेक्षाही जास्त आहे.) महाराष्ट्रातील १४७०८ गावे दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आली आहेत, आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठा बिकट बनला आहे. महाराष्ट्रातील सरकारबद्दल बोलायचे झाले तर सरकारला शेतकऱ्यांपेक्षा गायीची चिंता जास्त आहे, आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणविसांनी शेतकऱ्यांचा प्रश्न नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्यावर सोडलेला आहे. केंद्र सरकारची या समस्येवर भूमिका काय आहे हे केंद्रिय मंत्री राधा मोहन सिंह यांच्या विधानावरून कळू शकते. त्यांच्या मते प्रेम प्रकरणे, नपुंसकता ही या आत्महत्यांमागची खरी कारणे होत! या वर्षी पाऊस कमी झाला. हे दुष्काळाचे तात्कालिक कारण आहे. पाऊस कमी झाल्यामुळेच दुष्काळ पडल्याचे सांगून सरकार स्वतःचा बचाव करीत आहे. मात्र समग्रतेत पाहिले तर या समस्येचे अनेक पैलू समोर येतात. त्यांच्यावर विचार होणे गरजेचे आहे.

देशात दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न काही नवीन नाही. गेल्या वीस वर्षांमध्ये दर वर्षी १२००० ते २०००० शेतकरी आत्महत्या करतात. महाराष्ट्रात ही समस्या सर्वाधिक आहे व एकूण आत्महत्यांपैकी जवळपास ४५ टक्के आत्महत्या महाराष्ट्रात होत असतात. महाराष्ट्रातही विदर्भ आणि मराठवाड्यात आत्महत्या जास्त होतात. या वर्षी जूनपर्यंत विदर्भात ६७१ आणि मराठवाड्यात ४३८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. २०१२, २०१३ आणि २०१४ मध्ये क्रमशः ३७८६, ३१४६ आणि २५६८ शेतकऱ्यांनी महाराष्ट्रात आपले जीवन संपवून टाकले. २०१४ मधील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा २५६८ हा आकडा दिशाभूल करणारा आहे कारण २०१४पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या गणनेच्या पद्धतीत बदल करण्यात आला. त्यामुळे खरे चित्र समोर येत नाही. २०१४ पूर्वी जी पद्धत अवलंबिण्यात येत होती, तिच्यानुसार हा आकडा २५६८ हून वाढून ४००४ होतो. मात्र पद्धत कोणतीही असो, एवढे मोठे सत्य नाकारता येत नाही. अशा प्रकारे पद्धत बदलून आकडे सुधारून घेता येतील पण त्यातून समस्या काही सुटत नाही. जूननंतरचे आकडे आपल्यापाशी उपलब्ध नाहीत मात्र परिस्थिती आणखीनच बिघडलेली आहे, हे नक्कीच सांगता येऊ शकते. बीड, लातुर, उस्मानाबाद, जळगाव , नांदेड, सातारा, अहमदनगर, यवतमाळ, वर्धा आदी जिल्ह्यांतून सतत आत्महत्येच्या बातम्या येत असतात.

दुष्काळ आणि आत्महत्येसाठी वारंवार जे कारण दिले जात आहे, ते म्हणजे पावसाची कमतरता. म्हणजेच या एकूण समस्येचे कारण नैसर्गिक असल्याचे सांगितले जाते आहे. सध्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी अभियान चालवणारे नाना पाटेकरसुद्धा म्हणतात की या समस्येसाठी सरकारला दोषी ठरवता येणार नाही, कारण पाऊसच कमी झालेला आहे. परंतु एवढे सांगितल्यामुळे प्रश्न सुटत नाही. ज्या वर्षांमध्ये पावसाचा प्रश्न नव्हता त्या वर्षांमध्येसुद्धा ही समस्या मोठ्या प्रमाणात अस्तित्त्वात होती. समस्येचे खरे कारण पावसाची कमी हे नाही तर सरकारचे या समस्येकडे लक्ष न देणे हे खरे कारण आहे. एका सर्वेक्षणानुसार, आत्महत्या करणाऱ्यांपैकी एक तृतियांश शेतकऱ्यांच्या कुटुंबियांचे म्हणणे आहे की आत्महत्येचे मुख्य कारण सरकारकडून कोणतेही मदतीचे पाऊल न उचलले जाणे हेच आहे. फक्त दहा टक्के कुटुंबांनीच यासाठी पावसाला जबाबदार धरले आहे. सरकार कोणाचेही असो, दुष्काळाशी सतत झगडणाऱ्या प्रदेशांमध्ये सिंचनाची एक व्यवस्थित आणि क्रियाशील संरचना उभी करण्याची जबाबदारी कोणत्याही सरकारने उचललेली नाही. पाणी साठविण्याचे व्यवस्थापन योग्य प्रकारे झाले नाही तर ज्या प्रदेशांमध्ये भरपूर पाऊस पडतो, तेथेसुद्धा पाण्याचा प्रश्न निर्माण होणार. चेरापुंजी याचे उत्तम उदाहरण आहे. भारतातील सगळ्यात जास्त पाऊस असणाऱ्या प्रदेशांपैकी चेरापुंजी एक आहे. मात्र वर्षातील बराचसा काळ त्याला पाण्याच्या समस्येशी झगडावे लागते. वास्तविक, आजसुद्धा जर आपल्याला दुष्काळासारख्या संकटाशी झगडावे लागत असेल, तर त्यासाठी नैसर्गिक कारणे पुढे करणे नक्कीच चुकीचे आहे. १७ व्या किंवा १८ व्या शतकात असे बोलले गेले असते तर गोष्ट वेगळी होती. आज विज्ञान आणि तंत्रज्ञान इतके पुढारलेले आहे की कमीत कमी पाऊस असणाऱ्या प्रदेशातही पुरेशा पाण्याची तजवीज केली जाऊ शकते. भारतात नद्यांचे इतके विशाल जाळे पसरलेले आहे की देशातील कोरड्याहून कोरड्या क्षेत्रालासुद्धा दुष्काळमुक्त करता येऊ शकते. मानसूनच्या अनियमिततेमुळे दुष्काळ पडण्याच्या बातम्या आपण अगदी बालपणापासून ऐकलेल्या असतात आणि त्यामुळे दुष्काळाचे मुख्य कारण नैसर्गिक आहे, असा एक सर्वसामान्य समज झालेला असतो. कमी मानसूनमध्येसुद्धा भारतात इतका पाऊस पडत असतो की त्या पावसाचे योग्य व्यवस्थापन केले तर त्याद्वारे दुष्काळाचा प्रश्न सोडवता येऊ शकेल. नद्यांचे पाणी व्यवस्थित पद्धतीने वापरले आणि त्यासाठी आवश्यक अशी संरचना उभी केली तर हे निश्चितच शक्य आहे. याद्वारे भूमिगत पाण्याची सतत घसरणारी पातळीसुद्धा नियंत्रित केली जाऊ शकते. मग प्रश्न हा आहे की जर हे इतके सोपे असेल तर मग सरकार हे सोपे काम हाती कां घेत नाही व दररोज लोकांच्या शिव्या कां खाते? मुद्दा हा आहे की काम सोपे तर आहे, परंतु सरकारसाठी हे काम असंभव आहे!

पहिली गोष्ट म्हणजे, सध्याच्या व्यवस्थेच्या अंतर्गत दुष्काळाची समस्या सोडवणे कोणत्याही सरकारला शक्य नाही. दुसरी गोष्ट, दुष्काळाची समस्या सोडविली तरी त्यामुळे शेतकऱ्यांच्या सगळ्या समस्या दूर होणार नाहीत. याचे कारण म्हणजे शेतकऱ्यांच्या एका हिश्शाच्या अडचणी दूर होतील, दुसऱ्याच्या नाहीत. ढोबळमानाने श्रीमंत शेतकऱ्यांच्या समस्या मोठ्या प्रमाणात दूर होऊ शकतात परंतु गरीब शेतकऱ्यांच्या सगळ्या समस्यासुद्धा दूर होतील, असे म्हणणे चुकीचे आहे. दुष्काळग्रस्त नसलेल्या देशाच्या इतर भागांमध्येसुद्धा गरीब शेतकऱ्यांसमोर असंख्य प्रश्न आहेत. दुष्काळ हे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे एकमेव कारण नाही. ज्या प्रदेशांमध्ये दुष्काळ नाही तेथेसुद्धा शेतकरी दररोज आत्महत्या करीत असतात. अर्थातच तेथे आत्महत्यांचे प्रमाण दुष्काळग्रस्त भागांच्या तुलनेत कमी आहे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्येसुद्धा मोठी संख्या मध्यम शेतकऱ्यांची असते. या एकूण प्रक्रियेबद्दल आपण नंतर बोलू. येथे याचा उल्लेख करण्याचे कारण एवढेच की शेतकऱ्यांच्या सर्व समस्यांचे कारण दुष्काळ आहे असे मानण्याची चूक होऊ नये. पुन्हा आपल्या विषयाकडे येऊ. आजच्या व्यवस्थेत दुष्काळाच्या समस्येचे निवारण कां होऊ शकत नाही या प्रश्नाचे उत्तर काय असू शकते? या प्रश्नाचे उत्तर आपल्याला सध्याच्या व्यवस्थेच्या चारित्र्यात शोधावे लागेल. सध्याच्या व्यवस्थेचे चारित्र्य हे भांडवलदारी आहे आणि ती समाजातील एका लहानशा हिश्शाच्या नफ्यासाठी कार्यरत आहे. याचा आपल्या विषयाशी संबंध काय? कोणतीही सामाजिक समस्या ही त्या व्यवस्थेच्या चारित्र्याच्या संदर्भातच समजून घेता येऊ शकते. कोणत्याही समस्येवर उपाय ती समस्या समग्रतेत समजून घेऊनच शोधता येऊ शकतो. दुष्काळाचा प्रश्नसुद्धा आपण या संदर्भातच योग्य प्रकारे समजून घेऊ शकतो. आज दुष्काळाचा विषय येतो तेव्हा बहुतेक वेळा दृष्टिभ्रमासारखीच परिस्थिती असते. एक राजकीय पक्ष दुसऱ्या राजकीय पक्षाला नावे ठेवत असतो. सत्तेत असणारा पक्ष सांगत असतो की ते समस्येचा गांभीर्याने विचार करीत आहेत, आणि मग त्यांच्याकडून चार दोन आश्वासने दिली जातात. सरकार काही योजना लागू करते ज्यांची अंमलबजावणी कधी होत नाही, आणि अंमलबजावणी होऊ लागली तरी विशाल नोकरशाही त्यांचा पार बोऱ्या वाजवते. नंतर नोकरशाही किंवा सरकारची अकर्मण्यता आणि भ्रष्टाचारापाशी येऊन समस्या थांबते आणि शेवटी थोडीफार नुकसान भरपाई देऊन समस्या सोडवली जाते. या एकूण प्रक्रियेत समस्येची खरी कारणे दडवली जातात आणि या व्यवस्थेचे चारित्र्य लोकांसमोर येऊ शकत नाही.

यावेळीसुद्धा असेच होते आहे, व एकीकडे मराठवाडा आणि विदर्भात लोकांसमोर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आ वासून उभा असताना दुसरीकडे नाशिकच्या कुंभमेळ्यात साधुंना डुबकी मारताना अडचण होऊ नये यासाठी प्रचंड प्रमाणात पाणी शाही स्नानासाठी सोडण्यात आले आहे, यावरून शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी सरकार किती गंभीर आहे ते समजू शकते. राज्य दुष्काळाच्या समस्येने ग्रासलेले आहे व प्रत्येक व्यक्तीला फक्त ५ ते ६ लिटर पाणी देण्यात येते आहे, आणि दुसरीकडे साधूंच्या शाही स्नानासाठी २ टीएमसी पाणी (इतक्या पाण्यात ७० लाख लोकांच्या घरगुती गरजा दोन महिनेपर्यंत पूर्ण केल्या जाऊ शकतात) बरबाद केले जाते, हीच मुळात अत्यंत लांछनास्पद बाब आहे. गेल्या सरकार या समस्येबद्दल किती गंभीर होते हे त्यांनी केलेल्या ३५००० कोटींच्या सिंचन घोटाळ्यावरून समजू शकते. म्हणजेच कोणाचेही सरकार असो त्याला गरीब जनतेशी कोणतेही सोयरसुतक नाही हे आपण पाहू शकतो. मग त्याला नेमके कोणाचे पडून गेले आहे? एका वाक्यात सांगायचे झाले तर त्यांना देणेघेणे आहे समाजातील एक लहानशा हिश्शाशी, म्हणजेच भांडवलदार वर्गाशी! काही उदाहरणांतून हे कळू शकेल. दुष्काळातसुद्धा महाराष्ट्र सरकार जनतेच्या गरजा पूर्ण करायचे व दुष्काळग्रस्त भागास मदत पोचवायचे सोडून खागजी कंपन्यांच्या वापरासाठी पाणी सोडत आलेय. २०१२-२०१३ मध्ये पाण्याचा पुरवठा पुरेसा झाल्यामुळे जवळपास ४७ कंपन्यांचा फायदा झाला. या ४७ कंपन्यांपैकी ९० टक्के पाणी फक्त १२ कंपन्यांना देण्यात आले. या ४७ कंपन्यांपैकी १५ थर्मल पावर प्लांटचा फायदा झाला. त्यांपैकी १३ खाजगी मालकीच्या आहेत. ही वीज निर्मिती यंत्रे भरमसाठ पाणी वापरतात. १००० मेगावॅट वीज निर्मिती करण्यासाठी जेवढे पाणी लागते त्यांतून ७००० हेक्टर जमीनीचे सिंचन होऊ शकते, किंवा ८ लाख लोकांना वर्षभर पिण्याचे पाणी पुरवले जाऊ शकते. यावरून यासंबंधी अंदाज करता येऊ शकतो. आपण पाहू शकतो की पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळे गरीब जनता भयंकर परिस्थितीत जगत असताना, खाजगी कंपन्यांचा नफा मारला जाऊ नये म्हणून त्यांना पाण्याचा पुरवठा सुरू ठेवला जातो. या व्यवस्थेत दुष्काळाचा प्रश्न सोडवला जाऊ शकत नाही तो यामुळेच. कारण सरकार सामान्य जनतेपेक्षा मूठभर खाजगी लुटारूंना प्राधान्य देत असते.

उपरोल्लेखित मुद्दा स्पष्ट करणारी दुसरी गोष्ट म्हणजे आज शेतीच्या विकासाकडे सरकार जास्त लक्ष देऊ इच्छित नाही आणि म्हणूनच सरकारला दुष्काळाच्या प्रश्नाशी काहीही देणेघेणे नाही. १९९१ च्या नव्या आर्थिक धोरणांनंतर भारतात एकूण घरगुती उत्पादनात शेतीचा वाटा कमी होत गेला आहे. स्वातंत्र्यानंतर भारतात उद्योग आपल्या बाल्यावस्थेत होते आणि भारताची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात शेतीवर विसंबलेली होती. १९६१ मध्ये राष्ट्रीय उत्पन्नाचा ५७ टक्के वाटा शेतीतून येत होता, व २००६ येता येता तो फक्त १८ टक्के झाला. अशा प्रकारे १९५० व साठच्या दशकात शेतीवरचे संकट किंवा दुष्काळ एकूण अर्थव्यवस्थेला तीव्रतेने प्रभावित करू शकत होता, परंतु आज परिस्थिती तशी नाही. २००२ च्या दुष्काळामुळे भारताच्या एकूण घरगुती उत्पन्नात फक्त १ टक्क्याचा फरक पडला. २०१३ च्या आकड्यांनुसार एकूण घरगुती

पान १५ वर

### नाना पाटेकर यांच्या मदतीमुळे गरीब शेतकऱ्यांच्या समस्या दूर होणार आहेत का?

या वर्षी शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या समस्येने उग्र रूप धारण करताच नाना पाटेकर शेतकऱ्यांचे उद्धारकर्ते बनून महाराष्ट्रासमोर आले आहेत. नाना पाटेकर यांनी शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी एक अभियान सुरू केले आहे. नाना पाटेकर यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की त्यांनी आत्महत्या करू नयते, काही अडचण असेल तर त्यांच्याशी संपर्क साधावा, ते शेतकऱ्यांची मदत करतील! महाराष्ट्रातील वेगवेगळ्या शहरांतील लोकांनी नाना पाटेकर यांच्या हाकेला प्रतिसाद दिला आणि मदतनिधी गोळा करण्यात सुरूवात झाली. अक्षयकुमरसह कित्येक कलाकारसुद्धा मदतीसाठी पुढे आले. यानंतर मुख्य प्रवाहातील मिडिया आणि सोशल मिडियावरसुद्धा नाना पाटेकर यांचा जणू जयजयकार होऊ लागला. परंतु एक प्रश्न सर्वांत आधी उपस्थित केला गेला पाहिजे होता, व ज्या प्रश्नाला मुख्य प्रवाहातील मिडियाने मोठ्या हुशारीने बाजूला सारले आहे तो म्हणजे, अशा मोहिमेद्वारे दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न खराच सुटू शकतो का? नाना पाटेकर एक प्रामाणिक व्यक्ति असतीलही. (अर्थात, याबद्दलसुद्धा शंका यावी अशी परिस्थिती आहे, कारण नाना पाटेकर मोठ्या हुशारीने सरकारला या प्रश्नावर आपली जबाबदारी झटकून टाकण्याची संधी देत आहेत आणि सांगत आहेत की सरकार या आत्महत्यांसाठी जबाबदार नाही!) परंतु या मोहिमेद्वारे शेतकऱ्यांच्या समस्या सोडवणे बिलकुल शक्य नाही. अशा प्रकारची एनजिओवादी मोहिम थोडी मदत देण्याच्या नावाखाली वास्तवात (जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणी) जनतेची दिशाभूल करते व समस्येच्या मुळापर्यंत जाण्यात अडथळे निर्माण करते. अशा मोहिमा जनतेच्या मनात सुधारवादी राजकारणाबद्दल विश्वास निर्माण करतात आणि क्रांतिकारी राजकारणापासून त्यांना दूर ठेवण्यासाठी एक भक्कम भींत उभी करतात. दुष्काळग्रस्त प्रदेशांत पाणी पोहोचविणे व भविष्यात त्यांना दुष्काळाच्या कोपापासून वाचवण्यासाठीच्या योजना लवकरात लवकरात कार्यान्वित करणे ही तर सरकारची जबाबदारी आहे. दुष्काळाच्या समस्येचे निवारण अशा कोणत्याही तात्कालिक मदतीच्या मोहिमेतून होऊ शकत नाही.

• संपादक मंडळ – नारायण खराडे, विराट चौधरी • संपादकीय कार्यालय- रूम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३
मो. नं. ९७६४५९४०५७, ९६१९०३९७९३ • व्ही २ एंटरप्राइज, गाला-१०, सर्वे न ३/१३, वालीव, वसाई पूर्व, ठाणे-४०१२०८, फोन न. ०२५०-६०६६६०८ कडून मुद्रित